DAMAGE BOOK

THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY

OU_192865

UNIVERSAL LIBRARY

## प्रभात हेअरकटिंग सलून !

हेअरकटिंगचें हायक्लास व स्टायलिश काम मनपसंत करून मिळण्याचें एकच ठिकाण ! एकवेळ भेट देऊन खात्री करून घ्या !

**मालकः----एन्. आर. दळवी,**
आनंद छापखान्यासमोर, पेरूगेट रोड, पुणें २.

---

लेटेस्ट फॅशन्स व अप-टु-डेट शिलाईबद्दल
अल्पावधींत प्रसिद्धीस आलेले

# तयार कपड्यांचे प्रमुख व्यापारी.

**पेन्टर्स--जी. गेंगजे अॅन्ड को.**

बुधवार, आगीचे बंबासमोर, पुणें.


य.

# रत्नप्रभा (कँथडीन)

## सुगंध–युक्त तेल

स्त्रियांचे केसवाढीस अप्रतिम ठरलें.

३ बाटल्या रु. २–८–० फक्त. ट. ख. नि.

बनविणार:– प्रभा हेअर ऑईल कंपनी, कल्याण.

मिळण्याचें ठिकाण:—पी. डी. ब्रदर्स, बुधवार पुणें २.

रत्नप्रभा स्नो शरीरकांति वाढवितो.

---

## पराडकर टेलर्स ॲकॅडिमी

( सिटी पोष्टासमोर पुणें )

येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यवहारिक धंदेशिक्षण अल्प खर्चांत मिळते. आमची शिवणकलेचीं सर्व पुस्तकें ७॥ रु. त व्ही. पी. सह मिळतात.

---

## कार्टिंग् एजंटस्

रेल्वेकडून माल नेणें, आणणें व बिऱ्हाडाचें सामान बदलणें वगैरे वहातुकीचीं कामें केलीं जातात.

करमरकर अँड सन्स, ६०० शनवार पेठ
नातूचे हौदाजवळ, पुना सिटी.

---

उंची कल्चर्ड मोतीं

व

त्यांचे तयार दागिने योग्य भावानें मिळतील.

## मनोहर फार्मसी

टिळक रोड

सर परशुरामभाऊ कॉलेज समोर, पुणें नं. २

प्रिस्क्रिप्शनप्रमाणें औषधें काळजीपूर्वक तयार करून दिलीं जातात.

# प्रभात वॉच कंपनी.

विश्रामबागवाड्याजवळ.

## रेग्युलेशन मोफत.

घड्याळें दुरुस्त करणें अगर विकत घेणेंपूर्वी

☞ आमचा योग्य सल्ला घ्या ☜

---

# माधवराव व्ही. गोडबोले

## टेलर अँड आउटफिटर

आप्पा बळवंत चौक, बुधवार, पुणें २.

शाखा नं. १

स. प. कॉलेज रोड, पेरुगेटाजवळ, सदाशिव पुणें २.

---

# गोविंदराव भुर्के सराफ.

तुळसीबाग, पुणें.

आमचे दुकानीं चांदीचीं सर्व तऱ्हेचीं भांडीं व सोन्याचे सर्व तऱ्हेचे दागिने, बांगड्या, जाळीच्या पाटल्या ऑर्डरप्रमाणें तयार करून मिळतात.

एक वेळ दुकानीं येण्याची कृपा करून खात्री करून घ्यावी.

---

गिऱ्हाइकांचा संतोष हेंच आमचें ध्येय.

रेग्युलॅरिटी व स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिलें जाईल.

दोन वेळ जेवणाचे १२।१४ रु. दोन वेळ डबा ९।१३ रु.

न्यू प्लेट सिस्टिम ८ रु. १२ आ. (दोन्ही वेळचे)

# जयंत बोर्डिंग हाऊस.

टिळक रोड, सदाशिव, घर नंबर १९६/१७

जेवण्याची व राहण्याची उत्तम सोय.

—प्रोप्रायटर, दा. ग. वेदपाठक.

सतत १८ वर्षें चालत असलेलें

## मामा गोखले यांचें विश्रांतिगृह !

हल्लीं ९६२ सदाशिव, टांगास्टँडसमोर गेलें आहे. फराळाचें सर्व सामान ताजें, स्वच्छ व उत्तम मिळण्याचें एकच ठिकाण ! एकवेळ अवश्य अनुभव घेऊन खात्री करा !

—मालकः—जी. ए. गोखले.

---

स्वच्छता व चवदार पदार्थ यांमुळें थोडक्याच
अवधींत लोकप्रिय झालेलें दुकान म्हणजेच

## दी न्यू सेपरेट कंपनी

सदाशिव पोस्टाशेजारीं.

साजुक तुपाचा पेशवाई चिवडा
पार्टीकरितां अवश्य वापरा.

---

## श्रीगजानन फोनो वर्क्स

लक्ष्मीरोड, पुणें. २

ग्रामोफोन दुरुस्तीचें काम आमचे तज्ज्ञ माणसाकडून करून घेणें. दुरुस्तीचें काम तज्ज्ञ माणसाशिवाय करून घेणें नुकसानकारक आहे.

---

## दाते आणि कंपनी.

मंडप व फर्निचर कॉन्ट्रॅक्टर्स

आमचेकडे मंडपाचीं व डेकोरेशनचीं कामें उत्तम व वक्तशीर केलीं जातात व फर्निचर भाड्यानें व विकत मिळतें.

९०८ सदाशिव पेठ, पुणें.

॥ महाराष्ट्र-साहित्य-सेवक-ग्रंथमाला ॥

पुष्प १३ वें

( पुस्तक १ लें )

# यमुना !

( स्वतंत्र सामाजिक कादंबरी. )

लेखक,

गंगाधर रामचंद्र साने, बी. ए. बी. टी.

अभिप्राय

प्रो. श्री. नी. चापेकर, एम्. ए. एल्एल्. बी.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

प्रथमावृत्ति ] कि. १२ आणे. [ १९३८

प्रकाशकः—

**गं. रा. साने**, बी. ए. बी. टी.,
संपादक, महाराष्ट्र-साहित्यसेवक-
ग्रंथमाला, १७, पेंडसेचाळ,
सदाशिव, टिळक रोड पुणें २

मुद्रकः—

**शंकर नरहर जोशी,**
'चित्रशाळा' प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

## । समर्पण ।

प्रस्तुत पुस्तकांत पुरस्कारिलेल्या

तत्त्वांसाठीं

तम-मन-धनानें झटणाऱ्या

थोर महात्म्यांच्या

चरणीं

—गं. रा. साने.

# अभिप्राय.

श्री.

रा. गं. रा. साने यांची " यमुना " नांवाची लहानसर सामाजिक कादंबरीवजा गोष्ट वाचली. कृत्रिम व भडक भाषाशैली आणि कामुकतापोषक संविधानक हे जे दोन विशेष सध्यांच्या " सामाजिक " किंवा ' ललित-वाङ्मय ' म्हणून समजल्या जाणाऱ्या कादंबऱ्या, लघुकथा वगैरेमध्यें दिसून येतात ते प्रस्तुत कादंबरींत अथवा गोष्टींत प्रामुख्यानें दृग्गोचर होत नसले तरी, सध्यांच्या वाचकवर्गाच्या आवडीस अनुसरून, पण सात्त्विक प्रणयाचें आविष्करण करितांना, रा. साने यांनीं लालित्यपूर्ण व संयमयुक्त भाषा योजिली आहे. पण प्रस्तुत पुस्तकाचा, माझ्या मतें, विशेष अभिनंदनीय गुण म्हटला म्हणजे, संविधानकाच्या अनुषंगानें, सध्यांच्या आपल्या सामाजिक स्थितींत ज्या प्रश्नांचें आपल्यास विशेष जिव्हाळ्याचें महत्त्व आहे असे, पुनर्विवाह, जातिभेद, खरें साधुत्व, खरा संन्यास, व खरा कर्मयोग, विरुद्ध समाज-विघातक 'बुवाबाजी,' परदेशांतील स्त्रीमोहाचे बाबतींत,खऱ्या निरपेक्ष व उदात्त बंधुभगिनीप्रेमाचें माहात्म्य मनावर ठसविणें इ० जे निरनिराळे विषय आहेत त्यांच्या संबंधीं चर्चा किंवा व्याख्यानरूपानें, थोडक्यांत उद्बोधक विचार व्यक्त करण्याची संधि रा. साने यांनीं साधली आहे, व त्या विचारांस पोषक अशा निवडक व समर्पक रम्य अवतरणांची मार्मिक जोड दिली आहे. प्रस्तुत पुस्तकाचा हा विशेष सहृदय व सद्विचारलोलुप वाचकांस अधिक आवडेल असें मला वाटतें. रा. साने यांची भाषाशैली सुबोध असून भारदस्त आहे. रा. साने यांनीं आत्मप्रौढीविरहित व अखंड उत्साहानें चालविलेल्या भरीव व उद्बोधक वाङ्मयसेवेबद्दल मी त्यांचें सकौतुक अभिनंदन करितों.

पुणें, शुक्रवार, श्रावण शुद्ध
द्वितीया, शके १८६०
ता. २९।७।३८.

**श्री. नि. चापेकर.**

॥ श्रीगोपालकृष्णाय नमः ॥

# प्रकाशकाचे चार शब्द.

प्रस्तुत कादंबरी १९१६-१७ सालीं लिहिली गेली असून आज २१-२२ वर्षांनीं कां होईना पण तिच्या प्रकाशनाचा योग आला, याबद्दल आम्ही प्रथम त्या मंगलमय प्रभूचें अनन्यभावानें स्मरण करितों.

माझीं आजवर अनेक पुस्तकें प्रसिद्ध झालीं असलीं तरी लेखनाच्या कालानुक्रमानें पहातां ही माझी कादंबरीक्षेत्रांतली पहिलीच कृति होय, हें जाणून वाचक तिच्याकडे सहानुभूतिपूर्वक पाहतील, अशी आशा आहे. सामाजिक प्रश्नांचा विचार वर्षानुवर्ष समाजात चालू असतो. त्या दृष्टीनें आजहि ह्या पुस्तकांतील विचार वाचकांना विचारप्रवर्तक वाटतील अशी आशा आहे.

प्रस्तुत कादंबरीची भाषा, वर्णनें, व वैशिष्ट्य काय आहे तें प्रो. श्री. नी. चापेकर यांनीं आपल्या अधिकारवाणीनें आपल्या अभिप्रायांत सांगितलेंच आहे. तेव्हां त्याबद्दल मी जास्त काय सांगूं ? अनेक उद्योग मागें असूनहि, वेळांत वेळ काढून, त्यांनीं आपल्या नेहमींच्या प्रेमळपणानें व आपुलकीनें मला आपला अभिप्राय त्वरित लिहून दिला, याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. त्याचप्रमाणें येथील चित्रशाळेचे श्री. शंकरराव व श्री. वासुकाका जोशी यांनीं नेहमींप्रमाणें प्रस्तुत पुस्तकाच्या छपाईचें वगैरे काम मोठें सुबक, तत्परतेनें व सहानुभूतीनें करून दिलें, याबद्दल त्यांचाहि मी आभारी आहे.

शेवटीं सर्व वाचकांनीं 'माले'च्या कार्यास सप्रेम सहाय्य करावें अशी विनंति करून, क्वचित् कांहीं मुद्रणदोष, शक्य ती काळजी घेऊनहि, राहिले असल्यास त्याबद्दल सहृदय वाचकांची क्षमा मागून, हे चार शब्द पुरे करतों.

पुणें, ता. १७-९-३८

सर्वांचा नम्र,
**गं. रा. साने.**

# अनुक्रमणिका.


| प्रकरण | नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | देहविसर्जन | १ |
| २ | परिचय | २ |
| ३ | मोडके जहागीरदार | ४ |
| ४ | जातिभेद | ६ |
| ५ | अच्युतराव व श्रीपतराव | ११ |
| ६ | विठ्ठलमंदिरांत | १२ |
| ७ | स्त्री-शिक्षण | १४ |
| ८ | साधूंचें स्वगत आलाप! | १७ |
| ९ | मठांतील जलसा | १९ |
| १० | "सद्गुरुवांचोनी सांपडेना सोय" | २२ |
| ११ | भयंकर प्रसंग! | २५ |
| १२ | भोंदू गुरूंची सांथ | २८ |
| १३ | वेडी | ३२ |
| १४ | प्रौढविवाह | ३५ |
| १५ | नारायणराव | ३९ |
| १६ | दिव्य मीलन! | ४१ |
| १७ | श्रीमंत सुशिक्षितांचें कर्तव्य | ४४ |
| १८ | इंग्लंडास गमन | ४९ |
| १९ | वसंतव्याख्यानमाला | ५२ |
| २० | कावेरी | ७१ |
| २१ | वादविवाद | ७७ |
| २२ | इंग्लंडांत | ८१ |
| २३ | फौजदारसाहेब | ८६ |
| २४ | नदीकांठीं | ९० |
| २५ | दिव्य संन्यासिनी | ९५ |
| २६ | संन्यासी | १०० |
| २७ | उपसंहार | १०४ |

# यमुना.

## प्रकरण १ लें.

## देहविसर्जन.

मध्यरात्रीचा समय. सर्व विश्व शांतपणें निद्रासुखाचा अनुभव घेण्यांत मग्न झालें होतें. पिठासारखें स्वच्छ चांदणें पडलें होतें. चंद्रकिरण पुष्पावतीच्या अनंत वीचींशीं क्रीडत होते. नदीतीरीं असलेल्या लहानशा घराच्या खोलींत या वेळीं एक मंदप्रकाशित दिवा जळत होता. कोमल चंद्रकिरण खिडकींतून आंतील भागीं स्वच्छ प्रकाशत होते. खोलीमध्यें एक १३-१४ वर्षांची सुंदर बालिका एक पत्र लिहिण्यांत गुंग झाली होती. तिच्या चेहऱ्यावर निरनिराळे भाव दृग्गोचर होत होते. परंतु त्या सर्वांत निश्चयाची झांक पूर्ण दिसत होती. लवकरच तिचें पत्रलेखन संपलें. त्याची घडी करून तिनें तें आपल्या शय्येवर ठेविलें व उभ्या वस्त्रानिशीं पूर्ण निश्चयानें ती हळूंच घराबाहेर पडली. तिनें लवकरच नदीतीर गांठलें. एका उंच घाटावर उभे राहून तिनें लुगड्याची कास मारली. वाचक! काय, तिचा आत्महत्येचा विचार आहे काय? होय, असेंच दिसतें. कारण तें पहा, तिनें आपले हात जोडले, दृष्टि आकाशाकडे लावली, आणि तिनें बोलण्यास प्रारंभ केला:—

"आई जगदंबे, समाजाच्या अन्यायाच्या चालीमुळें आम्ही मुली आमच्या मातापितरांस लग्नसमयीं त्रासदायक होतों यांत आमचा ग काय दोष? पण त्या तशा होतो खऱ्या. माझ्या लग्नासाठीं शेकडों घरीं पायपिटी घालतां घालतां बाबा मेटाकुटीस आले. जेथें तेथें हुंड्याची नड! आम्ही गरिबांनीं दोन दोन हजार हुंडा कोठून आणावा? देवा, गरिबी हा अन्याय आहे काय? "नको ह्या मुली आणि नको हा जन्म!." असे दुःखाचे, खिन्नतेचे, वैतागाचे बाबांचे परवांचे उद्गार ऐकून माझ्या मनास कसेंसेंच झालें. शेवटीं हा देह बाबांच्या दुःखालाच कारणीभूत होणार ना? तर ह्या देहास ठेवून तरी काय करावयाचें आहे? माता

पुष्पावतीच्या अगाध उदरांत तो समर्पावा म्हणजे झालें, असें मनांत आलें. माते, मी आतां जगताचा निरोप घेत आहे. माझ्या आईला, बाबांला, व माझ्या गरीब बहिणभावांस सुखी राख, एवढीच माझी तुजजवळ प्रार्थना आहे. येतें मी. '' एवढें बोलून तिनें जगदंबेला पुन्हां एकवार नमस्कार केला व नदीच्या अगाध जलांत उडी घेतली. क्षणमात्र पुष्पावतीच्या लाटा आंदोलित झाल्या. पुन्हां सर्वत्र शांत झालें !

## प्रकरण २ रें.

## परिचय.

कुसुमपूर गांवीं विनायकराव जोशी या नांवाचे एक गृहस्थ राहात असत. विनायकरावांच्या पत्नीचें नांव सरस्वतीबाई. त्यांस एक मुलगा व तीन मुली अशीं चार अपत्यें होतीं. मुलाचें नांव नारायण. हा सर्वांत वडील. याचें वय १६ वर्षांचें असून हा सध्यां इंग्रजी सहाव्या यत्तेंत होता. याच्या पाठच्या तीन बहिणींचीं नांवें अनुक्रमें गंगा, यमुना, व कावेरी अशीं होतीं. त्या वयानें १३, ११ व ९ अशा होत्या. विनायकरावांचें शिक्षण मराठी ६–७ यत्तांपर्यंतच झालें होतें. इतक्यांत त्यांचे वडील दुर्दैवानें वारले. त्यामुळें सर्व संसाराचा बोजा एकदम त्यांवरच पडला. कारण घरांत वडील माणूस असे हेच राहिले. त्यांतून लहानपणींच लग्न झालेलें. संसाराचा गाडा तर कोणी तरी रेटावयास हवेना ? शेताचें उत्पन्न सालिना चार पांचशें रुपये येत. परंतु तेवढ्यांत कसें भागणार ? घरची आधींच, गरिबी. शिवाय त्यांस एकदोन बहिणी होत्या. त्यांचीं लग्नकार्यें उरकलीं पाहिजे होतीं. यासाठीं विनायकरावांनीं तेथेंच एका हपीसांत २०–२५ रु. दरमहाची नोकरी धरली. त्यांच्या बहिणींचीं नशिबें थोर. त्यामुळें त्यांस विशेष यातायातीशिवाय साधारण बरीं स्थळें मिळालीं. तरी हीं दोन कार्यें म्हणजे विनायकरावांस भारीच होतीं. त्यांतून दिवस फार वाईट येऊं लागलेले. महागाई फार होऊं लागलेली. पाऊस वेळच्या वेळीं पडेनासा झाल्यामुळें दुर्भिक्ष पडण्याची वेळ येऊं लागली. त्यामुळें

शेताच्या उत्पन्नाची पूर्वीची साधारण आशाही कमी होऊं लागली. महिना २०—२५ रु. पडले म्हणजे मुष्कील. हळूहळू त्यांचा संसारही वाढूं लागला. असो.

कुसुमपूर गांवास पुष्पावती नदी होती. नदीकांठीं असलेलें लहान घर विनायकरावांचें होय. यावरून वाचकांना तर्क झालाच असेल कीं, पित्याला क्लेशांतून. दुःखांतून, संकटांतून सोडविण्यासाठीं स्वतःचा देह पुष्पावतीस अर्पण करणारी दिव्य बालिका ही यांचीच थोरली मुलगी गंगू होय. गरीब बिचारी ! सुटली एकदांची ह्या अन्यायी जगाच्या भयंकर जाचांतून. विनायकरावांनीं क्षणभर उद्वेगाच्या भरांत वैतागाचे शब्द काढले असले, तरी शेवटीं तें पित्याचें हृदय ! मुलीच्या पत्रावरून तिची निधनवार्ता कळल्यावर त्यांस किती दुःख झालें असेल बरें ! मातेच्या शोकाला तर पारावारच उरला नाहीं ! एकंदर घरांत नुसता हलकल्लोळ उडून गेला ! त्याचें वर्णन कोठवर करावें !

"अये गंगू, कशी ग आम्हाला सोडून गेलीस ! पोरी, क्षणभर उद्वेगानें काढलेल्या शब्दांवरून हें तूं काय केलेंस ! गंगू, मी तुला कंटाळलों नव्हतों बरें. अरेरे, पित्याला दुःखमुक्त करण्याकरतां माझ्या पोरीनें दिव्य केलें ! आणि मी मात्र कर्मचांडाळ अजून जगलों आहे. देवा, आतां मी काय करूं ! गरिबी हा अन्याय आहे का रे ! ईश्वरा, माझ्या पोरीला स्वर्गांत तरी सुखी राख ! " इत्यादि विनायकरावांनीं बराच शोक केला.

हर हर ! निर्घृण रूढिराक्षसिणी, आमच्या गरीब गंगूसारखे अनंत बळी घेऊन देखील तुझी अजून तृप्ति होत नाहीं काय ! ह्या हुंड्याच्या अनिष्ट चालीनें किती गरीब घराणीं धुळीस मिळालीं असतील, कितीक अन्नाला महाग झालीं असतील, किती घराणीं उघडीं पडलीं असतील. रूढिपिशाचिके, तुझ्या सैतानी थैमानांनीं कितीकांचा सत्यनाश केला असेल ! परमेश्वरा, अशीं उदाहरणें डोळ्यासमोर घडत असून, अजून आमच्या निर्दय समाजाला त्याची कांहींच कींव येऊं नये ना ! मनु-सारख्या महात्म्यांनीं हुंड्यासारख्या दुष्ट चालींचा कितीही निषेध केला तरी दीडदीड दोन दोन हजार रुपयांनीं आपली पोतडी भरून गरी-बांला धुळीस मिळवायला सवकलेला आमचा समाज तिकडे कशाला बघतो आहे ! इतकेंच नव्हे, तर वर आपल्या चालीचें समर्थन निर्लज्ज-

पणें करावयास तो तयारच. परंतु अशा अन्यायाच्या, जुलमाच्या, निर्दयतेच्या चाली आपल्या पुण्यपावन पूर्वज महात्म्यांनीं घालून देणें शक्य तरी आहे काय, याचा ते क्षणभरहि विचार करीत नाहींत. असो.

त्या दिवशीं संध्याकाळीं नारायण सहज फिरत फिरत नदीकांठच्या एका घाटावर येऊन बसला. त्याचें अंतःकरण आज भगिनीच्या दुःखानें व्याप्त होतें. तो नदीच्या पात्राकडे शून्य नजरेनें पहात बसला होता. त्या सायंकालीन शोभेकडे आज त्याचें लक्ष नव्हतें. त्याच्या मनांत वर वर्णन केल्याप्रमाणें विचारमाला सुरू होती. सरते शेवटीं तो विषण्णपणें म्हणाला:—

" माते पुष्पावती, अशाच एखाद्या घाटावर उभे राहून माझ्या गरीब गंगूनें आपला देह तुला अर्पण केला असेल नाहीं बरें ? गरीब गंगू. गेली बिचारी. गंगू जा, जेथें न्याय, समता व दया यांचें पूर्ण वास्तव्य आहे अशा दिव्य लोकीं तूं जा. बाले, तुझ्या सारख्या दिव्य बालिका ह्या अन्यायी व निर्दय मर्त्यलोकीं राहण्यास अयोग्य होत हेंच खरें ! " याप्रमाणें विषण्ण विचारपरंपरेनीं आमच्या नारायणास आज ग्रासून टाकलें. तें इतकें कीं सूर्यास्त होऊन हळूहळू अंधार पडूं लागला तरी त्याला त्याचें भानच नव्हतें. शेवटीं तो कसाबसा शुद्धीवर आला व खिन्न अंतःकरणानें घरीं परतला.

## प्रकरण ३ रें.

## मोडके जहागिरदार.

कालाचा अनंत प्रवाह अप्रतिहत नेहेमीं चालू आहे. कोणी राजा होवो वा रंक होवो. त्यास त्याचें काय ? कोणाचा मुलगा मरो किंवा कोणी पुत्रजन्मोत्सव करो. त्यास दोन्हीं सारखींच ! दिवसामागून दिवस आणि वर्षामागून वर्षें सारखीं जात असतात. प्रथम प्रकरणांत वर्णिलेल्या गोष्टीस आज दोन वर्षें झालीं. कालगतीप्रमाणें गंगूच्या निधनाचें दुःख बरेंच कमी झालें. गंगूच्या नंतरची मुलगी यमुना. हिच्या विवाहाची विवंचना विनायकरावांस साहाजिकच येऊन पडली. ते स्थळें पहाण्याच्या

नादांत होतेच. याच सुमारास जवळच्याच एका खेडेवजा गांवाचे जहागिरदार कुसुमपूर मुक्कामीं विवाहाकरतां येऊन राहिले होते. यांचें वय जवळ जवळ साठपासष्ट वर्षांचें होतें. परंतु 'शारदा' नाटकांतल्या 'श्रीमंता'प्रमाणें "निपुत्रिकाला नरकवास शास्त्रांत ठरविला, त्याची वाटे भीति मनाला" असें म्हणत म्हणत हे कांहीं तरी लटपटपणा करून वृद्धपणीं राहिलेल्या थोड्याबहुत कामवासनेच्या तृप्त्यर्थ एका भोळ्या भावड्या अजाण पोरीचा कायमचा गळा कापण्यास तयार झाले होते. घरची जहागिरी साधारण बरी असल्यामुळें यांच्याभोंवतीं खुषमस्कऱ्यांचें नेहेमीं कडें पडलेलें असावयाचें. व ह्यांनीं भर दिवसां जरी "रवि मेला" म्हटलें तरी पटकन् 'डोळ्यास पदर लावून' "खरोखरच तो मेला हो महाराज. अहाहा, महाराज योग्यच बोलले!" असें म्हणावयास ती मंडळी नेहेमीं तयार असावयाची. त्यामुळें तर ह्या जहागिरदारांस आपण एक शतकृत्यच करीत आहोंत असें वाटत होतें. यांचे हस्तक आश्रित भटांपैकीं चिकटंभट हे फारच वस्ताद! यांनीं हेरतां हेरतां विनायकरावांच्या यमुनेचें स्थळ छान हुडकून काढलें. मुलगी साधारण चांगली. जहागिरदारसाहेब चारपांच हजार रुपये स्वतः खर्चण्यास तयार होतेच. चिकटंभटांनीं विनायकरावांभोंवतीं द्रव्याच्या लालुचीचें व दैववादिपणाचें जाळें गुंडाळण्यास हळुहळू सुरवात केली. व लवकरच त्यांनीं त्यास भक्कम आवळून टाकलें. "अहो, दैव का कुणास चुकलें आहे? तरुणाला देऊन देखील नाहींत कां पुष्कळ मुली विधवा होत? तेंच तिच्या दैवीं असलें,तर म्हातारा नवरा देखील नाहीं कां पुष्कळ वर्षें जगणार?" इत्यादि वरवर दिसण्यास गोड—कारण त्यास त्यांनीं द्रव्याचें गोड बोटहि लावलें होतें—अशा विधानांनीं त्यांनीं विनायकरावास आपल्या बाजूस वळविलें होतें.

"मग काय विनायकराव? आतांच्या आतां तुमच्यापाशीं पांच हजार रुपये मोजतों. शिवाय लग्नाचा सर्व खर्च आमच्याकडे. दागदागिने आम्ही करूं. मग आहे ना कबूल?" चिकटंभटांनीं आपल्या पाशाचा—जाळ्याचा—शेवटचा धागा आवळीत विचारलें.गरीब बिचारा विनायकराव! पांच हजारांच्या द्रव्यराशीस व फोल दैववादिपणास भुलला.

"होय. कबूल." विनायकराव म्हणाले. झालें, लग्न ठरलें. सरस्वती-

बाईचीही त्याला विशेष हरकत नव्हती. आणि त्यांना विचारतो कोण म्हणा ! नारायणानें ‘ हें ठीक नव्हें ’ वगैरे विनयशीलपणानें शक्य तितकें सुचवून पाहिलें. परंतु विनायकराव जात्याच दैववादी. जें व्हायचें तें होईल. दैव कुणास चुकत नाहीं, असें म्हणणारे. मग तसें म्हणतांना कदाचित् पाऊल टाकण्यांत ते चुकत असले तरी एकदां त्यांचे मनानें घेतलें कीं घेतलें. त्यांतून त्यांचा ज्योतिषावर मोठा विश्वास. दोघांच्या पत्रिका छान जुळतात. जहागीरदारसाहेबांना अजून पांचपंचवीस वर्षें सहज आयुष्य आहे असें त्यांची पात्रिकाच मुळीं सांगते, असें ते नेहेमीं म्हणत. झालें. लवकरच लग्नसोहळा ( ! ) होऊन बिचारी यमुना वृद्ध जहागीरदारांची पत्नी झाली ! परंतु अरेरे ! विनायकरावांच्या ज्योतिषाचे सर्व ठोकताळे चुकले आणि गरीब, तरुण, अल्लड यमुनेस आजन्म वैधव्यपंकांत लोटण्यास जहागिरदारांचें लवकरच एके दिवशीं दम्याच्या विकारानें प्राणोत्क्रमण झालें ! त्या वेळच्या दुःखाचें वर्णन कोठवर करावें ! पोरीचें नशीब फुटलें म्हणून यमुनेला पोटाशीं घेऊन धाय मोकलणाऱ्या सरस्वतीबाईची हृदयद्रावक स्थिति कोण वर्णील ? विनायकराव जरी ज्योतिषी व दैववादी असले, तरी कितीं केलें तरी तें पित्याचें हृदय ! आपणच नसत्या लोभास बळी पडून आपल्या पोरीच्या नाशास कारण झालों, असें वाटून त्यांस किती दुःख झालें असेल ! विनायकरावांचें मन आतां चांगलेंच पोळलें. सरस्वतीबाईचीही तीच स्थिति झाली. “ नारायण म्हणत होता तेंच खरें. त्याचें आम्ही ऐकलें नाहीं. ” असें वाटून त्या मातापित्यांस फारच वाईट वाटलें.

## प्रकरण ४ थें

## जातिभेद.

सायंकाळीं साडेसहाचा सुमार. भगवान् भानुराज अस्ताचलावर आपला आरक्त गोल ठेवीत होते. दिनमणीचीं आरक्तपीत किरणें पुष्पावतीच्या पात्रावर नाचत होतीं. सायंवायूच्या लहरी श्रांत मनास आनंद

देत होत्या. नदीतीरीं एक रम्य उद्यान होतें. त्यांत सर्व तऱ्हेचीं फळझाडें व फुलझाडें लाविलीं होतीं. जाई, जुई, चांफा इत्यादि पुष्पांचा सुगंध सर्वत्र दरवळून राहिला होता. उद्यानांत जागोजाग बसण्यासाठीं सोयी होत्या. मधूनमधून फरसबंदी कारंजीं होतीं. कारंजांचे तुषार आल्हाद-दायक होते. उद्यान प्रशस्त होतें. कुसुमपुरांतील बरीच मंडळी सायंकाळीं हवा खाण्यास उद्यानांत व नदीतीरीं येत असत. तसे आमचे नारायण-रावही—विनायकरावांचे चिरंजीव—आपल्या दोघां मित्रांसह नेहमीं इकडे फिरावयास येऊन कधीं नदीतीरीं एखाद्या रम्य घाटावर, तर कधीं उद्यानांतील एखाद्या कारंजाजवळील रम्य आसनावर बसून घटकाभर गप्पा–गोष्टी करीत असत. निव्वळ कांहीं तरी गप्पा मारायच्या, त्यापेक्षां उपयुक्त विषयांवर वादविवाद करावा हें जास्ती बरें, असें वाटून ह्या मंडळींनीं तसें ठरविलें होतें. यावरून ते इतर गोष्टी करीतच नसत असें नाहीं. परंतु मधूनमधून ते एखाद्या सामाजिक विषयावरही संभाषण करीत असत. कारण तसा त्यांचा विचारच होता. प्रत्येक रविवारीं एखादा सामाजिक विषय घेऊन त्याबद्दल त्या मंडळींत बरीच भवति न भवति होत असे. त्यांच्याबरोबर एक शास्त्रीबोवाही येत असत. हे शास्त्री म्हणजे अच्युतरावांचे येथें पूजेस असलेले ब्राह्मण होत. अच्युतराव हे नारायणरावांच्या मित्रांपैकीं एक व दुसरे होते त्यांचें नांव श्रीपतराव. शास्त्रीबुवा अच्युतरावांचे येथें पूजेस तर होतेच, पण शिवाय वरकड कामासही होते. ते त्यांचे येथें बरेच दिवस असल्यामुळें व शास्त्रीबुवांस सामाजिक विषयांची आवड असल्यामुळें तेही या मंडळींत येत असत व अच्युतरावही त्यास एक शक्य तर व जरूर तेथें उलट बाजूचे प्रतिनिधी म्हणून आनंदानें घेऊन येत. असो. आजहि रविवारची ही मंडळी नित्याप्रमाणें नदीतीरावर एका रम्य घाटावर स्थित झाली होती.

“ हं, अच्युतराव, मग वाचा पाहूं आपला जातिभेदावरील निबंध ” कांहीं वेळ विश्रांति घेऊन इकडल्या तिकडल्या गोष्टी झाल्यावर नारायण-राव म्हणाले.

“ ठीक आहे ” असें म्हणून अच्युतरावांनीं खिशांतून एक कागद

काढिला व " अटेन्शन् " म्हणून विनोदी शास्त्रीबुवांनी मंडळीस हंसविल्यावर, अच्युतराव आपला निबंध वाचूं लागले:—

" मित्रहो, आजचा विषय जातिभेद हा आहे. हा विषय बराच वादग्रस्त आहे. कांहीं जणांना वाटतें कीं, जातिभेदानेंच आमच्या देशाचा सत्यानाश केला, तेव्हां जातिभेद हा एकराष्ट्रीयत्वाला मोठा विघातक आहे. परंतु किंचित् खोल दृष्टीनें विचार करतां जातिभेद हा वाईट नसून जातिमत्सर हा एकीला विघातक आहे, असें आपणांस दिसून येईल. जातिभेद यास भेद या दृष्टीनें न पाहतां तो एकीलाच पुष्टिदायक आहे, ह्या दृष्टीनें त्याचा विचार करा. कारण, समाज ही एक मोठी व्यवस्था आहे व तिचीं सर्व कामें चालण्यास चार प्रकारच्या जातींच्या लोकांची—त्यास जाती नका म्हणूं हवेतर—पण चार तऱ्हेच्या लोकांची जरूर असते. ज्याप्रमाणें आपल्या शरीरांत मेंदू, हात, पोट व पाय असे चार विभाग मुख्यत्वेंकरून आहेत, तसेंच समाजाचे. त्यांतील बुद्धिमान लोकांचा—पारमार्थिक व ऐहिक गोष्टींचा आपल्या अप्रतिम बुद्धिमत्तेनें मिलाफ घालून देणाऱ्यांचा—एक वर्ग. मेंदूनें विचार करून जशी इतर अवयवांना दिशा दाखवावयाची तसेंच ह्याहि वर्गाचें काम. नंतर देशाचें परशत्रूपासून व अंतर्गत बंडखोरांपासून रक्षण करून स्वदेशविस्तार करणारा एक वर्ग स्वदेशाच्या अभिवृद्ध्यर्थ. तिसरा, स्वदेशांतलि व परदेशांतलि व्यापारउदीम पाहून स्वदेशाची व्यापारी भरभराट कायम ठेवणारा एक वर्ग व चौथा या सर्व वर्गांच्या नेहेमीं उपयोगी पडणारा सेवा करणारा एक वर्ग. हें अनुक्रमें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे होतात. या सर्वांची समाजधारणेस किती आवश्यकता आहे याचा आपणच विचार करा. जातिभेद हा कृत्रिम उपायांनीं मोडणें शक्य नाहीं. कोणच्याहि देशांत पहा. हा जातिभेद कोणच्या ना कोणच्या तरी रूपानें व नांवानें आहेच. प्रधानमंडळ, योद्धे, वैश्यवर्ग व नोकरवर्ग हा सर्वत्र आहेच. हाच विचार मनांत आणून भगवान् म्हणतात—" चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः. " आतां जातिमत्सर मात्र शक्य तितक्या उपायांनीं नाहींसा केला पाहिजे. सर्व जातींत ज्ञानप्रसार होऊन त्यांची सुधारणा झाल्याशिवाय त्यांच्यांत एकोप्याचें व स्वदेशसेवेचें बीं रुजणार नाहीं. आतां जन्माप्रमाणें जात

कीं गुणाप्रमाणें जात,हा मोठा प्रश्न आहे व भगवंतांचा अभिप्राय दुसऱ्या तऱ्हेचा असावा असें मला वाटतें. परंतु एकदां सामाजिक व्यवस्थेसाठीं चातुवर्ण्याची सर्व व्यवस्था लावून दिल्यावर ह्या प्रश्नाला फारशी जागाच राहात नाहीं. त्यांतून ब्राम्हणेतर जातींत जन्म पावूनहि जो तितक्या योग्यतेला पोहोंचला त्याचा योग्य मान समाज ठेवतोच. " जयाची वदे पूर्ण वेदांत वाणी । कसें हो वदावें तयालागिं वाणी ?" असें पंडित म्हणतात. मयूरानें तर अशा सर्व संतांना साष्टांग नमस्कार घातला आहे. तेव्हां गुणालाच जातीपेक्षां जास्त महत्त्व आहे हें सिद्ध होतें. तसे गुण दाखवावे आणि मग बाता माराव्या. असो. तथापि या अपवादात्मक गोष्टीमुळें, सर्व अवयव जर आपापलें काम नीट करीत असले तर, समाजव्यवस्थेस मुळींच बाध येत नाहीं. ह्या समाजव्यवस्थेचा विचार भगवंतांनीं भगवद्गीतेंत पूर्णपणें केला आहे. चौथ्या अध्यायांत चातुर्वर्ण्यव्यवस्था सांगितल्यावर अठराव्या अध्यायांत प्रत्येकाचें स्वभावज कर्म सांगितलें आहे. तें असें:—

" शमो दमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च ।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रम्हकर्म स्वभावजम् ॥
शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनं ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥
कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥"

याप्रमाणें कर्मांची विभागणी समाजधारणेस परिपोषक अशा रीतीनें करून नंतर समाजाचा गाडा सुरळीत चालावा, चातुर्वर्ण्यव्यवस्थेंत मात्सर्याचें बंड माजूं नये, यासाठीं त्यांनीं व्यवस्था केली कीं:—

" स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते पराम् ।"

एवढेंच कीं, हीं कर्में निष्कामबुद्धीनें व निरहंकारभावानें करावीं—कर्तव्य म्हणून करावीं—म्हणजे त्यायोगें—

" यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततं ।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥ "

अशा रितीनें " जो जो भागासि आला अधिकार " तो उत्कृष्ट रितीनें पार पाडावा, म्हणजे तीच परमात्म्याची पूजा—अभ्यर्चना होय.

आणि त्यांनीच परमात्मा संतुष्ट होऊन तो जीवांस परा संसिद्धि—मोक्ष—देतो, हळुहळू त्याची उन्नति करून त्यास शेवटीं स्वपदाप्रत आणतो. अर्थात् हें सर्वसाधारण समाजव्यवस्थेसंबंधीं होय. अशी परमात्म्यानें सर्व व्यवस्था लावून दिली आहे. परमात्म्याचे घरींहि कर्तव्यकर्मात्मक गुणालाच मान आहे. जो तें पाळतो त्यास चांगलें बक्षिस मिळतें. जो तें झुगारून देतो त्याचा अधःपात होतो. याचा अर्थ असा नव्हे कीं, कोणी उन्नत्यर्थ यत्न करूं नये. ज्याला उच्चवर्गाचा इतका सात्विक हेवा वाटत असेल त्यानें विश्वामित्रासारखी तपःसिद्धि मिळवावी आणि मग खुशाल ब्रह्मर्षींच्या पंक्तीला बसावें. पण असे कितीकांचे हातून होणार ? यानें समाजशकटाचे गतींत बाध येण्याचें कारण नाहीं. आणि कोणीहि आपणांस आपल्या जातीबद्दल वाईट वाटून घेण्याचें कारण नाहीं. “धंदा कोणचाहि असो. तो प्रामाणिकपणानें करणारा मनुष्य श्रेष्ठ ठरतो.” हें महात्मा बुकर टी. वॉशिंग्टन्चें वाक्य “स्वे स्वे कर्मण्यभिरतः” याचेंच अनुवादक आहे. यावरून समाजव्यवस्थेची सांगड घालून त्याच्या धारणेची योग्य सोय परमात्म्यांनीं शक्य तितकी लावून दिली. आतां अठरापगड जातींची व त्यांतील अनंत पोटजातींची जी बजबजपुरी माजली आहे ती केव्हांहि इष्ट नव्हे, व परमात्म्यासहि ती इष्ट नव्हती. तेव्हां, सर्व पोटजाती एक होऊन केवळ चार जाति—ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र—अशा समाजधारणेकरतां निर्मत्सर होऊन राहून जर त्यांनीं एकोप्यानें काम केलें तर कार्य होईल, असें वाटतें. तेव्हां जातिभेद पाहिजे पण जातिमत्सर नको, असें शेवटीं ठरतें.”

याप्रमाणें अच्युतरावांचें निबंधवाचन झाल्यावर मंडळींनीं त्यांची बरीच वाहवा केली व मग बरीच संध्याकाळ झाल्यामुळें मंडळी घरीं जाण्यास उठली.

## प्रकरण ५ वें.

# अच्युतराव व श्रीपतराव

आतां पुढें जाण्यापूर्वी वाचकांस अच्युतरावांचा व श्रीपतरावांचा थोडाबहुत जास्त परिचय करून देणें जरूर आहे. अच्युतरावांचे वडील एक बडे पेन्शनर असून कुसुमपूरचें हवापाणी चांगलें व गांवास नदी असल्यामुळें व दुसऱ्या बऱ्याच सुखसोयी असून एकंदर गांव रमणीय असल्यामुळें ते पेन्शन घेऊन एथेंच रहात होते. त्यांस एकंदर दोन अपत्यें. एक आमचे अच्युतराव व दुसरें सुशिला. अच्युतरावांचें वय सुमारें १९ असून ते सध्यां इंटरमीजिएटच्या क्लासमध्यें होते. जात्याच ते बरेच हुशार. सुशिलेचें वय १३ वर्षांचें असून तीहि जात्या बरीच हुशार व चुणचुणीत पोर होती. अच्युतरावांचे वडील सारासार विचार करून बनविलेल्या पूर्ण सुधारकी मताचे कृतीनें अनुयायी असल्यामुळें, त्यांनीं सुशीलेस लहानपणींच शाळेंत घातलें असून विद्यामृताची गोडी आपल्या अच्युताप्रमाणें तिनेंहि चाखावी, अशी त्यांची इच्छा होती. ते नुसते ओष्ठसुधारक नव्हते. प्रौढविवाह, स्त्रीशिक्षण, हुंडयाची अनिष्ट चाल, पुनर्विवाह, जातिभेद, इत्यादि विषयांवरील लेखांचा, निबंधांचा, व पुस्तकांचा त्यांचा सांगोपांग अभ्यास करण्याचा यत्न चालू होता. त्यांच्या पत्नीहि सुशिक्षित असून सुज्ञ व विचारी होत्या. इतर बायकांप्रमाणें आमचे वाडवडील करीत आले म्हणून केवळ आम्ही करणार असें त्यांचें कधींच नव्हतें. त्या प्रत्येक गोष्टींतील हेतू व उपयुक्तता पाहून त्याप्रमाणें त्याचा स्वीकार किंवा त्याग करीत. चांगल्या रीति व चांगल्या संवयी—मग त्या दुसऱ्यापासून घेण्यासारख्या असल्या तरी त्या घेत असत. व वाईट चाली व वाईट रीति—मग त्या आपल्या जरी असल्या तरी—यांचा त्या त्यागच करीत. केवळ आपलें म्हणून त्या त्यांस कधींहि उराशीं बाळगून बसत नसत. सुशिला सध्यां इंग्रजी तिसऱ्या यत्तेंत होती. अच्युतरावांच्या घरच्या मंडळींचा स्वभाव लहानापासून थोरापर्यंत गोड व मनमिळाऊ असे. विनयशीलता त्यांत जागोजाग दृग्गोचर होई. असो.

आतां श्रीपतरावांच्या परिचयाकडे वळूं. श्रीपतराव बी. ए. एल्‌एल्. बी. होऊन कांहीं वर्षांपूर्वी येथें येऊन राहिले होते. त्यांचे वडीलहि वकीलच

असून त्यांनीं बरीच माया केली होती. श्रीपतरावांच्या दुर्दैवानें त्यांचे वडील त्यांच्या लहानपणींच वारले. श्रीपतरावांच्या मातोश्रीवर हा दुर्धर प्रसंगच ओढवला. परंतु ती घरीची बायको. ती शहाणी होती. इतर बायांप्रमाणें 'आतां काय करूं ?' म्हणून रडत बसणारी ती नव्हती. श्रीपतराव त्यांचा एकुलता एक मुलगा. परंतु त्याचे फाजील लाड न करतां त्यांनीं त्यास योग्य शिक्षण देवून नांवारूपास आणिलें व त्याचेंच मधुर फल ते सध्यां चाखीत होते. परंतु बिचाऱ्या मातोश्रीस अजून दुःखानें पूर्ण सोडलें नव्हतें. त्यांची सोन्यासारखी सुग्रण सून श्रीपतरावांच्या विवाहानंतर एकाएकीं कांहीं रोगाची बाधा होऊन परलोकवासी झाली. लग्न होऊन पुरतीं वर्षे दोन वर्षेंहि झालीं नाहींत तोंच हा दुर्धर प्रसंग आला. श्रीपतरावांचें वय सध्यां २४-२५ चे सुमाराचें होतें. ते सध्यां विधुरावस्थेंतच होते. ऐन तारुण्यांत हुशार व सुग्रण भार्या मृत झाली असतां होणाऱ्या शोकाची कल्पना, तसा दुःखदायक प्रसंग ज्यांवर दुर्दैवानें ओढवला असेल त्यांसच होणार आहे. असो. श्रीपतरावांचें घर-बिऱ्हाड-विनायकराव जोशांच्या घराशेजारींच बंगलेवजा हवेलींत होतें. त्यामुळें त्यांचा आणि आमच्या नारायणरावांचा आणि पर्यायानें अच्युतरावांचाहि बराच परिचय होऊन मतैक्यामुळें त्यांचें दृढमैत्रींत पर्यवसान झालें होतें. अस्तु.

## प्रकरण ६ वें.

## विठ्ठलमंदिरांत.

तो एकादशीचा दिवस होता. कुसुमपूर गांवापासून मैल दीड मैल अंतरावर असलेल्या एका घनदाट छायेच्या जागेंत एक मोठें विठ्ठलमंदिर होतें. मंदिरांत चोहोंबाजूंनीं मोठमोठे सोपे अथवा ओऱ्या होत्या. देवालयांत आज बरेच दिवस एक मोठे साधु येऊन उतरले होते. बुवांचें शिष्यमंडळहि बरेंच मोठें होतें. साधुबुवांची एकंदर साधुत्वाविषयीं बरीच ख्याति होती. ते तासचे तास समाधी लावून बसले म्हणजे ब्रह्मानंदांत नुसते डुलत असतात. महाराज म्हणजे परद्रव्य नुसतें विषासारखें

मानतात. त्यांना कोणाच्या कवडीची अपेक्षा नाहीं अशी त्यांची सर्वत्र कीर्ति. मग तर काय, त्यांच्या दर्शनाला मंडळींच्या—विशेषेंकरून बायकामंडळींच्या—नुसत्या उड्यावर उड्या पडत असत. त्यांतून आज एकादशी. देवदर्शनच्या देवदर्शन होऊन महाराजांचेंहि घटकाभर प्रवचन ऐकावयास सांपडेल,या हेतूनें आज देवळांत नुसती ही गर्दी झालां होती. महाराजांचें दररोज—त्यांतून एकादशीसारख्या पवित्र दिवशीं तर फारच बहारीचें प्रवचन चाले. त्यांची ती भव्य मूर्ति, भस्माचें पुंड्र सर्वांगावर लावलेलें, त्यावरच गोपीचंदनाच्या मुद्रा रेखवि ठोकून दिलेल्या, गळ्यामध्यें बारीक मण्यांची तुळशीची माळ रुळत आहे, अशा थाटांत आज प्रवचनाची बहार उडत होती. दोहों बाजूंनीं श्रोतेजनांची नुसती थाप बसून राहिली होती. प्रवचन ऐन रंगांत आलें होतें. महाराज बोलत होतेः—

" नरदेह हा क्षणभंगुर आहे, संसार असार आहे, मृगजलामागें धांव घेणाऱ्या हरिणपाडसाप्रमाणें केवळ सुखाभासास व सौख्यतरंगास भुलून आम्ही या संसारांत सैरावैरा धांवत आहोंत. परंतु आमची क्षणोक्षणीं निराशा होते आहे. आणि हें साहाजिकच आहे. कारण " दुःखमूळ हा संसार " अशा तऱ्हेचे तुकाराममहाराजांचे उद्गारच आहेत. ज्या वृक्षाचें बीजच कटु आहे त्यास मधुर फलें कोठून येणार ? त्याप्रमाणें ज्याचें मूळच दुःख हें आहे, तें सर्व दुःखमयच असणार. परंतु हें आम्हांस उमगेना. आणि म्हणून स्त्रीपुत्रादिक क्षणिक मायेच्या देखाव्यास आम्ही भुलून पडलों; आणि शाश्वत सुखाचा मार्ग सोडून दिला. विषयांच्या नादीं लागून आम्ही आपली फसगत करून घेत आहोंत. या विषयापासून कां कोणास सौख्य लाधणार आहे ? समर्थ आपल्या करुणाष्टकांत म्हणतातः—" विषयजनितसूखें सूख होणार नाहीं. " अहाहा ! या करुणाष्टकांत दासांची वृत्ति किती गहिंवरलेली आहे ! ज्ञानेश्वरमहाराजहि अनंत उपमा देऊन विचारतात कीं," बाबा रे, इंगळाच्या—अग्नीच्या—शय्येवर शयन केलें असतां सुख होईल काय ? किंवा—

" अगा विषाचिये कांदे वाटुनी । जो रस घेईजे पिळुनी ।
तया नाम अमृत ठेवुनी । जेवि अमर होणें " त्याचप्रमाणें ह्या विषयाची गोष्ट आहे. म्हणून—

" तेवि विषयाचें जें सुख । तें जाण पा केवळ दुःख " असा त्यांचा

उपदेश आहे. तथापि आम्ही अज्ञ लोक ह्याच विषयाला भुलून मोहून गेलों. यांतून सुटका व्हावी अशी इच्छा असेल, तर अनन्यभावें परमात्म्याला शरण जाऊन त्याची भक्ति केली पाहिजे. याशिवाय दुसरा उपाय नाहीं. षड्रिपूंचें निर्दालन करून परधन व परस्त्री यांपासून पूर्ण अलिप्त राहिलें पाहिजे. नुसतें वरचें ढोंग काय कामाचें? खरी निष्ठा, खरी भक्ति, आणि खरी कळकळ पाहिजे.''

अशा तऱ्हेनें महाराजांचा वाक्गंगौघ अव्याहत वहात होता. अर्ध्या पाऊण तासांनीं त्यांनीं आपल्या प्रवचनाची समाप्ति केली. सर्व श्रोतेजनांनीं अनन्यभावानें त्यांचें दर्शन घेतलें. व मंडळी हळुहळू आपापल्या घरोघर चालती झाली. कोणीहि शिल्लक राहिलें नाहीं असें पाहून महाराज हळुहळू उठले व आपल्या एका शिष्यास घेऊन ते आपल्या सौख्यागारांत गेले व चिलमीचे दोनचार दम मारून धुराचे लोळ आकाशांत सोडीत सोडीत आपल्या शिष्यास वदते झाले:—

"क्यौं बे इच्छाराम, थाटतो अच्छा हो गये नै अब?''

"ये क्या कहने के बात है? सब बेमालूम हो गया!'' शिष्यांनीं हंसतमुखानें लाळ घोटली.

## प्रकरण ७ वें.

# स्त्रीशिक्षण.

दुपारचे चार वाजण्याच्या सुमारास सुमतिबाईच्या—अच्युतरावांच्या मातोश्रींच्या—घरांतल्या माडींतील एका प्रशस्त हॉलमध्यें शिरस्त्याप्रमाणें "महिलासमाज'' जमला होता. स्त्रिया या जात्याच पूर्वापार: चालत आलेल्या रूढीस चिकटून बसणाऱ्या. त्यांत अज्ञानाची भर. मग काय विचारावें? तथापि, शक्य तितका यत्न करून, आपल्याकडून होईल तितक्या प्रयत्नानें हें अज्ञान घालवून, त्याजबरोबरच अंधपरंपरेस चिकटून राहण्याची संवय दूर करण्याचा यत्न करून, "स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, हुंड्याची अनिष्ट चाल, स्वदेशीव्रतपालन'' इत्यादि मुख्यत्वें

सामाजिक व एकाद दुसऱ्या सोप्या अशा राष्ट्रीय विषयाची पूर्ण उपयुक्तता आपल्या भगिनींच्या मनावर बिंबविण्याचा यत्न करून, अशा रितीनें थोडीबहुत कां होईना, समाजसेवा करण्याचा आमच्या सुमतिबाईचा विचार होता. यासाठीं त्यांचा खासगी यत्नहि—वाचन—वगैरेंचा दांडगा असे. प्रत्यक्ष कृतींत त्या कशा होत्या हें एका प्रकरणीं येऊन गेलेंच आहे. तेव्हां त्यांच्याच यत्नाचें फल हा 'महिलासमाज' होय. या समाजांत मुख्यत्वेंकरून अज्ञान व जुन्या चालीच्या बाया असत. आणि अशांचाच व्यामोह दूर करून, त्यांस आपल्या पूर्वीच्या सामाजिक वैभवाची व सद्यःकालीन असलेल्या अवनतावस्थेची पूर्ण ओळख करून देऊन, त्यांच्यांत या विषयाची पूर्ण जाणीव उत्पन्न करावयाची, असें त्यांचें उद्दिष्ट असे. सर्व 'समाज' जमल्यावर सुमतिबाई म्हणाल्याः—

"मातांनो, आज आपण स्त्रीशिक्षणाचा विचार करूं. स्त्रियांस शिक्षण देणें—तें कोणच्या तऱ्हेचें असावें तें मग पाहूं— हें किती अवश्य आहे याचा आपणच विचार करा. लहान मुली ह्याच पुढें प्रौढ स्त्रिया होऊन बालकांच्या माता होत असतात. आणि मातेची योग्यता काय वर्णावी ? "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी" असें प्रभु रामचंद्र म्हणतात. प्रत्यक्ष स्वर्गाहूनहि जर कांहीं गोष्टी गरीयस म्हणजे श्रेष्ठ असतील तर त्या दोनच गोष्टी होत. आणि त्यांतहि पहिली म्हणजे जननी किंवा माता. अशी या मातेची योग्यता आहे. "जिच्या हातीं पाळण्याची दोरी ती जगा उद्धरी" असा तिचा अधिकार आहे. मोठमोठे शूर, वीर, पंडित, कवि, मुत्सद्दी वगैरे निर्माण होण्यास त्यांस लहानपणीं मातृशिक्षणच कारण झालेलें असतें. त्यांच्या अंगीं वसणाऱ्या अद्वितीय गुणांचें बीजारोपण त्यांच्या शैशवावस्थेंत त्यांच्या मातेकडून होत असतें. शिवाजीमहाराजासारखा देदीप्यमान मोहरा निर्माण होण्यास त्यास जिजाईसारखी अलौकिक धन्या माताच बहुतांशीं कारण झाली. नेपोलियन बोनापार्टचे असे उद्गारच आहेत कीं, "जर माझ्या अंगीं कांहीं गुण वसत असतील तर त्याचें सर्व श्रेय माझ्या मातेकडे आहे." नेपोलियनप्रमाणेंच अनेक थोर पुरुषांचेंहि तसेच उद्गार आहेत. ते कोठवर सांगावे ?

सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं, अशातऱ्हेची जबाबदारी ज्यांच्यावर,

त्यांच्या शिक्षणाची हयगय करणें किती अहितकारक आहे याचा नीट विचार करा. पुरुष आणि स्त्री ही संसाराचीं दोन अंगें होत. संसार आणि परंपरेनें सर्व समाज सुखरूप व्हावा अशी इच्छा असेल तर दोघांचेही विचार एक, आचार एक, इच्छा एक, वासना एक, याप्रमाणें त्यांचें प्रत्येक गोष्टींत ऐक्य असावयास नको काय? कारण 'ऐक्यांतच मौज' आहे. स्त्रिया सुशीक्षित झाल्याशिवाय आमच्या समाजाची उन्नति कशी होणार ? बाहेर पुरुष एखाद्या अत्युत्तम सुधारणेचा किंवा एखाद्या राष्ट्रकार्याचा निश्चय करून घरांत आल्यावर, तेथें जर आपण त्यांस पूर्ण सहानुभूतिदर्शक प्रोत्साहन देणार नाहीं, तर त्यांची किती निराशा होईल बरें ? प्रत्येक सामाजिक किंवा राष्ट्रकार्योंत त्यांच्या प्रत्येक उत्साहाच्या क्षणीं आपण अज्ञ स्त्रियांनीं अज्ञपणें जर त्यांस मागें खेंचून धरलें व त्यांची निराशा केली, तर आपलें व त्यांचें पाऊल पुढें कसें पडणार ? स्वदेशीसारख्या साध्या व्रतपालनाचे बाबतींत देखील निव्वळ हौशीखातर आपण स्त्रिया जर आपल्या अज्ञानानें पडोघडीं त्यांची निराशा करूं लागलों, तर त्यांचा किती उत्साहभंग होईल याचा आपणच विचार करा. अज्ञान—आणि त्यांतल्या त्यांत तें स्त्रियांच्या बाबतींत तर विशेषच—हें नेहेमीं मूर्खपणामुळें उत्साहभंग करणारें आहे. आपल्या समाजांत शिरलेल्या कांहीं वेडगळ व खुळचट चालींचें निर्मूलन करण्याचे बाबतींत जर अडथळा होत असेल तर तो आपणां अज्ञ स्त्रियांकडून. हा सर्व अज्ञानाचा दोष आहे. आधींच स्त्रियांचा स्वभाव जात्याच 'कॉन्झरव्हेटिव्ह' म्हणजे "तातस्य कूपोऽयम्" सारखा अंध गतानुगतिकत्वाचा. त्यांत अज्ञानाची भर पडल्यावर मग काय विचारावें ? परंतु एकदां का ज्ञानरवि उदयास आला म्हणजे त्याच्या उज्ज्वल, कल्याणकर::किरणांनीं अज्ञानतिमिराचा लोप होऊन त्या तिमिराबरोबरच सर्व 'सुपरस्टिशस् आयडिआज्' म्हणजे वेडगळ समजुतींचा लोप होईल. आणि मग सामाजिक व राष्ट्रीय सुधारणा झपाट्यानें होण्यास हरकत नाहीं. मातांनो, मी हें आपणास नवीन कांहीं सांगत आहे असें नव्हे. आपला आर्यदेश एके काळीं वैभवाच्या व सुधारणेच्या अत्युच्च शिखरावर होता. याज्ञवल्क्याबरोबर ब्रह्मज्ञानासंबंधीं वादविवाद करणाऱ्या गार्गीकडे आपण पाहा. दुर्योधन आपला आत्मनाश करून घेतों आहे असें पाहून त्यास उपदेश करून थकल्यावर प्रत्यक्ष कुंतीला त्यास कांहीं राजकारणाच्या व नीतीच्या

चार गोष्टी सांगण्यास पाचारण केलें जातें ही गोष्ट लक्षांत घ्या. सध्यांच्या एखाद्या मनुष्यास जर आपल्या पत्नीचें या बाबतींत काय मत आहे, असें विचारलें तर, " I am sorry she knows nothing of it " अशा तऱ्हेचे खेदाचे व लज्जेचे उद्गार काढावे लागणार नाहींत काय ? अशीं अनंत उदाहरणें देतां येतील. घरांतील सर्व कामधाम झाल्यावर दुपारचे प्रहरीं आयाबाया जमून " अमकी अशीच आहे, अन् तमकी तशीच आहे " अशा तऱ्हेनें परनिंदा करीत बसण्यापेक्षां, एखाद्या पोथी-पुराणाचें किंवा उपदेशपर असें पुस्तक वाचीत बसल्यास करमणूकच्या करमणूक होऊन ज्ञानप्राप्तीहि होणार नाहीं काय ? अज्ञपणाबरोबर अनंत दुर्गुणांचाहि वास असतो. आणि जसें आईचें शिक्षण तशीं तिचीं मुलें. तीच आई जर अज्ञानी—आणि म्हणूनच पुष्कळ वेळां दुर्गुणी—असली, तर मग मुलगा चांगला कोठून निपजावा ? चोरीबद्दल फांशी जाणाऱ्या मुलानें आपल्या आईच्या कानाचा चावा घेऊन काढलेले उद्गार लक्षांत ठेवण्यासारखे नाहींत काय ? तेव्हां आत्मोन्नति, समाजोन्नति, देशोन्नति, ज्ञानप्राप्ति, इत्यादि सर्व दृष्टींनीं विचार करतां शिक्षणाची—आणि सध्यांच्या विषयाप्रमाणें—स्त्रीशिक्षणाची किती आवश्यकता आहे, हें दिसून येईल.

आतां शिक्षण कशा तऱ्हेचें असावें, हा एक मोठा वादग्रस्त प्रश्न आहे व जरी त्यावर इतकी भवति न भवति होत आहे तरी तो अजून पूर्णपणें सुटला नाहीं. तथापि,जेणेंकरून मुलगी पुढें शहाणी, सुज्ञ व हुशार सुगृहिणी निपजेल, अशा तऱ्हेचें तें असावें; जेणेंकरून विनय व शालीनतेस बाध येणार नाहीं, अशा तऱ्हेची त्यांत खबरदारी घेतली जावी, एवढें सांगितलें म्हणजे बस् आहे. "

## प्रकरण ८ वें.

## साधूंचे स्वगत आलाप !

आमचे साधूजी एके दिवशीं रात्रीं आपल्या पलंगावर बसले होते. समोर दारूच्या बाटल्या व ग्लास होता. जवळच हुक्काहि होता. पुष्पांचे

गुच्छहि एका तबकांत व्यवस्थित ठेवले होते. पानतंबाखू खाऊन, हुक्क्याचे एकदोन दम मारून पुष्पगुच्छांचा सुगंधित वास घेत स्वारी रंगेलपणानें आज पलंगावर पडल्या पडल्या पूर्ण खुषींत येऊन बोलत होती:—

" कशी मजा आहे पहा. आमच्यासारखे सुखी दुसरे कोण आहेत ? ह्या साधुत्वाची कल्पना प्रथम कोणी काढली असेल तो प्राणी मोठा रंगेल खरा. कारण कांहीं एक श्रम न पडतां कशी पण मजा मारतां येते ! पुन्हा साधु म्हणून प्रसिद्धी आहेच. मी या सोनेरी टोळींत मिसळल्याला आज जवळ जवळ दहा वर्षें झालीं. पण आपलें काम या सध्यांच्या वेषांत जसें साजतें आहे तसें कधींच साजलें नाहीं. निरनिराळे वेष आमच्यापाशीं जय्यत तयार. त्या वेषांत असाच कुणाला तरी लुबाडावा पांचपंचवीस हजाराला आणि बसावें कांहीं काळ या वेषांत वरकरणीं पूर्ण साधुत्वाच्या गप्पा मारून आंत मजा करीत ! इतकी वरची झकपक असल्यावर सावजांला काय कमी ? आमची बायको चांगली आहे. पण करायची काय ? बसली असेल कुठें तरी भाकऱ्या भाजीत. अहो, रुचिवैचित्र्याशिवाय मजा नाहीं. फुलपांखरूं नाहीं का—या फुलावर कांहीं वेळ, त्याचा कंटाळा आला म्हणजे दुसऱ्या फुलांवर कांहीं वेळ—असें करीत ? भ्रमरदेखील एकाच कमलांतला मकरंद सेवन करतो का ? कांहीं वेळ या कमलाचा आस्वाद, तर कांहीं वेळ त्या कमलाचा. अशी निसर्गाची देखील आवड आहे. प्रत्येक मकरंद जसा निरनिराळा, मधुर व सेव्य आहे तशीच सर्व सुंदर स्त्रीजात ही एक उपभोग्य चीज आहे. चार दिवस आहे, तोंवर मजा मारून घ्यावें झालें. पुढचें कोणी पाहिलें आहे ? आणि पुढें तरी काय आहे ?—

" यावज्जीवं सुखं जीवेत् ऋणं कृत्वा घृतं पिबेत् ।
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ? "

असें खुद्द चार्वाकच म्हणतो आहे. हा देह जळून गेला म्हणजे संपलें. म्हणे पुनर्जन्म आहे ! मूर्खपणाच्या कल्पना आहेत झालं कांहीं तरी. त्यापेक्षां आहे तोंवर चैन मारावी हें खरें. बरें पण अजून आमची छबकडी कशी येत नाहीं ? हें पांखरूं—पाखरूं म्हणजे धंदेवालेंच, पण नुकतेंच मार्गाला लागणारें—आम्ही असेंच गांठलें. म्हटलं, "चंद्रे, तूं अशी दुकान

उघडून बसणार, तर चलना आमच्या बरोबर? देऊं तुला तुझ्या योग्यते प्रमाणें. '' मारूं मजा चार दिवस अन् देऊं पुढें सटवीला—'' पण इतक्यांत दारावर बारीक थाप पडली व एक सोळासतरा वर्षांचें साधु- जींचें सुंदर उपवस्त्र आपल्या मृदुल पदांतील किंकिणींचा झंकार करीत आंत आलें. आज चंद्राबाईहि खूप रंगल्या होत्या.

" कां जरा उशीर लागला? '' साधूंनीं विचारलें.

" कोण बाई तरी त्रास तो गणपतराव—चुकले, साधुराज. तो जोगि- णीचा वेष उतरून ठेवून पुन्हा तुमची छबकडी चंद्रा तर बनलें पाहिजे ना? '' चंद्रा म्हणाली.

" हो तर. अग असा थोडासा त्रास झाला तरी पण मजा कशी आहे? बरं तें जाऊं दे, पण चंद्रे, आजचें मद्य कांहीं विशेष बहारीचें आहे बुवा ! '' साधुजी म्हणाले.

" मग ही दासी कुठें सेवेला तत्पर नाहीं? '' चंद्रेनें हंसत हंसत नेत्रकटाक्ष फेंकीत उत्तर दिलें. साधुजी पार चीत होऊन गेले. याप्रमाणें नयनबाणानें त्यास विद्ध करून मद्याचे ग्लासावर ग्लास आमच्या चंद्रेनें त्यास पाजले. लवकरच त्याचा अंमल—कैफ—धुंदी चढून साधूंची ब्रम्हानंदी टाळी लागली व बेहोषपणें ते पलंगावर पडले. नंतर चंद्रा—हतभागी चंद्राहि तेथेंच निद्रिस्त झाली.

## प्रकरण ९ वें.

# मट्टींतील जलसा.

संध्याकाळ झाली. साधुजींच्या मट्टींत आज सर्वत्र बहारीची रोषणाई केलेली होती. तो शुक्रवारचा दिवस होता. देवळांत एका ओटीवर अस- णाऱ्या माडीत आज जलशाचा थाट उडणार होता. साधुजींच्या प्रवच- नाला येणाऱ्यापैकीं कांहीं चतुर व बाहेरख्याली लोकांनीं साधुजींच्या शेजारी बसणाऱ्या तरुण बैरागिणींचा थाट तेव्हांच ओळखला असून

साधुजींचा तोच धंदा असल्यामुळें त्या शेलक्या शेलक्या व संभावित (?) मंडळींचें केव्हांच जमून गेलें होतें. हाय ! हाय ! नरकपुरीचा शृंगारिक थाट ! पण त्याची किळस उपजण्याकरतां तो बहारीनें वर्णावा लागतो.

दिवाणखान्यांत फारच बहारीची रोषणाई केली होती. आमच्या चलाख इच्छारामानें त्यांत कांहींच कमी पडूं दिलें नव्हतें. सर्वत्र गालिचे पसरले असून मधून मधून लोड ठेवले होते. दोन अत्यंत देदीप्यमान दिवे झगझगत होते. जागोजाग फुलांच्या माळा टांगल्या असून कांहीं उत्कृष्ट पात्रांतूनहि निरनिराळ्या तऱ्हेच्या सौगांधिक फुलांचे गुच्छ ठेवलें होते. पानसुपारीचें तबक व शांपेन दारूच्या बाटल्या चमकत होत्या. हळुहळु रात्र होऊं लागली. दहाचा सुमार झाला. नानासाहेब, दादासाहेब वगैरे मंडळी येऊन रंगेलपणानें सोधूर्शा गप्पा करीत होती. जलशाची पूर्वतयारी फार बहारीची होती. पेटी, तबला, सारंगी, वीणा इत्यादि हळुहळु येऊन दिवाणखान्यांत आधिष्ठित झालीं. इतक्यांत चंद्राबाईहि आपल्या मंजुळ नूपुरांचा झणत्कार करीत विजलीसारखी चमकली. आज चंद्राबाईचा थाट मोठा बहारीचा होता. तरुण ललनेच्या कोमल शुभ्र गुलाबी देहाला झिरझिरीत गुलाबी पातळानें जणूं झाकलेंच नव्हतें. उन्नत वक्षःस्थलावर एक मोत्यांची माळ चमकत होती. पारवा शालू अंगावर विराजत होता. नानातऱ्हेच्या झगझगीत रत्नसुवर्णादि अलंकारांनीं ती विनटली होती. कानांत डुलणारे हिरव्यागार पाचेचे लोलक लोकांचे नयन आकर्षित होते. अत्यंत सुवासिक तैलानें केशकलपांचा काढलेला उलटा भांग मुखाला फारच शोभा आणीत होता. केशरचना फारच मजेदार होती. चंद्राबाईचे बिंबाप्रमाणें असणारे ओष्ठ मधुर तांबूलभक्षणानें फारच खुलत होते. त्याचा रक्तरस खालीं जातांना अत्यंत नाजुक व शुभ्र कंठावर दिसत होता. हरिणाक्षी आपल्या चंचल नयनांच्या अर्थपूर्ण क्षेपानें जनांचें हृदय आकर्षित होती.

" काय चंद्राबाई, उशीरसा झाला वर यायला ? " नानासाहेबांनीं विचारलें.

" करतां काय ? आपल्यासारख्यांच्या पुढें यायचें, म्हणजे त्यांनीं

खूष तर नको का व्हायला ! '' असें म्हणून ती हंसली. चंद्रज्योत्स्नेचा प्रकाश पडला. चंद्रा हें नांव तिला सार्थच होतें. सारंगी व पेटीचे मधुर आलाप निघूं लागले. तबला बरोबर लागला. चंद्रा आपल्या जाग्यावर बसली.

'' हं. दादासाहेब, घ्या एक पेला '' साधुजींनीं बाटलींतील मद्य एका पेल्यांत ओतून त्यांच्यापुढें करीत म्हटलें.

'' आज सर्वांनींच तें घ्यावयाचें बरें का ! '' चंद्रा हास्य करीत म्हणाली. सर्व मंडळींनीं वारुणीचा माफक आस्वाद घेतला. नंतर, '' हं, होऊं द्या बुवा एकदां बहार चंद्राबाई '' असें सर्वांनीं रंगेलपणें म्हटल्यावर सारंगी व पेटीच्या मधुर सुरांत रमणीच्या कंठांतून कोमल आलाप बाहेर पडूं लागले. आलापांत आलाप, तेजांत तेज मिसळूं लागलें चंद्रा गाऊं लागली. त्या वेळच्या योग्य अशा पद्यानें व त्यांतच होणाऱ्या विषयोन्मादकारक अशा तिच्या हावभावानें मंडळी नुसती चीत झाली. रंगेल नानासाहेब तर, '' वाहवा, आहा, खाशी, '' करीत पुढें सरकूं लागून आतांच तिला आलिंगन देतात कीं काय,असें वाटूं लागलें. या चाललेल्या प्रकारानें खूष होऊन साधुजी आपल्या इच्छारामाकडे पाहून स्मित करीत होते. मधूनमधून चंद्राकडेहि ते अर्थपूर्ण पाहत होते. या मरमरो धडपडणाऱ्या सावजांना तूं आपल्या पाशांत चांगलेंच बांधून घातले आहेस, मोहिनीप्रमाणें आपल्या हावभावांनी व अंगविक्षेपांनीं तू ह्यांना विमूढ करून चांगलीच धुवून काढणार, असेंच जणूं काय ते त्यानें सुचवीत होते. गाणें थांबलें. सारंगी हळुहळू शांत झाली.

'' छे, बुवा, आपण तर गार झालों अगदीं ! '' नानासाहेब देहभानावर येऊन म्हणाले. पुन्हा एकदां वारुणी झडली. चंद्राला विडा खाण्याचा आग्रह झाला. व पुन्हा गायनास सुरवात झाली. निसर्गमधुर अशा ललितयौवना तरुणीच्या कंठातून निघणारे प्रेमालाप कोणाला मोहवणार नाहींत ! '' खरा तो प्रेमा ना धरि लोभ मनीं '' ह्या पद्याची बहार झडूं लागली. याप्रमाणें अजून दोनचार पद्यें झाल्यावर हळुहळु जलसा संपला. मग चंद्राबाईशीं व साधुजींशीं इतर गप्पा सुरू झाल्या. विड्यांचे बार भरून सिगारेटचा धूर सोडीत नानासाहेब म्हणाले:—

" मग काय साधुजी, धाडतांना चंद्रीला आज आमच्याकडे ? "

" हो हो. वा. आपल्याकडे नाहीं धाडायची तर कुणाकडे ? " साधुजी म्हणाले. " पण हें पहा ह्या पांखराची किंमत फार जबर आहे बरं का ? आणि त्यांतून ही मैना जो जो जास्तच खुलणार, तों तों मला तिची किंमतहि वाढवावी लागणार. कारण हें एक सौगंधिक पुष्प आहे. ते ज्याच्या त्याच्या हातीं देऊन चुरगळा करून टाकलें, तर त्यांत काय अर्थ आहे ? काय मंडळी, खरें किं नाहीं ? "

" हो हो. हें काय, योग्यच आहे! " मंडळींनीं त्यांची री ओढली.

" कबूल ना पण. मी कुठें नाहीं म्हणतो आहे ? छे बुवा, आपल्याला तर ह्या चंद्रीशिवाय क्षणभरहि करमत नाहीं. साधुजी, मी तुम्हाला साधा मनुष्य वाटलों होय ? " नानासाहेब म्हणाले.

" छे छे नानासाहेब, आपली नाहीं मी गोष्ट बोललों."

"ठीक. तर मग बोला, काय तुमच्या मैनेची बिदागी ?" नानासाहेबांनीं विचारलें

" पांचशें. " साधुजींनीं उत्तर केलें.

" हात्त्याच्या. एवढेंच ना ? देऊन टाकूं. त्यांत काय आहे ? आमच्या चंद्रीवरून लाखों रुपये ओवाळून टाकावेत ! " नानासाहबे अघळपघळपणानें बोलले व चंद्राकडे पाहून हांसले. तिनेंहि ज्योत्स्नाप्रकाशाचा झगझगाट केला व त्याच्या प्रकाशांत चंद्राबाई व नानासाहेब घोड्यांची गाडी उडवीत आपल्या घरीं चालती झाली व इतरहि मंडळी हळूहळू निघून गेली.

## प्रकरण १० वें.

## " सद्‍गुरुवांचोनी सांपडेना सोय."

साधुबुवांच्या पुराणाची नित्याप्रमाणें आजहि विठ्ठलमंदिरांत बहार उडत होती. तो एकादशीचा पुण्य दिवस होता. सायंकाळीं ५-५॥ चे सुमारास देवळांत मंडळींची—बायामाणसांची—बरीच गर्दी उडाली होती. साधुमहाराज आज ' गुरूपदेशा ' वर प्रवचन करीत होतेः—

" संसार असार आहे. यासाठीं परमेश्वराच्या भक्तीनें ज्ञानप्राप्ति-शिवाय चित्सौख्यलाभ होणें नाहीं, आणि अशा त्या मंगलमय सौख्य-सागर परमात्म्याची प्राप्ति व्हावी अशी इच्छा असेल, तर सद्‌गुरूला शरण गेल्याविना तरणोपाय नाहीं. तुकाराममहाराज म्हणतात—

" सद्‌गुरू वांचोनी सांपडेना सोय । धरावे ते पाय आधीं आधीं. "
दुसरे एके ठिकाणीं त्यांनीं हीच सोपी युक्ति सांगितली आहे. ते म्हणतात, ' जीवा, ह्या दुःखदायक संसारांत श्रमून तुझी सौख्याविषयीं पूर्ण निराशा झाली असेल आणि खऱ्या सौख्यसागर परमात्म्याची तळमळ जर तुझ्या अंतःकरणास लागली असेल,तर तुला एकच उपाय सांगतों—

" जरि व्हावा तुज देव । तरि हा सुलभ उपाव ॥
करि मस्तक ठेंगणा । लागे संतांच्या चरणा ॥ "

भगवंतांनीं भगवद्गीतेंत तेंच सांगितलें आहे—

" तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः." ह्या 'ज्ञानयज्ञा'ची प्राप्ति व्हावी अशी इच्छा असेल, तर भगवान श्रीकृष्ण सांगतात—

" अहंकार सांडुनि गुरुची करी नित्य सेवा. "

अज्ञात आणि अगम्य अशा विषयासंबंधीं चांगल्या मार्गदर्शकाशिवाय काम होणें नाहीं. चांगल्या कर्णधारावांचून सुंदर नौका अफाट दर्यांत अज्ञात अशा खडकावर आपटून किंवा वादळाच्या सपाट्यांत सांपडून नाश पावेल. ह्याचप्रमाणें कोणच्याहि विषयासंबंधीं होय. आधीं मार्ग माहीत पाहिजे. नुसता मार्ग माहीत असूनहि उपयोग नाहीं. त्या मार्गांतील अडचणी ठाऊक असून त्या कशा वाराव्या, ह्याचेंहि ज्ञान हवें. आणि हें उत्कृष्ट मार्गदर्शकांसच ठाऊक असणार. तज्ज्ञांशिवाय हें होणार नाहीं. ह्यासाठीं सद्गुरूची कांस धरावी, म्हणजे ते सुखानें आपणास पैलतीरास नेतील." ह्याप्रमाणें महाराजांचें तास दीड तास प्रवचन होऊन अस्तमानाच्या समयास तें संपलें. सर्व मंडळी महाराजांस नमस्कार करून घरोघर गेली. परंतु सरस्वतीबाई व आमची यमुना ह्या मात्र तशाच मागें राहिल्या. सरस्वतीबाईचा आपल्या दुर्दैवी यमूस एकदां गुरूपदेश देऊन तिला परमार्थमार्गाला लावावी

असा किती दिवसांचा मानस होता. यमुना बिचारी गरीब पोर. तिला त्यांत काय आवडनिवड असणार? तेव्हां आईच्या मर्जीस्तव तीहि कशी तरी कबूल झाली; किंवा, असें म्हणण्यापेक्षां, तिचें मौन हीच तिची संमति असें त्या धरून चालल्या, असें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. त्यांतून आजच्या महाराजांच्या प्रवचनानें तर सरस्वतीबाईची खात्रीच झाली व गुरूपदेशावांचून पोरीचा जन्म फुकट जाणार असें वाटून त्या महाराजांचें पादवंदन करून म्हणाल्याः—

" महाराज, ह्या माझ्या गरीब मुलीला आपल्या अनुग्रहानें पावन करून तिला मार्ग दाखवावा अशी महाराजांच्या चरणाजवळ माझी नम्र प्रार्थना आहे. " सावज चांगलेंच जाळ्यांत सांपडलें, ह्या विचारानें अत्यंत हर्षभरित होऊन, परंतु बाहेरून साधुत्वोचित गांभीर्य दाखवीत साधुजी बोलले—

" ठीक आहे. हें तर आमचें पवित्र कर्तव्य आहे. बाई, तुम्ही कांहीं काळजी करूं नका. तुम्ही कुठें राहतां? "

" माझें घर नदीकाठीं आहे." सरस्वतीबाई म्हणाल्या. " हां, आलें लक्षांत. " साधुजी म्हणाले, "माझे शिष्य भिक्षेला जातातच कीं नाहीं? बरें आहे. बाई, आपण चला पुढें घरीं. मी तुमच्या मुलीस अनुग्रह देऊन लावून देतों. हो, पण हिला अजून तुम्ही सोंवळी केली नाहींत. पण कांहीं हरकत नाहीं. असल्या बाह्य उपाधीकडे आम्ही विशेष लक्ष देत नाहीं. एक अंतःकरणाची पूर्ण तयारी असली, म्हणजे झालें. परमात्मा आपला भक्त कोणच्या जातीचा आहे किंवा कोणच्या कुलांतला आहे हें पहात नाहीं. तर केवळ त्याची भक्ति पाहतो. ज्ञानेश्वरांनीं म्हटलेंच आहे—

" म्हणोनि भक्ति गा एथ सरे। जाति अप्रमाण." त्याच्या घरीं सर्व सारखींच. लहान थोर, उच्चनीच, हा कृत्रिम भाव त्याचे येथें नाहीं. जो परमात्मा चोख्या महार, नरहरि सोनार, गोरा कुंभार इत्यादिकांच्या येथें केवळ त्यांच्या भक्तिखातर आनंदानें जेवला, दासीपुत्र विदुराच्या येथील कण्यासुद्धां ज्यानें त्याच्या प्रेमाखातर आनंदानें खाल्ल्या, भिल्लीणीचीं बोरें ज्या नारायणानें आनंदानें भक्षिलीं,—माई, तो परमात्मा

अनन्यशरणागत विधवेला, केवळ ती सकेशा आहे म्हणून टाकील, ही कल्पनाच हास्यास्पद दिसते. प्रेमाचा उल्हास हीच एक मुख्य गोष्ट आहे. असो. तर कांहीं हरकत नाहीं. परमात्म्याचे प्राप्तीच्या मार्गास केव्हांहीं प्रारंभ करतां येतो. " काळवेळ नाम उच्चारिता नाहीं " असें त्यांचें सांगणेंच आहे. आणि " करावी तांतडी परमार्थी " असा ते कळवळ्यानें उपदेश करतात. कारण मानवी आयुष्य ही फार अमोलिक चीज आहे. तिचा क्षणोक्षणीं आपण व्यर्थ व्यय करतों. पुन्हा ती चीज दुर्लभ आहे. या साठीं ' तांतडी करावी ' असें ते सांगतात. यासाठीं आपण निश्चितमनानें घरीं चला. मी तिला तासाभरांत लावून देतों. " महाराजांच्या ह्या दिव्य वाणीनें बिचारी सरस्वतीबाई तर थक्कच झाली. अशा महात्म्याचें पुन्हा एकदां दर्शन घेऊन ती उठतां उठतां म्हणाली—

" तिला लवकर धाडा हं. कारण तिकडून घरीं यायच्या आधीं ती आली म्हणजे बरें. कारण मी हें खाजगी रितीनें योजिलें आहे. "

" हो, हो, कांहीं काळजी करूं नका. काम झालें, कीं ताबडतोब लावून देतों. " साधुजींनीं उत्तर केलें. सरस्वतीबाई घरीं गेल्या.

## प्रकरण ११ वें

## भयंकर प्रसंग !

सरस्वतीबाई गेल्यावर साधुजींनीं आपल्या बगलबच्चा प्रियशिष्य इच्छारामास हांक मारून सांगितलें—

" इच्छाराम, ह्या बाईना उपदेश द्यावयाचा आहे. तेव्हां लवकर पाणी तापव. म्हणजे ह्या स्नान करून शुचिर्भूत होतील. मी तर गार पाण्यानींच त्रिकाल स्नान करतों म्हणा. तेव्हां उपदेशाची सर्व तयारी ठेव. आम्ही इतक्यांत आलोंच. नीट लक्षांत आलें ना ? "

" होय महाराज," असें म्हणून चाणाक्ष इच्छाराम तेथून निघून गेला. नंतर साधुजींनीं कांहीं वेळ यमुनेशीं परमार्थाच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी केल्या. नंतर देवदर्शन करून यमुनेचा हात धरून ते आपल्या आगाराकडे चालू

लागले. यावेळीं त्या नाजुक हस्तस्पर्शानें साधुबोवांचें बरेंच कामोद्दीपन होऊं लागलें, पण ते फार धूर्त असल्यामुळें त्यांनीं आपल्या काव्याचा बिघाड होऊं दिला नाहीं. उलट ते यमुनेला सांगत होते—

" ह्या संध्याकाळच्या वेळीं जसें नारसिंहानें हिरण्यकश्यपूचें उदर फाडलें तसें मी तुमच्या अज्ञानरूप हिरण्यकश्यपूचें माझ्या ज्ञानरूप नखांनीं छेदन करतों बरें यमुनाबाई. आज तुम्ही निःशंक व धन्य व्हाल." एका घटकेनेंच त्या अनाथ बालिकेच्या सुंदर अधरांचें पान व आपल्या पशुवृत्तीचें शमन करण्याचा त्यांचा घाट होता, हें चतुर वाचकांस सांगणें नकोच. असो. सचैल स्नान करून शुभ्रवस्त्र परिधान केलेली यमुना राक्षसगृहांतील दिव्यांगनेप्रमाणें साधुजींच्या शयनागारांत शोभूं लागली. तेथील पलंग वगैरे थाट पाहून यमुना बरीच साशंकित झाली. पहिल्यापासून तिला चमत्कारिक वाटत होतेंच. परंतु साधुजी म्हणाले—

" येथें आमचे सर्वजगत्प्रभु गोपालकृष्णाची शय्या आहे, आपण मनांत कांहीं शंका बाळगूं नये." नंतर ते पुढें म्हणाले—

" यमुनाबाई, उपदेश दिल्यावर किंवा देतांदेतांच त्या प्रेमानंदाच्या भरांत कृष्णार्जुनांनीं किंवा मिरागिरिधरांनीं एकमेकांस कडकडून आलिंगन दिलें तसें गुरूंनीही शिष्यास शिष्यप्रेमासाठीं सप्रेम आलिंगावें असा आमचा प्रघात आहे. तेव्हां तुम्ही आम्हास तसें दृढालिंगन देणार ना ?" असें म्हणून त्या नीचानें पुन्हा तिचा हात धरून "या, असें पलंगावर या." असें म्हणत तो पलंगावर बसला. आतां मात्र यमुनेची स्थिति गर्भगळित झाली. ती अत्यंत घाबरली व आपला हात सोडवून घेऊन, " धांवा हो धांवा, या दीन गायीला ह्या कसाबाच्या हातांतून सोडवा !" असें ओरडूं लागली. साधुजींनीं आतां आपलें स्वरूप प्रगट केलें. त्यांनीं तिचा हात फिरून जास्त बळकट धरला व तो म्हणाला—

" अगे लंवडी, जास्त आरडशील तर इथल्या इथेंच ठार करीन ! कोण तुझा जार तुला आतां या निर्जन ठिकाणीं सोडवणार ? मग उगीच कां आरडतेस ? प्रिये यमुने,—"

" नीचा, सोड मला " राग व भीति यांनीं थरथर कांपणारी यमुना

त्याच्याशीं हिसकाहिसक करीत म्हणाली, "आग लागो तुझ्या जिभेला. हाच का तुझा उपदेश आणि हाच का तूं साधू ? नीचा, तुझ्यासारख्या बोकेसंन्याशांना देव शासन केल्याखेरीज कधीं राहणार नाहीं."

"प्रिये, आतां ही बडबड पुरे कर." साधुजी रंगेलपणानें म्हणाले, "माझें ऐक. मी तुला माझी पट्टशिष्यीण करतों व आपण वर वर जरी साधुवृत्तीनें राहिलों तरी आंतून खूप मजा मारूं—"

"मेल्या, तुझी जीभ जळली कशी नाहीं ? आईच्या पोटांतच का मेला नाहींस ?" अत्यंत त्वेषानें थरथरणारी, पण तशाही स्थितींत सौंदर्यानें चमकणारी यमुना म्हणाली, "हाय ! नारायणा ! ह्या दीन दासीची हाक तुला ऐकूं येत नाहीं कारे ? धांवा हो धांवा, आणि या मांगापासून ह्या दीन अबलेची लज्जा कोणी तरी रक्षण करा !" असें म्हणून तिनें पुन्हा एक जोराचा हिसका मारून आपला हात सोडवून घेतला व ती बंद केलेल्या दरवाजाकडे सैरावैरा पळूं लागली. पण इतक्यांत "थांब, तूं तशी नाहीं ऐकायचीस." असें म्हणून तिच्या पाठीवर लोळणारा मुक्त केशकलाप धरून त्या नीचानें तिला मागें खेंचलें व तिच्या निऱ्यांस हात घालून तो म्हणाला—

"लाडके, मी म्हणतों त्या गोष्टीस कबूल हो म्हणजे तुला कशी फुलासारखी सुखांत ठेवीन. तो दगडाचा देव राहिला देवळाच्या सांदीकोपऱ्यांत. बऱ्या बोलानें कबूल झाली नाहींस तर पहातोच मी तुझा कोण जार तुला सोडवायला येतो तें !" हाय ! हाय ! कोण हा भयंकर देखावा ? पण इतक्यांत खाडदिशीं दरवाजावर लाथ बसली व पांच मंडळी—अच्युतराव, नारायणराव, श्रीपतराव, व दोन पोलीस अंमलदार, अशी—आंत शिरली ! लहानपणीं दांडपट्टा शिकलेल्या श्रीपतरावांनीं हातांतील काठीच्या एकाच फटकाऱ्यासरशीं त्या बोक्यास खालीं पाडलें, व एकंदर देखाव्यांनीं आधींच घाबरलेली यमुना चक्कर येऊन खालीं पडत होती, तिला सावरून धरून तिचें मस्तक त्यांनीं आपल्या मांडीवर घेतलें. इतक्यांत जमादारसाहेबांनीं बाहेर येऊन आपली तुतारी खूप जोरानें फुंकली. अकस्मात् शेपन्नास हत्यारबंद शिपाई दौडत तेथें आले. सर्व देवळास गराडा पडला. साधुजी-

ऱ्या व त्यांच्या परिवाराच्या हातांत बेड्या पडल्या. नंतर गांवांतून एक चौचाकी आणून यमुनाबाईस त्यांत व्यवस्थेशीर निजवून नारायणराव, श्रीपतराव, व अच्युतराव घराकडे वळले. जाण्यापूर्वी जमादारसाहेबांचे त्रिवर्गांनीं अत्यंत आभार मानले. "नाईकसाहेब, आज आपले आमच्यावर फार उपकार झाले." ते म्हणाले.

" कसचे, साहेब. हें तर आमचें कामच आहे. " जमादारांनीं हंसत हंसत म्हटलें, " आज आपल्या मात्र संगतीचा आम्हांला फार लाभ झाला. आपण त्रिवर्गहि पुढें फारच मोठे लोक होणार, ह्यांत शंका नाहीं. करा, कसेंहि करून आपल्या देशाची सामाजिक व राजकीय सुधारणा जरूर करा. त्यांत आमच्याकडून आम्ही शक्य ती मदतच करूं. ही नोकरी आम्हास निव्वळ पोटाग्वातर करणें आहे. " असें म्हणून ते आपल्या मंडळीसह साधुजीस व त्याचे परिवारास घेऊन चालते झाले.

## प्रकरण १२ वें.

## भोंदू गुरूंची साथ.

साधुजींच्या मठींतील घडलेल्या प्रकाराच्या दुसऱ्या दिवशीं मातापुत्र बोलत बसले होते. नारायणराव सरस्वतीबाईस म्हणाले:—

" पाहिलेस ना आई, मी नेहमीं म्हणतो त्याचें आलें ना पण प्रत्यंतर ? अग आई, असे साधु का वाटेवर पडले आहेत ? असे रस्तोरस्तीं जर साधु बोकाळूं लागले, तर मग काय हवें? आई, तुला काय सांगूं, ह्या मैंदांची आणि भोंदूंची तुकारामांनीं पण अशी उडवली आहे, ती तूं एकदां वाचच. ते म्हणतात—

" बोली मैंदाची बरवी असे । वाटे अंतरीं घालावे फांसे ॥
कैसा वरिवरि दिसताहे चांग । नव्हे भाविक केवळ मांग ॥ "

आई, अशा वरच्या झकपकीनें अन् डामडौलानें का साधुपणा येतो ? भगवी कफनी परिधान केल्यानेंच जर साधूपणा येत असतां,तर नित्य राखेचा उकिरडा फुंकून त्यांत लोळणारे गर्दभराज हे साधुत्वाच्या उच्च कोटींत

विराजमान झाले असते. तुकाराम म्हणतात, "सहज भगवें तें हें श्वान." आई, तास तास पाण्यांत उभे राहिल्यानेंच जर साधुत्व अंगीं बाणणार असलें, तर नित्य जलांतच ज्यांचा वास असे मत्स्यादिक सर्व जलचर प्राणी साधुच म्हणावे लागतील. तास तास गोमुखींत हात घालून डोळे मिटून बसण्यानेंच जर साधुत्वाची योग्यता मिळत असती, तर बगळ्याचें साधुपण पहिल्या-प्रतीचें ठरलें असतें. नानातऱ्हेचे चमत्कार करून दाखविल्यानें जर साधुत्व येत असतें, तर जारणमारणादिक साधनानें जादुटोणा करणारे पोटभरू जादुगार सर्व साधूच होते. आई, अशानें साधुपणा येत नाहीं बरें! तुकाराम महाराज म्हणतात—

" डोई वाढवुनी केश । भुतें आणिती अंगास ॥
परि ते नव्हती संतजन । तेथें नाहीं आत्मखुण ॥ "
" टिळे टोपी उंच दावी । जनीं मी एक गोसावी ।
मुद्रा लाविती कोरोनीं । मान व्हावयासि जनीं ॥ "
" टिळे टोपी माळा कंठीं । अंधारी नेउनि चेपी घांटी ॥ "

असे एकना दोन! आई ह्या दांभिक साधूंचें बंड--ही भोंदू गुरूंची सांथ सध्याप्रमाणेंच त्या वेळीं माजली होती. तेव्हां त्यांनीं झणझणीत कोरडे ओढून केलेला 'दंभस्फोट' मोठा बहारीचा व वाचनीय आहे. तें झगझगीत अंजन डोळ्यांत पडल्यावर लोक कांहींसे सावध झाले. पण अजूनहि ही मगरमिठी सुटावी तशी सुटत नाहीं. आई, अशा वरच्या झकपकीनें कामें होतीं, तर परमार्थ फार सोपा होता. पण या कामीं रामजोशींची लावणी फार उपदेशक आहे. ते म्हणतातः—

" जाळ गळ्यामाधिं माळ कशाला व्याळकाम कोपला ।
आतुनी, बाहेर मिरविशी भला ॥
वित्त पहातां पित्त येतसें चित्त पाहिजे रे मला ।
असें हरि म्हणतो नुमजे तुला ॥
काय गळ्यांत घालुनी तुळशीचीं लाकडें ।
ही काय भवाला दुर करितिल माकडें ? ।
बाहेर मिरविशी, आंत हारिशी वांकडें ।
अशा भक्तिच्या रसारहित तूं कसा म्हणविशि रे बुधा ।
धरिशि तरि हरिचा सेवक सुधा ॥ "—इत्यादि.

समर्थांचेहि उद्गार असेच मननीय आहेत. ते म्हणतातः—

“ स्नानसंध्या टिळेमाळा । पोटीं क्रोधाचा उमाळा ।
नित्य दंडितोसी देह । परि फिटेना संदेह ।
नित्य नेम खटाटोप । मनीं विषयाचा जप ॥ ” इ०

तेव्हां ह्या वरच्या डामडौलानें दुसऱ्यांच्या आयाबहिणींची बेअब्रू करणारे व दुसऱ्याच्या धनाचा अपहार करणारे साधु, तुकाराम म्हणतात—

“ तुका म्हणे तो केवळ पुंड । त्यावरि वाजती यमदंड ॥ ”

आई, ‘ रामीरामदास ’ विचारतातः—

“ अंतरि पापाच्या कोडी । वरिवरि बोडी डोई दाढी ॥
जे बोडिलें तें निघालें । सांग काय पालटलें ? ॥ ” इत्यादि.

आई, महात्मा ज्ञानेश्वरांचेंहि वचन काय सांगतें ऐकः—

“ येरव्ही तरी पांडुसुता । अंतर शुद्ध नसता ।
बाहेरी कर्म तो सर्वथा । विटंबू गा ॥
कळस ढिमाचे पोकळ । जळो वरील ते झळाळ ।
काय करूं, चित्रींव फळ । आंतु शेण ! ॥ ”

आणि खुद्द भगवंताचा अभिप्रायहि असाच आहे. अशा बोक्या साधूंना त्यांनीं “ मिथ्याचार” म्हटलें आहे, ही खरोखर तिरस्काराची हद्द झाली. ते म्हणतात—

“ कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इंद्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥ ”

तेव्हां, आई, ज्याला सर्व अज्ञानी जग भुललें आहे, त्या ह्या दांभिक झळाळीचा सर्व साधुसंतांना व प्रत्यक्ष भगवंतांसहि किती तिटकारा होता हें तुझ्या लक्षांत आलें ना ? आई, साधुत्वाची व्याख्या फार निराळी आहे. खरे साधू शतकांत एखाद दुसरेच निर्माण होतात ! त्यांची व्याख्या किती विस्तृत आहे ती मी तुला किती म्हणून सांगू ? परंतु आई, ह्या विषयाची मला फार आवड आहे, म्हणून बोलल्याशिवाय रहावत नाहीं. तुकाराम म्हणतातः—

“ जे कां रंजले गांजले । त्यासि म्हणवी जो आपुले ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥

अहाहा, याहून अधिक स्पष्टतर व्याख्या दुसरीकडे कोठें सांपडेल काय ? तसेंच ते म्हणतातः—

" मनाचा मवाळ वाचेचा रसाळ । त्याचे गळा माळ असो नसो ।
आत्मा—अनुभवी चोखाळिल्या वाटा । त्याचे माथांजटा असो नसो ।"

ज्याचें हृदय प्राणिमात्रांच्या कल्याणासाठीं अहर्निश तळमळतें आहे, दुःखितांचें दुःख हरावें, अनाथांस साह्य करावें, आर्तांचें भय वारावें, ह्यासाठींच ज्यांचा अवतार, तेच खरे साधु ! आई, तुकोबा तीच गोष्ट आपल्या अभंगांत सांगतातः—

" थोरीव सांडिली आपुली परीसें । नेणें शिवो कैसें लोखंडासी ॥
जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टवीती उपकारें ।
भूतांची दया हें भांडवल संतां । आपुल्या ममता नाहीं देहीं ॥
तुका म्हणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्रवतसें ॥ "

किती उत्कृष्ट हा अभंग आहे ! भगवान् ज्ञानेश्वरही म्हणतातः—

" हें विश्वाचि माझें घर । ऐसी मती ज्याची स्थिर ।
किंबहुना चराचर । आपण जाहला ॥
आणि याहीवरी पार्था । माझ्या भजनीं आस्था ।
तरी तयातें मी माथां । मुकुट करी ॥ "

आई, अशी किती वचनें सांगावीत ? भगवद्गीतेंत भगवंतांनींहि साधूंचीं लक्षणें अनंत वेळां सांगितलीं आहेतः—

" आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः॥ "

हें त्यांतलेंच एक वचन आहे. असो. सर्वत्र परमात्मभाव ठेवून भूतमात्रांच्या कल्याणासाठीं अहर्निश झटणें, यांत सर्व साधुत्वाची व्याख्या येते. परंतु या गोष्टी तुम्हां अज्ञ बायकांस कळत नाहींत आणि वरच्या डामडौलाला भुलून, त्यासच खरें मानून, त्याच्या मागें लागतां आणि शेवटीं फशीं पडतां ! आई, साधु कुणाला म्हणावें हें आतां तरी तुला समजलें कां ? " नारायणराव बराच वेळ बोलून उसासा टाकून म्हणाले.

" नारायणा, बाळा, समजलें हो. आतां तूं किती मला बोलणार ? माझी ती चूक झाली खरी. यापुढें आतां तूं सांगशील तशी वागेन. हें

आमचें अज्ञान, अशिक्षितपणा व जुन्या आंधळ्या समजुतीच आम्हांला नडतात! यापुढें निदान इतर भगिनींनीं तरी यापासून बोध घ्यावा म्हणजे झालें." सरस्वतीबाई म्हणाल्या.

"आई, यांत मला तुला दोष द्यावयाचा नव्हता. जोंवर तात्त्विक विचाराची तिखट धार पाजळली जात नाहीं, तोंवर हें असें चालायचेंच. आई, रागावूं नकोस हो. माझ्या तोंडून बोलण्याच्या भरांत उणा शब्द गेला असल्यास मी तुझी क्षमा मागतों!" असें म्हणून मातृभक्त नारायणरावानें मातेच्या पायावर डोकें ठेवलें! त्यास उठवीत गद्गद वाणींत सरस्वतीबाई म्हणाल्याः—

"छे छे, नारायण, ऊठ. तूं कधीं आम्हांला अहिताच्या गोष्टी सांगितल्या आहेस बरें?"

नारायणरावाच्याहि नयनांत प्रेमाश्रु आले!

## प्रकरण १३ वें.

## वेडी.

फौजदारसाहेबांनीं त्या भोंदू गुरूला व त्याच्या परिवाराला पकडून नेलें, हें आपण मागें वाचलेंच आहे. सोनेरी टोळींतलें हें एक मोठेंच घबाड आपणास पकडावयास सांपडलें, म्हणून त्यांस आनंद झाला. दुसरे दिवशीं कोर्टांत त्या बोक्या साधूची 'केस' ऐकावयास बरीच गर्दी जमली होती. एके बाजूस चिकाचे पडदे लावून स्त्रीवर्गाचीहि बसण्याची व्यवस्था केली होती. असल्या भोंदूची कणीक चांगली मऊ केली जात आहे, हें पाहून आनंद वाटणाऱ्या सुमतीबाई त्या खटल्यास गेल्या होत्या. जातांना त्यांनीं जुन्या व भोळ्या मताच्या सरस्वतीबाईसहि आपल्या बरोबर नेलें होतें. सुशीला व कावेरीहि त्यांच्या बरोबर होत्या. तसेंच 'महिलासमाजांत' येणाऱ्या सुमतीबाईच्या ओळखीच्याहि कित्येक बायकांना त्यांनीं आपल्याबरोबर नेलें होतें. हेतु असा कीं, त्या मेल्याची

उघडकीस येणारीं एक एक दुष्कृत्यें ऐकून वाचकांनीं पुन्हां सावध व्हावें व ' आला साधु कीं धांव त्याच्या मागें ' असें करीत सुटूं नये. त्याप्रमाणें कोर्टाचे कामास बारा वाजतां सुरवात झाली. पहिलाच खटला आमच्या साधुबुवांचा होता. बारक्यासारक्या आरोपींची तपासणी झाल्यावर, मुख्य भोंदूस पिंजऱ्यांत आणून उभे केलें. त्या वेळीं सोनेरी टोळींत शिरल्यापासून त्यांनीं काय काय अनन्वित कृत्यें केलीं, तीं एक एक बाहेर येऊं लागलीं. कोर्टांत सर्वत्र स्तब्धता होती. इतक्यांत केंस मोकळे पाठीवर सुटून त्यांच्या जटा झाल्या आहेत, अंगावर एक फाटकें-तुटकें वस्त्र आहे, आणि हातांत एक बारीक झाडाची डाहाळी आहे, अशी एक वेडी भरकोर्टांत शिरली. इकडे तिकडे तिनें दोनतीनदां पाहिलें. इतक्यांत तिची नजर पिंजऱ्यांत असलेल्या त्या बोक्याकडे गेली. तशी एकदम उसळून ती मोठमोठ्यानें हातवारे करीत बोलूं लागली—

" यानेंच—यानेंच हो माझ्या संसाराची धुळधाण केलीन्. आमचा आधींच गरिबीचा संसार. त्यांत कच्चाबच्चांचा खटारा मोठा. पण त्यांतले त्यांत मी आपली सुखानें रहात होतें. पण इतक्यांत काय या मेल्याच्या मनांत आलें, कोणास ठाऊक ? आपलें तटकन् त्या पोराबाळांस टाकून मेला कोठें निघून गेला. पोरें भुकेनें तडफडूं लागलीं. जज्जसाहेब, तुम्हीच सांगा बरें आतां, यानें असें करावें का ? " असें म्हणून ती रडूं लागली. पण इतक्यांत तिनें आपले डोळे पुसले आणि पुन्हां त्या भोंदूकडे बोट करून—

" नाहीं हो. या दुष्टाला चांगलीच शिक्षा करा बरें का हो ! " असें म्हणून ती आली तशी धूम पळाली. अशा स्त्रीला कोर्टांत शिरूं देऊन तिला एवढें कसें बोलूं दिलें, याचें कोणास आश्चर्य वाटेल.परंतु ती कोर्टांत शिरल्याबरोबर त्या पिंजऱ्यांतील आरोपीचें खरकन् उतरलेलें तोंड आणि त्यानंतर तिचें भाषण चालू असतां त्याच्या तोंडावर होणारी चलबिचल, हीं पाहून, यांतही आपणास कांहीं माहिती सांपडेल, असें मानवी स्वभावाचें सूक्ष्म निरीक्षण करणाऱ्या उदारधी जज्जसाहेबांस वाटलें व म्हणून त्यांनीं तीस बोलूं दिलें. ती पळाल्यावर तिच्या मागोमाग त्यांनीं एक दोन शिपाई पाठवले. पण वेडीच ती. ती कसची त्यांच्या हातीं सांपडते ? इकडे कोर्टानीं शिक्षा सांगण्यापूर्वी मुख्य आरोपीस—

पिंजऱ्यातील साधूस–कांहीं सांगावयाचें असल्यास सांगण्याची परवानगी दिली, तेव्हां तो म्हणालाः—

" माझें खरें नांव गणपतराव. मला ह्या सोनेरी टोळींत शिरून १०–१२ वर्षें झालीं. त्या अवधींत मीं कित्येकांना लुबाडलें व कितीकांना फसवलें तें आपल्या पुढें आलेंच आहे, व ते सर्व आरोप मला कबूलहि आहेत. पण जज्ज साहेब, " बोलतां बोलतां त्याच्या डोळ्यांत विलक्षण तेज चमकूं लागलें, " इतक्याजणांना फसवणारा हा वीर तुमच्या हातून शिक्षा भोगील, ही कल्पनाच सोडून द्या. ही पाहिलीत का बाटली ? " त्यानीं इतक्याहि पोलिसांच्या डोळ्यांत धूळ फेकून जवळ ठेवलेली जहरी विषाची कुपी काढून ती जज्जास दाखवीत तो म्हणाला, " ह्याच्या एकाच घोटाबरोबर मी तुमच्या हातून सुटणार आहे ! " असें म्हणून त्यानें ती केव्हांच घशांत ओतली. " झालें. जज्जसाहेब, बोला आतां तुमची शिक्षा ! " असें म्हणून त्यानें अंतकाळचें विकट हास्य केलें. हा प्रकार इतका क्षणार्धांत व जलद घडला कीं, त्यानें विषाची कुपी घशात ओतीपर्यंत सर्वजण नुसतें आ वासून पहात राहिलें. लवकरच त्यांना झालेला प्रकार उमगला. हळुहळूं विषाचा अम्मल चढूं लागला. त्याला वांचविण्यासाठीं धावाधाव सुरू झाली. पण त्यानेंच सांगितलें कीं, " उगाच धांवपळ का करतां ? चारदोन मिनटांत मी हें जग सोडून जाणार आहे. " लवकरच त्याचा प्राण निघून जाऊन त्याचा देह धाडकन् पिंजऱ्यांत पडला ! अर्थात् " आत्महत्या " असा त्याचा उघड पंचनामा झाला व त्याच्या इतर साथीदारांस कोर्टानें त्यांच्या त्यांच्या अपराधाप्रमाणें वर्ष दोन वर्षें, कोणास साधी तर कोणास सक्तमजुरीची, अशी शिक्षा सांगितल्यावर कोर्ट उपहारास उठलें.

## प्रकरण १४ वें.

# प्रौढविवाह.

" अगबाई, सुमतीबाई, आतां तुम्ही आपल्या सुशीलेचें लगीन तरी कधीं करणार ? तिला आतां चौदावें वर्ष असेल नाहीं ? मग अजून नाहीं कां तिचें लग्न करावयाचें ? कां तिला अशीच बेगम ठेवावयाचा विचार आहे ? " सुमतिबाईच्या इथें नेहेमीं बसायउठायला येणाऱ्या व त्यांच्या बऱ्याच ओळखीच्या, मैत्रीच्या व परिचयाच्या, पण थोड्याबहुत जुन्या विचाराच्या, शेजारच्या राधाकाकूंनीं विचारलें.

" आज रविवार आहे कीं नाहीं ? तेव्हां आज नेहमींप्रमाणें आपल्या महिलासमाजाची सभा आहेच. आणि आजच्यासाठीं विषयहि पण अनायासें "प्रौढविवाह" हाच ठरलेला आहे. तेव्हां राधाकाकू, मी म्हणतें, याचें उत्तर मी तुम्हांस तेथेंच देईन म्हणजे झालें." सुमतीबाई म्हणाल्या.

" बरं बाई. बाकी तुम्ही आमची पूर्ण खातरी करणार, यांत शंकाच नाहीं. कारण परवांच्या " स्त्रीशिक्षणा "च्या बाबतींत आपण आमची किती समजूत घातलीत ? नाहींतर आम्ही आपल्या अज्ञानांत चांचपडत होतों. मी त्याच दिवशीं आपल्या बनीस शाळेंत घातली. " राधाकाकू म्हणाल्या.

" राधाकाकू, त्यांत काय आहे ? मी आपली निमित्तमात्र आहे. सर्व ही कृति त्या परमात्म्याच्या कृपेची आहे. असो, असाच सर्व समाज जागृत होवो व आमच्या हिंदुसमाजास, तो एके काळीं अनुभवीत असलेलें सौख्य लाभो, म्हणजे झालें. राधाकाकू, आपण दुपारीं जरूर या अं ? " सुमतीबाई म्हणाल्या.

" हो हो, हें काय मला सांगायला पाहिजे सुमतीबाई ? मी अगदीं वेळेवर ठेवलेलीच आहे बघा. " असें म्हणून राधाकाकू चालत्या झाल्या. असो.

दुपारीं ठरल्याप्रमाणें ' समाज ' पूर्ण जमला आणि बरोबर ४ वाजतां सभेच्या कामास सुरवात झाली. ही जरी सभा असली तरी बाह्य औपचारिक प्रकारांचें विशेष अवडंबर न माजवितां मिळून मिसळूनच जितकें बोलतां व वागतां येईल, तितकें वागण्याचा त्या यत्न करीत. असो. सुमतीबाई भाषण

करण्यास उठल्या. त्यांच्या वाणींत पूर्ण कळकळ दृग्गोचर होत होती. त्या म्हणाल्याः—

" मातांनो व भगिनींनो, आजचा विषय " प्रौढविवाह " आहे, हें आपणांस ठाऊकच आहे. मुख्यत्वेंकरून स्त्रियांच्या प्रौढविवाहासंबंधीं आज मला बोलावयाचें आहे. बालविवाहापासून होणाऱ्या अनिष्ट परिणामांचें आपल्यापुढें आज मी दिग्दर्शन करणार आहे. मुलांच्या काय किंवा मुलींच्या काय, प्रौढविवाहाची आवश्यकता किती आहे, याचें मी आपणांस कोठवर वर्णन करून सांगूं ? प्रौढविवाहास पुष्टिकारक मुख्य मुद्दा म्हणजे बालविवाहानें वाईट प्रजा निर्माण होते, हा होय. मद्रासेस असलेल्या अनिबिझांट नामक विख्यात आंग्ल बाईनें हिंदुस्थानांतील या सामाजिक प्रश्नावर अंतःकरणाच्या पूर्ण कळकळीनें बरींच लेक्चरें दिलीं आहेत. तिच्या प्रत्येक शब्दांत हिंदुस्थानच्या ऊर्जितावस्थेबद्दल तळमळ दृग्गोचर होत आहे. तिच्याच शब्दांचा मी आज पुष्कळसा अनुवाद करणार आहे. ती म्हणतेः—

" निसर्गाचे नियम हे नेहेमीं अबाधितच राहणार. त्या नियमांचें कोणी उल्लंघन केल्यास त्यास कडक शासन झाल्याविना रहात नाहीं. निसर्ग हा जितका कनवाळू पालक आहे तितकाच निष्ठुर शासनकर्ता आहे. आणि या निसर्गाच्या नियमाप्रमाणें पहावयास गेल्यास, स्त्रियांच्या अवयवांची पूर्ण वाढ होऊन, गर्भधारणेस त्या योग्य होण्यास—ह्या हिंदुस्थानांत देखील मुलगी निदान सोळा वर्षांची व्हावी लागते. देशाच्या उष्णकटिबंधत्वामुळें मुलींना लहानपणीं नहाणें येतात हें मला कबूल आहे, आणि लहानपणीं मुलें होत नाहींत, असेंहि मी म्हणत नाहीं. इतकेंच नव्हे, तर बारा बारा तेरा तेराव्या वर्षी मुलगी मातृपदास पोंचलेली मला ठाऊक आहे. परंतु अरेरे, हा निव्वळ निसर्गाच्या कायद्यावर जुलूम नव्हे काय ? आणि याचें कटु फल तो दिल्याशिवाय कसा राहणार ? तें कटु फल म्हणजे बाळंतरोग होय. स्त्रियांच्या मृत्युसंख्येचें जर आपण प्रमाण पहाल, तर शेंकडा पाऊणशेंच्यावर स्त्रिया बाळंतरोगानें मरण पावलेल्या आपणांस आढळून येतील. मातांनो, बाळंतपणाच्या यातना किती असतात, तें म्हणजे एक पुनर्जन्मच कसा असतो, हें मी आपणांस सांगितलेंच पाहिजे असें नाहीं. आणि अशा तऱ्हेच्या यातना भोगण्यास आणि

पुष्कळ प्रसंगीं त्याचीं अनिष्ट फळें आपल्या मुलीस चाखावयास—आणि तें देखील निव्वळ आपल्या हौशीखातर—लावणें, हा किती वेडेपणा आहे बरें ? हा वेडेपणा कोण करतें ? ह्या दुःखगर्तेत मुलिस कोण लोटून देतें ? तर प्रत्यक्ष माता !—ज्यांना या गोष्टींचा पूर्ण अनुभव आहे त्या प्रत्यक्ष माता ! अरेरे, ही गोष्ट आपणांस लज्जास्पद नाहीं काय ? आपल्या हौशी पुरविण्यासाठीं ईश्वराच्या घरच्या गरीब प्राण्यास अकालीं अनंत यातना भोगावयास लावून कित्येकदां त्यांस शेवटीं मृत्युवश होण्यास लावण्याचे कामीं आपण अप्रत्यक्षरीत्या कारण होणें, हें किती बरें वाईट आहे ! या गोष्टी जाणूनबुजूनच केवळ होतात असें नाहीं. कारण, कोणची सहृदय माता आपल्या प्राणाहूनहि प्रिय अशा मुलीस दुर्धर प्रसंगांत जाणूनबुजून लोटून देण्यास तयार होईल ? अज्ञानानें आणि अंधपरंपरेनें या गोष्टी घडतात. मातांनो, आतां तरी आपण ह्या अंध रूढीपासून परावृत्त होण्याचा यत्न करावयास नको काय ? अरेरे, ह्या रूढी राक्षसीनें आमची किती तरी गोष्टींत अनंत हानि केली आहे. तिच्या मगरमिठींतून सुटणें फार कठीण आहे. तथापि, तें केवळ अशक्य नाहीं. यासाठीं तसा हळुहळू पण निश्चयाचा यत्न करावयास नको काय ? विवाहकालीन मंत्रांकडे आपण दृष्टिक्षेप कराल तरी त्यावरूनहि वधूवरांचीं वयें किती मोठीं असावयास पाहिजेत, हें आपणांस दिसून येईल. संपूर्ण अभ्यास पुरा झाल्यावर गुरूच्या आश्रमातून आपल्या ब्रह्मचर्याच्या उज्ज्वल तेजानें गुर्वाज्ञेनें गृहस्थाश्रमाचा स्वीकार करण्यासाठीं बाहेर पडणारा २४ वर्षें वयाचा पवित्र व सोज्ज्वल युवक कोणीकडे, आणि अजून अभ्यास पुराहि झाला नाहीं तोंच दोन दोन तीन तीन लेकरांचें मृतवत् खिल्लार उत्पन्न करणारी अलीकडील फिक्कट चेहऱ्याची व तारुण्यांतच म्हातारपणची कळा आलेली ब्रह्मचर्यहीन तरुण मंडळी कोणीकडे ! " अष्टवर्षा भवेत् कन्या " असें जरी तत्कालीन वचन असलें तरी तें त्या वेळेसच—त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणें लागू होतें. कारण, परकीयांच्या स्वाऱ्या ह्या देशावर होऊन सर्वत्र अशांतता व बंडाईचा तो काळ होता, व त्यावेळीं केव्हां कुणावर धाड येईल याचा नेम नव्हता. म्हणून, आपल्या मागें आपली पोरगी उजाड पडूं नये या काळजीनें, बापानें शक्य तितक्या लवकर दुसऱ्या एखाद्या संरक्षकाचे हातीं तिला

देऊन मोकळें होण्याची इच्छा करणें साहजिकच होतें. परंतु आतां तशी स्थिति नाहीं. तत्कालीन शास्त्रवचन जरी तसें असलें, तरी तें त्यावेळेपुरतेंच होतें, हें उघड आहे. आतां त्यांत फरक करावयास नको काय? शास्त्रें हीं मनुष्याकरतां आहेत, मनुष्यें शास्त्राकरितां नाहींत. "तातस्य कूपोऽयम्"—ही माझ्या बापाची विहीर आहे, म्हणून मी यांतलेंच पाणी पिणार, मग तें खारट कां असेना—" अशा तऱ्हेचे प्रलाप भ्याडांनाच शोभतात. आणि कांहीं असलें तरी निसर्गाचा कायदा हाच मी सर्वांत श्रेष्ठ समजतें. त्या कायद्यास बाधक अशीं शास्त्रें असतील, तर मी त्यांना काडीइतकीहि किंमत देणार नाहीं. "अष्टवर्षा भवेत् कन्या" ह्याच केवळ कालदेशवर्तमानानें नियमित अशा वचनास चिकटून बसूं नका. त्याव्यतिरिक्त जर आपण पहाल, तर प्राचीनकाळींहि स्त्रियांचा देखील प्रौढविवाह होत असे, असें आपणाला दिसून येईल. सध्यांहि मुलांचीं लग्नवयें बरींच वाढूं लागलीं आहेत. त्याच प्रमाणांत मुलींचीहि वाढावयास नकोत काय? त्यावांचून आपल्या हेतूचें पूर्ण साफल्य कसें होणार? या कामीं कर्मास दोष देण्यांत अर्थ नाहीं. कर्म हाहि एक निसर्गाचा कायदाच आहे. आणि ह्या एका कायद्यापासून तोटा आहे असें कळल्यावर, तो बदलून किंवा त्याचा अम्मल होणार नाहीं असा दुसरा कायदा आपणांस करतां येणार नाहीं काय? निसर्गनियमानें बालक पाय घसरून पडलें, तर आपण त्यास पुन्हा उठवीत नाहीं काय? बालविवाहानें वाईट प्रजा निर्माण होते असें कळल्यावर प्रौढविवाहाच्या उपायानें—ज्यानें चांगली प्रजा उत्पन्न होते हेंहि ठाऊक आहे, त्यानें—आपणांस त्याचें निरसन करतां येणार नाहीं काय? मातांनो व भगिनींनो, या गोष्टी आपल्या आपणच करीत असतों. आपणच आपले मित्र व आपणच आपले शत्रू. आपल्या अंध गतानुगतिकत्वाची लज्जा वाटून आपण योग्य ती सुधारणा करण्यास तयार व्हा, निसर्गाचे कायदे शिरसावंद्य माना, म्हणजे सौख्यामृत तुमच्या हातचें आहे."

## प्रकरण १५ वें.

# नारायणराव.

अच्युतरावांचा व नारायणरावांचा बराच परिचय असून दृढ मैत्रीहि होती, हें वाचकांस ठाऊकच आहे. नारायणराव पुष्कळ वेळां अच्युतरावांचे येथें गप्पागोष्टी करावयास जात असत आणि अच्युतरावहि निस्संकोच-वृत्तीनें नारायणरावाकडे जाण्यास अनमान करीत नसत. अशाच एका सुट्टीच्या दिवशीं अच्युतरावांचे घरीं हॉलमध्यें मंडळी गप्पागोष्टी करीत बसली होती. नारायणराव हे जात्याच अत्यंत हुषार असून स्कॉलर होते, हें आपणांस ठाऊकच आहे. ते जसे अभ्यासांत हुषार होते, तसेंच स्वदेशभक्तीची ज्वालाहि त्यांच्या हृदयांत नेहमीं उज्ज्वल असे. सामाजिक सुधारणेचेहि ते अत्यंत पुरस्कर्ते होते. आपल्या देशांतील प्रत्येक मनुष्यास लिहितांवाचतां आल्याशिवाय आपल्या देशाची उन्नति होणार नाहीं, अशी त्यांची ठाम समजूत असून त्यासाठीं आपल्या पुढील आयुष्यांत यत्न करण्याचा त्यांचा कृतनिश्चय होता. सुशीलाहि अत्यंत हुशार मुलगी होती, हेंहि आपणांस ठाऊकच आहे. आणि तिलाहि मातृशिक्षणाचा हरएक बाबतींत उपयोग होत असल्यामुळें तिचेहि विचार सामाजिक वगैरे बाबतींत बरेच प्रौढ झाले होते. अशा वधूवरांचा संगम किती बरें सुखदायक होईल ! विधात्याची तशी मर्जी असेल काय !—तेंच ठरविण्यासाठीं आज अच्युतरावांनीं नारायणरावांस बोलाविलें होतें. निदान आज प्रस्ताव तरी करावा, अशी त्यांची इच्छा होती. अच्युतरावांच्या वडिलांची व मातेची या गोष्टीस कोणतीच हरकत नव्हती. कारण नारायण गरिबाच्या पोटीं आलेला असला, तरी तो शीलानें उत्कृष्ट असून बुद्धीनेंहि अप्रतिम हिरा होता हें त्यांस ठाऊक होतें, आणि अशा गुणांचें चीज करणें हें प्रत्येक समाजहितेच्छूचें कर्तव्य आहे, असें त्यांचें मत होतें. अल्लड सुशीला तर काय ! तिला एकदां दादानें—अच्युतानें—सहज नारायणरावांचा फोटो दाखवून, " हा नवरा तुला आवडतो का ! " म्हणून विचारलें, तेव्हां मानेला हिसका देऊन बळेंच रागाचा आविर्भाव आणून, " हें रे काय दादा ! तुझें आपलें

कांहीं तरी भलतेंच ! " असें म्हणून ती पळाली होती ! अर्थात् तिची संमति उघड झालीच. प्रत्यक्ष अच्युतराव नारायणरावास किती चाहत होते हें वेगळें सांगावयास नकोच. दोघेहि बरोबरीचे समवयस्क मित्र. दोघेहि बी. ए. च्या क्लासमध्यें. पुढल्या वर्षी ते परीक्षेस बसणार. त्यांत नारायणासारखा मोहरा दृढमैत्रीस लाभल्यावर कोण त्याची चहा करणार नाहीं ? नारायणराव आल्याबरोबर सुशीला केव्हांच कांहीं तरी कामाचें निमित्त करून पळाली होती ! असो. इकडल्या तिकडल्या गोष्टी झाल्यावर अच्युतरावानें सहज सुशीलेचा फोटो नारायणरावाकडे करून विचारलें:—

" काय नारायणराव, आपणास ही पत्नी आवडते का ? " नारायण बिचारा आश्चर्यानें थक्कच झाला. त्यास अशा तऱ्हेचा प्रश्न आपणास विचारला जाईल, याची कल्पना नव्हती. अच्युतरावांनीं पुन्हां तोच प्रश्न केला. त्यावर—

"का माझी गरीबाची उगाच थट्टा करतां अच्युतराव ? " नारायण विनयानें म्हणाला.

"यांत थट्टा कशाची ? " अच्युतनें विचारलें.

" आपल्या बाबांना व सुमतीकाकूंना हें आवडेल का ? " नारायण म्हणाला.

" हो हो. त्यांची त्याला पूर्ण संमति आहे. मगतर कांहीं राहिलें नाहीं ? " अच्युतराव म्हणाले.

" तरीपण—" नारायण चाचरत म्हणाला.

" तरीपण काय ? " अच्युतनें विचारलें.

" बाबांना विचारलेलें बरें " नारायणानें उत्तर केलें.

" पण तुमची तर हरकत नाहींना ?" अच्युत म्हणाला.

"हा माझ्यावर आपला अनुग्रह आहे ! " नारायणानें विनम्रपणें उत्तर दिलें.

" मग झालें तर. आम्ही तुझ्या बाबांना विचारलें आहे आणि त्यांनींहि पण संमति दिली आहे हो. नारायण, तूं कांहीं काळजी करूं नकोस. थांब, मी खालीं चहा करण्यास सांगून येतों. या आनंदाच्या प्रसंगीं तुला निदान चहाच्या कपाचें तर गडंगनेर खरें !" असें हंसत हंसत

म्हणत अच्युत खालीं गेला व २ कप चहा करण्यास सांगून वाटेंतच भेटलेल्या सुशीलेस, " तो वर आणून दे बरं का !" असें बजावून स्वारी लवकरच वर आली.

आमच्या अच्युतानें खरोखरच विनायकरावांची संमति मिळविली होती. ते आतां पूर्वीचे दैववादी व जुनेपुराणे विनायकराव राहिले नव्हते. गंगूचें निधन, यमुनेचें आपल्या लोभास्तव होणारें वैधव्य, त्यानंतर तिजवर येणारा कठिण प्रसंग व त्यांतून दैववशात् झालेली तिची सुटका, इत्यादि गोष्टींमुळें त्यांचें मन पार बदलून जाऊन ते सुधारणेस पूर्ण अनुकूल झाले होते. कुसुमपुर गांवीं होणाऱ्या व्याख्यानमालेंतील " हुंडा, " " स्त्रीशिक्षण, " " विधवाविवाह " इत्यादि अनेक विषयांवरील विचारवंत व्याख्यानें ऐकून त्यांचें हृदय द्रवलें होतें. त्यांनीं आपल्या कावेरीस बरेंच शिक्षण देण्याचा निश्चय केला होता व सुमतिबाईंच्या " महिलासमाजा "तील बोधपूर्ण उपदेश ऐकून आधींच सत्त्वशील व मृदु हृदयाच्या असणाऱ्या सरस्वतीबाईंच्या विचारांस त्यांनीं निराळी उपयुक्त दिशा दाखविली होती. सध्यां कावेरी व अनाथ यमुना शिक्षणाच्या दिव्य अमृताचा उपभोग घेत होत्या. दोघींहि मुली जात्या हुषार असल्यामुळें त्या भराभर शिक्षण संपादित होत्या. विनायकरावांचें घर अज्ञ अशा जुन्यापुराण्या रीतींतून निघून हितपरिणामी व उपयुक्त अशा सुधारणेचें आगर बनलें होतें. कालाचा महिमा अगाध आहे !

## प्रकरण १६ वें.

## दिव्य मीलन !

नारायणरावांस ती बातमी ऐकून फारच आश्चर्य वाटलें. अच्युतरावांच्या इथें नेहेमीं येत जात असल्यामुळें, सुशीलेविषयीं त्याचे मनांत प्रेमोद्भव झाला नव्हता असें नाहीं. परंतु तो फार विचारी मुलगा होता.

आपली गरीब स्थिति लक्षांत आणून त्यानें आपल्या विचाराला जास्त थारा दिला नाहीं. तीच अश्रुतपूर्व गोष्ट ऐकून त्यास अवर्णनीय आनंद झाला असल्यास नवल नाहीं. परंतु आपणां गरिबांस वरण्यास सुशीलेची खरोखरच संमति असेल का ? का केवळ ती ह्या जगाच्या रीतीस बळी पडणार आहे ? आणि तसें असल्यास आपण तसें होऊं देणार नाहीं, असा तशा स्थितींतहि त्यास विचार आला. आणि याची खात्री करून घेण्यासाठीं लवकरच त्यानें संध्याकाळच्या सुमारास सुशीलेच्या घरांतल्या मागील बाजूस असलेल्या रम्य बागेंत तिची गांठ घेतली. ती संध्याकाळची वेळ होती. भगवान् भानुराज अस्ताचलीं विराजमान होत्साते आपल्या ताम्र किरणांनीं " आपणास अनुरूप पति मिळणार " ह्या आनंदानें प्रफुल्लित वदनानें सायंकाळीं बगीच्यांतून फिरणाऱ्या सुशीलेच्या हर्षभरित गुलाबी कपोलास अधिक रंजित करीत होते. सायंवायु किंचिन्मुक्त अशा तिच्या कृष्णकेशकलापाशीं क्रीडत होता. सुशीला प्रमुदित हृदयानें वीणाझंकारासहि लज्जित करणारे कोमल आलाप गात होती—

" मजला प्रेमसुरस रस पीता सुखमय झालें हो संसारीं "

पण इतक्यांत मागून कोणी हांक मारली—

" सुशीले ! "

सुशीला आपल्या तंद्रींतून जागी होऊन मागें वळून पाहते तों नारायणराव ! नारायणरावांस पाहतांच ती प्रेमबद्ध बाला लज्जेनें अवनतमुखी झाली. तिच्या भालप्रदेशीं स्वेदबिंदू चमकूं लागले व तिचें शरीर किंचित् कंप पावूं लागलें. आरक्त भगवान् दिनराज हा देखावा अत्यंत आनंदानें पहात होते. त्यांचे रक्तकिरण सुशीलेच्या गुलाबी कपोलावर आलेल्या प्रेमयुक्त लज्जेच्या रक्तिम्यास अधिकच शोभवीत होते ! नारायणरावानें जवळ येऊन पुन्हां विचारलें—

" सुशीले ! "

तिनें नुसतें किंचित् वर पाहिलें. नारायणराव म्हणाले—

" सुशीले, तूं माझ्याशीं मनापासून विवाह करण्यास तयार आहेस काय ? "

" होय. " सुशीलेनें कंपित आवाजांत उत्तर दिलें.

" काय ? हें मी खरें मानूं ना ? " नारायणराव म्हणाले.

" हें काय बाई विचारणं ! " सुशीला म्हणाली.

" अहाहा, मी खरोखर आज किती सुखी झालों ! परमेश्वरा, हा सौख्यभार सहन करण्यास मला शक्ति दे ! परंतु—" ते पुढें म्हणतात, " सुशालि, मी गरीब आहे !"

" पण आपण गुणनिधी आहांत ! " सुशीलेनें उत्तर दिलें.

" पण तुला हिरेमोत्यांनीं लकडणाऱ्या एखाद्या 'श्रीमंत पतीची राणी' होण्याचें सोडून, तूं मजसारख्या गरिबास कां वरतेस ? " नारायणराव तिच्या प्रेमाचा ठाव पहात म्हणाले.

" गुणनिधीला कोण बरें वरणार नाहीं ? " सुशीला म्हणाली, " नुसत्या सोन्यामोत्यांच्या अलंकारास घेऊन काय करावयाचें आहे ? त्यांखालीं अनंत दुर्गुणांचा पुष्कळदां वास असतो. गरिबांच्या झोपडींत जें सौख्य, जो आनंद, आणि जी शांति असते, ती श्रीमंतांच्या राजवाड्यांत क्वचितच दृष्टीस पडते. गरिबांच्या रम्य व साध्या गृहांतील मोकळ्या नैसर्गिक सद्‌गुणांचा सुगंध, हा श्रीमंतांच्या येथील कृत्रिम दुर्गुणाच्या दुर्गंधापेक्षां शतपटीनें बरा. ' गुणवंताचेंच दर्शन प्रेमलहरी नाचवितात.' मग ते गुण गरिबाचे असले तरी हरकत नाहीं ! "

" अहाहा ! सुशीले, किती हे तुझे उदात्त विचार ! आज तूं ह्या गरिबाला पदरांत घेऊन खरोखर धन्य केलेंस !" नारायणराव म्हणाले.

" हो, कांहींतरीच. ह्या दासीचें मात्र महद्भाग्य म्हणून हे चरण मला लाधले. " सुशीलेनें उत्तर केलें.

" प्रिये, आजच्या ह्या सौख्यप्रसंगीं आपण ह्या अस्ताला जाणाऱ्या पवित्र सूर्यास साक्षी ठेवून देवापाशीं हीच याचना करूं कीं, " देवा, अशाच तऱ्हेचे—आईबापांच्या पूर्ण संमतीनें, पण—परस्परांच्या खऱ्या हृदयमीलनानें विवाह होऊन सर्व जग सुखांत नांदो ! " असें म्हणून त्यांनीं एकमेकांच्या हातांत हात घालून सवित्यास अनन्यभावानें नमस्कार केला व मग नारायणरावानें सुशीलेस आपल्या बाहूंत घेऊन आपलें प्रेमचिन्ह तिच्या कपोलावर अंकित केलें. नंतर कांहीं वेळ त्या प्रणयबद्ध

तरुण जीवांच्या प्रेमाच्या पहिल्याच बहरांतील पहिल्याच भेटींत होणाऱ्या कितीतरी प्रेमगोष्टी झाल्यावर, कांहीं वेळानें जड अंतःकरणानें नारायण घरीं परतला.

## प्रकरण १७ वें.

## श्रीमंत सुशिक्षितांचें कर्तव्य.

आज अच्युतराव .व नारायणराव यांच्या परीक्षेच्या निकालाचा दिवस. दोघांचेहि पेपर फारच चांगले गेले होते. त्यांतल्या त्यांत नारायणरावांचे तर फारच फक्कड गेले होते. आमच्या सुशीलाबाई यंदाच मॅट्रिकमध्यें पास झाल्या असून त्यांचा बराच वर नंबर आला होता. यमुना व कावेरी या पुढल्या वर्षी मॅट्रिकला जाणार होत्या. सर्व मंडळी उत्सुकतेनें वर्तमानपत्राची वाट पहात होती. इतक्यांत "ज्ञानप्रकाश" म्हणून पोऱ्यानें मारलेली आरोळी ऐकूं आली. उत्सुकतेनें एक ज्ञानप्रकाश विकत घेऊन मंडळींनीं निकाल पाहिला. नारायणराव हे फर्स्टक्लास फर्स्ट आले होते. अच्युतरावहि पास झाले. सर्वत्र आनंदी आनंद झाला.

याप्रमाणें कांहीं दिवस जाऊन आनंदाचा पहिला भर ओसरल्यावर, 'पुढें काय करावयाचें ?' याच्याबद्दल विचार चालू झाला. मनोहरपंतांनीं ( अच्युतरावांच्या वडिलांनीं ) विनायकरावांस बोलावून घेतलें व त्यांस म्हटलें:—

"काय विनायकराव, आतां पुढें नारायणराव काय करणार ?"

"कोठें तरी नोकरी लावून देईन झालें. यापेक्षां मी गरीब अधिक काय करणार ?" विनायकराव म्हणाले.

"तें खरें. पण समजा, मी तुमच्या नारायणरावास इंग्लंडला कले-क्टरच्या परीक्षेस पाठविलें तर ?" मनोहरपंत म्हणाले.

"हा आपला माझ्यावर अनंत उपकार होईल" विनायकराव म्हणाले.

" आणि तसेंच हे आय. सी. एस्. होऊन आले म्हणजे आमच्या सुशीचा व त्यांचा विवाह करून टाकूं म्हणजे झालें. काय, तुम्हांस कसा काय हा बेत पसंत पडतो ? " मनोहरपंत पुढें म्हणाले. विनायकराव तर बिचारे थक्कच झाले. निदैवास अवचित चिंतामणि लाधला म्हणजे जशी त्याची स्थिति होते, तसें त्यास झालें. ते काय बोलणार ? हृदय भरून येऊन ते म्हणालेः—

" भाऊसाहेब, ( ह्याच नांवानीं मनोहरपंतास लोक संबोधित असत ) हे आपले उपकार माझ्याच्यानीं जन्मोजन्मींहि फिटणार नाहींत ! "

" छे हो विनायकराव, यांत उपकार कशाचे ? " मनोहरपंत म्हणाले, " मी तर हें प्रत्येक श्रीमंत सुशिक्षिताचें कर्तव्य समजतों. तुमच्या नारायणरावासारखा अलौकिक बुद्धिमत्तेचा हिरा केवळ द्रव्याभावीं कवडीमोल व्हावा, ही किती शोचनीय गोष्ट आहे ? आज आपल्या समाजांत असे कितीक हिरे असतील कीं केवळ द्रव्याभावामुळें त्यांस चमकावयास मिळत नाहीं. विनायकराव, " ग्रे " म्हणून एक फारच नामांकित आंग्ल कवि होऊन गेला. त्याच्या " एलेजी " नामक काव्यांत ह्या गोष्टीचें फारच बहारीचें वर्णन आहे. स्मशानभूमिकेंत फिरतां फिरतां प्रत्येक थडग्यापाशीं येऊन तो म्हणतोः—

" Perhaps in this neglected spot is laid
Some heart once pregnant with celestial fire,
Hands that the rod of empire might have swayed
Or waked to ecstacy the living lyre

ह्या ठिकाणीं—ह्या अज्ञात भूमीमध्यें—कदाचित् एखादा वागीश्वर किंवा " दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा " असें म्हणवून घेणारा एखादा जीव निद्रा घेत असेल ! आपल्या राजदंडाच्या धाकानें शत्रूस चळचळां कापावयास लावणारा एखादा सार्वभौम नृपति किंवा आपल्या नितांत मधुर काव्य-वीणेच्या तारा छेडून तिचे आलाप दिग्दिगंतरीं पसरविणारा एखादा कविकुलगुरु या ठिकाणीं निजला असण्याचा संभव आहे !—

"Full many a gem of purest ray serene
The dark unfathomed caves of ocean bear.

Full many a flower is born to blush unseen
And waste its sweetness on the desert air.

अरेरे, विनायकराव, तो कवि पुढें म्हणतो कीं:—" अत्यंत तेजस्वी व पाणीदार असे कितीतरी हिरे—अशीं कितीतरी नररत्नें—या समाजोदधीच्या अज्ञात अशा कड्याकपाऱ्यांतून झांकलेलीं असतील. तसेंच या निष्काळजी समाजोद्यानांत कितीतरी सुंदर व सौगंधिक मानवी कुसुमें फुललेलीं असतील. परंतु त्या हिऱ्यामोत्यांचें तेज तसेंच अज्ञात असें त्या कड्याकपाऱ्यांखालींच राहणार ना? आणि ह्या सौगंधिक पुष्पांचा सौरभ असाच निर्जन अरण्यांतील कुसुमाप्रमाणें—'वनींच कीं एक सुकोनि' जाणाऱ्या पुष्पाप्रमाणें फुकट जाणारना?—हाय, समाजा—निर्घृण अरसिक समाजा, ह्या गोष्टीकडे कधीं तूं लक्ष देणार?"

विनायकराव, अशा तऱ्हेचीं कितीतरी नररत्नें आपल्या मातृभूमींत असतील—अशा कितीतरी मानवी पुष्पांच्या कळ्या ह्या हतभागी आर्यावर्ताच्या उद्यानांत विकसोन्मुख झालेल्या असतील, नाहीं बरें? 'ग्रे' कवीहि तेच म्हणतो. तो म्हणतो:—

" इथें एखादा महात्मा स्वदेशभक्त हॅम्पडन् किंवा एखादा कवीश्वर मिल्टन् किंवा शौर्यशाली क्रॉमवेल् निजला नसेल कशावरून? परंतु अरेरे,

" Chill penuary repressed their noble rage
And froze the genial current of the soul.

केवळ दारिद्र्याच्या तडाक्यामुळे—द्रव्याची ऊब जवळ नसल्यामुळें—दारिद्र्यशीतानें गारठून काकडून जाऊन बापड्यांचे सर्व विचार, महत्वाकांक्षा व काव्यकल्पना जागच्या जागींच गोठून गेल्या असतील!" विनायकराव, " उत्पद्यंते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः " हें याचेंच अनुवादक असें आपल्याकडील वचन अगदीं शब्दशः खरें आहे बरें! पण अशा नररत्नांना दारिद्र्याच्या कपारींतून काढून त्यांच्या झगझगीत तेजाचा प्रकाश पाडणें, किंवा अशा मानवी कुसुमांची योग्य जोपासना व निगा राखून त्यांचा दिव्य सुगंध दशदिशांस पसरविणें, हें प्रत्येक श्रीमंत सुशिक्षिताचें कर्तव्य नाहीं काय? अशा नररत्नांस उदयास आणून सर्व

समाजाला—सर्व मानवतेला—व आपल्या देशाला त्यांचा फायदा करून देणें हें मी प्रत्येक धनाढ्य सुशिक्षिताचें कर्तव्य समजतों ! विनायकराव, चार चार पांच पांच मोटारी उडवून नायकिणींच्या नाचरंगाच्या जलशांत आणि इतर वाटेल तशा मनसोक्त चैनबाजींत पैसा उधळणाऱ्या नवकोट नारायणांनीं जर मनांत आणलें, तर केवढें कार्य होणार आहे ! परमेश्वरानें त्यांना तशी बुद्धि द्यावी, एवढीच माझी त्या परमात्म्यापाशीं प्रार्थना आहे. '' असें म्हणून मनोहरपंतांनीं बोलण्याच्या श्रमाचा एक सुस्कारा टाकला.

" परंतु आमच्या नारायणाच्या डोक्यांत शिक्षणाचें वेड फार भरलें आहे. तो म्हणतो ' मी इथेंच कुठें तरी शाळेंत नोकरी धरून माझ्या देशबांधवांस सुशिक्षित करीन.' '' विनायकराव म्हणाले.

" विनायकराव, ही त्याची फार कोती समजूत आहे. तुम्ही त्याला मजकडे लावून द्या, म्हणजे मी करतों त्याची समजूत. '' मनोहरपंत म्हणाले.

विनायकरावांनीं पुन्हा एकदा मनोहरपंतांचे आभार मानून त्यांना नमस्कार केला व ते नारायणास धाडून देण्यास गेले. अच्युतरावानें नारायणरावास सुशीला देण्याबद्दल व त्या कामीं विनायकरावांची संमति देण्याबद्दल विनायकरावांना विचारलें होतें, व त्यांनींही संमति दिली होती. पण तें पोरबुद्धीचें विचारणें म्हणून त्यांनीं विशेष लक्ष दिलें नव्हतें. पण तेंच आज खुद्द मनोहरपंतांनीं—भाऊसाहेबांनीं—नारायणास कलेक्टरच्या परीक्षेस पाठविण्याचें व तिकडून आल्यावर सुशीला त्यास देण्याचें उदार आश्वासन आपण होऊन दिलेलें पाहून विनायकरावास किती बरें धन्य वाटलें असेल ! मनोहरपंतांच्या चांगुलपणानें त्यांचें हृदय किती भरून येत असेल ! घराकडे जातांना त्यांच्या मनांत ह्याच विचाराच्या लाटा उसळत होत्या. विनायकराव लवकरच घरीं आले. नारायण आज घरींच आईशीं व बहिणीशीं गोष्टी करीत बसला होता. त्याला त्यांनीं निरोप सांगताच तो मनोहरपंतांकडे गेला. नारायण आल्यावर त्यास समोर खुर्चीवर बसावयास सांगून मनोहरपंत म्हणाले:—

" काय नारायणराव ! आमचा अभिप्राय तुम्हास कळला असेलच!" नारायण अदबीनें खालीं बसून म्हणालाः—" हो, कळला. "

" मग यावर तुमचें काय म्हणणें आहे ! " मनोहरपंत म्हणाले, " नारायणराव, तुमचें म्हणणें मला विनायकरावांकडून कळलें आहे. परंतु तुम्ही विचार करा. तुम्ही आय. सी. एस्. होऊन आल्यानें तुमच्या उद्दिष्ट कार्यांत व्यत्यय येईल असें तुम्हास वाटतें काय ! नारायणराव, कायद्यांनीं जरी निगडित कलेक्टर असला, तरी त्यांतलेत्यांतहि त्यास पुष्कळ कार्य करतां येईल, असें तुम्हास नाहीं का वाटत ? एखाद्या परकी कलेक्टरापेक्षां आपलाच कलेक्टर रयतेची अधिक कळकळीनें दाद घेणार नाहीं काय ! आपल्या लोकांचा राज्यकारभार, आपलेच लोक असल्यावर, अधिक न्यायाचा होणार नाहीं काय ! नारायणराव, तुम्ही कितीक गरिबांचे हाल वांचवाल, कितीक अनाथांना साह्य कराल, कितीक दुःखितांचें दुःख निवारण कराल. कलेक्टराचा दर्जा व हुकमत ही लहानसहान गोष्ट नव्हे. ह्या दर्जाचा, अधिकाराचा व हुकमतीचा अंतःकरणांतील स्वबांधवाविषयींच्या प्रेमाशीं व कळकळीशीं मिलाफ झाल्यावर किती कार्य होईल याचा, नारायणराव,तुम्हीच विचार करा. त्याचप्रमाणें तुम्हांला मिळणाऱ्या दोन दोन हजार रुपये पगारांतून तुम्हांस लागतील ते पैसे वांचवून ते तुमच्या अत्यंत प्रिय विषयाकडे तुम्हांस लावतां येणार नाहींत काय ! नारायणराव, तुमच्यासारख्या बुद्धिवान मनुष्यानें जर हीं कार्यें केलीं नाहींत तर कोण करणार ! नारायणराव, आपण आपला राज्यकारभार उत्कृष्ट रितीनें चालविण्यास समर्थ आहोंत हें दाखवून, आपणांस अंतिम होमरूल मिळवावयाचें आहे ना ! नारायणराव, इतर कार्यक्षेत्राला त्या त्या दर्जाचीं माणसें पुष्कळ आहेत आणि हळुहळु तीं निघतीलही. आणि तुम्ही त्यांच्याचपैकीं एक होण्यापेक्षां उच्च कार्य करीत राहून त्यांस तुम्हांस मदत करतां येणार नाहीं काय ! स्वदेशहिताच्या दृष्टीनेंहि पाहतां परक्या लोकांनीं येऊन, आपल्या येथील पैशावर चैन मारून, आपल्या पोतड्या भरभरून न्याव्या, ह्यापेक्षां तो पैसा आपला आपल्या देशांतच राहिल्यास, तें फायदेशीर नव्हे का ! काय नारायणराव, मी म्हणतों हें तुम्हांस पटतें ना ! " असें

म्हणून मनोहरपंतांनीं एक श्रमाचा सुस्कारा सोडला. नारायणरावांची आतां खात्री झाली कीं, आय. सी. एस्. होण्यांत स्वदेशाच्या दृष्टीनें तोटा नाहीं, तर उलट फायदाच आहे. तो म्हणालाः—

" होय, आपलें म्हणणें मला पटतें. "

" मग जाणार ना तुम्ही आय. सी. एस्. ला ? " मनोहरपंतांनीं विचारलें.

" हो, माझी हरकत नाहीं. हे आपले आम्हां गरिबांवर उपकार आहेत. "

## प्रकरण १८ वें.

## इंग्लंडास गमन.

ठरल्याप्रमाणें नारायणराव पुढल्या शुक्रवारच्या स्टीमरनें इंग्लंडला जावयास निघणार होते. आदल्या दिवशीं सायंकाळीं मनोहरपंतांच्या घराच्या त्याच बागेंत सुशीला—दारिद्र्यांत असलेल्याहि खऱ्या गुणाची चहाती सुशीला—आतां तर तें दारिद्र्यहि नाहींसें होऊन भावी उन्नतीच्या शिखरावर आपण विराजमान होणार ह्या काल्पनिक सुखाचा आस्वाद घेत प्रमुदित मनानें एका स्फटिकशिलेवर बसली होती. आपल्या भावी-पतीच्या लवकरच होणाऱ्या वियोगाच्या विचारानें किंचित् खिन्नतेची छटा तिच्या चेहऱ्यावर विराजत होती. इतक्यांत मागून तीच हांक ऐकूं आली—

" सुशीले ! "

सुशीलेनें मागें वळून पाहिलें तों हृदयेश्वराची स्वारी ! सुशीला सलज्ज उभी राहिली व तिनें मंद स्मित केलें ! तथापि नारायणरावांच्या चाणाक्ष दृष्टींतून तिच्या चेहऱ्यावरील खिन्नपणाची झांक झांकली गेली नाहीं. नितांत मनोहर मुखचंद्रम्यावर आलेलें खिन्नतेचें विरल अभ्रपटल पाहून नारायणराव म्हणालेः—

" का सुशीले, तूं खिन्नशी दिसतेस ? मी उद्या इंग्लंडला जाऊं ना?" आतां सुशीलेस जास्तच हुंदका आला. नारायणरावांनीं तिला हृदयाशीं धरून म्हटलें:——

" प्रिये, तूं कां रडतेस ? " सुशीला बिचारी कांहींच बोलेना. तिनें नारायणरावांच्या वक्षःस्थलावर आपलें कमनीय मस्तक ठेवून त्या सुखमय दुःखांत किंवा दुःखमय सुखांत कांहीं काळ अश्रुमोचन केल्यावर ती म्हणाली——

" नाथ, या दासीची आपणांस आठवण राहील का ? "

" सुशिले, हें तूं काय बरें मला विचारतेस ? माझ्यावर तुझा विश्वास नाहीं का ? लाडके, मी तुला आजन्म तरी विसरेन का ? " नारायणराव तिचें सांत्वन करीत म्हणाले.

" तसें नव्हे; पण वेड्या मनांत कांहींच्या बाहींच येतें. ' इकडे माझा विसर तर पडणार नाहींना ? इंग्लंडांतील दिव्यांगनेप्रमाणें असणाऱ्या आंग्ल ललनांचा व्यामोह तर माझ्या हृदयेश्वरास पडणार नाहींना ?' असें भेलें कांहीं तरीच जीवाला वाटतें. " सुशीला स्फुंदत म्हणाली.

" सुशीले, अजून तूं मला ओळखलें नाहींस कां ? माझ्यावर तुझा विश्वास आहे ना ? " नारायणरावांनीं अधीरतेनें विचारलें.

" हें काय बाई भलतेंच विचारायचें तरी ? " सुशिला त्यांतल्यात्यांत किंचित् हंसून म्हणाली.

" तर मग, " नारायणराव हृदयाच्या उत्कट प्रेमानें एकदम म्हणाले, " अशी शंका तूं बिलकूल मनांत आणूं नकोस. प्रिये, मला तुझा एक क्षणभरहि विसर पडणार नाहीं. यापेक्षां मी अधिक काय सांगूं ? " नारायणरावांचेहि नयन किंचित् आर्द्र झाले ! त्यांनीं पुन्हा सुशीलेस आपल्या हृदयाशीं घट्ट धरिलें आणि दोघेहि कांहीं काल मुग्ध निःशब्द सात्विक सुखाचा अनुभव घेत तशींच राहिलीं ! " परमेश्वरा ! हें सुख मला असेंच सदैव लाधो ! " सुशीलेनें देवास मनांत प्रार्थना केली. नंतर संध्याकाळ झाल्यावर दोघेही खिन्न अंतःकरणानें तेथून उठलीं.

आज नारायणराव अच्युतरावांच्या आग्रहास्तव त्यांच्याचकडे फराळास होते. दुसरे दिवशीं नारायणराव सर्वांचा निरोप घेऊन व विनायक-

राव, सरस्वतीबाई, मनोहरपंत इत्यादिकांचें पादाभिवंदन करून मुंबईस गेले. अच्युतराव व श्रीपतराव त्यांस पोंचवावयास गेले होते. स्टीमरवर चढल्यावर " पत्र वगैरे वरचेवर घालीत जा. प्रकृतीची काळजी घे. " इत्यादि औपचारिक बोलणीं झालीं. स्टीमरची टाइम झालीच होती. लवकरच शिटी देऊन स्टीमर बंदरांतून बाहेर पडली. नारायणरावांनीं आपला हातरुमाल हवेंत फडफडावून आमच्या मंडळींचा अखेरचा निरोप घेतला. स्टीमर दृष्टिआड झाल्यावर खिन्न मनानें दोघे मित्र परत फिरले इकडे आमच्या नारायणरावांचेंहि अंतःकरण असेंच खिन्न झालें. मुंबई बंदर जोंवर दिसत होतें तोंवर ते मोठ्या उत्सुकतेनें त्याकडे पहात होते. परंतु ते हळुहळु जसजसें दृष्टीच्या टप्प्याच्या पलीकडे जाऊं लागले तसतशी खिन्नपणाची छाया त्यांच्या वदनावर पसरूं लागली. आपल्या प्रिय मातापित्यांचा, प्रेमळ इष्टमित्रांचा, लाडक्या वाङ्निश्चित वधूचा आणि आपल्या प्रिय मातृभूमीचा वियोग कोणास बरें रडवीत नाहीं ? त्यांच्या वियोगाच्या कल्पनेनें कोणाचें बरें हृदय भरून येत नाहीं ? लंकेच्या अपार ऐश्वर्याचें धनी झालेल्या रामचंद्रासदुद्धां, चौदा वर्षें वनवासाच्या खडतर हाल-अपेष्टेंत ज्या मायभूमीचा वियोग झाला, त्या आपल्या प्रिय जन्मभूमीची आठवण होऊन गहिंवर आला व "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी" असे सहजोद्गार त्यांच्या मुखांतून बाहेर पडले. " आपल्या मायभूमीची आठवण झाल्यावर ज्याचें हृदय भरून येणार नाहीं असा एक तरी हतभागी प्राणी ह्या भूतलावर असेल काय ?" अशा अर्थाची " Breathes there the man" ही कविवर स्कॉटची उक्ति किती खरी आहे बरें!

आमच्या नारायणरावांच्या खिन्न मनांत वरीलप्रमाणें विचारलहरी सुरू होत्या. त्यांनीं आपल्या मातृभूमीस शेवटचें वंदन केलें व ते स्वतः-शींच म्हणाले—

"माते, मी आतां दोन तीन वर्षें तुला सोडून जात आहे. परंतु मला तुझा कधींहि विसर पडणार नाहीं. अहाहा ! माझी मातृभूमि, ' दशकत्रय-कोटीजनकंठनादिनी ' अशी माझी मातृभूमि, पुण्यपावन महात्म्यांची, धर्मवीर साधुसंतांची, रामकृष्णादि अवतारांची, शिवाजी–बाजींची वीरभूमि माते, मला तुझा कधींतरी विसर पडेल काय ? परकीयांनीं गांजलेल्या तुझ्या लेकरांचें कल्याण करण्याकरितां, तुझ्या पायांतील पारतंत्र्य-

शृंखला थोडीशी तरी हलकी करण्याकरतां, तिचा एक तरी दुवा सोडविण्याकरितांच—माते,मी इंग्लंडला जात आहे. तेव्हां मला आनंदानें निरोप दे. माते, ह्या अफाट दर्यास व ह्या तेजस्वी सूर्यनारायणास साक्ष ठेवून हा नारायण तुझ्या पायांवर हात मारून अशी शपथ घेतों कीं, मी इंग्लंडांत असतांना व इथें आल्यावर तुझ्याशीं—तुझा धर्म, तुझें सत्त्व, तुझी राष्ट्रीयता, तुझें तेज ह्यांच्याशीं—कधींहि बेइमान होणार नाहीं, हाच माझा निश्चय !" नारायणरावांच्या मनांतून ह्या सात्विक विचारांच्या लहरी वाहूं लागल्या व त्याचें तेज त्यांच्या वदनावर विलसूं लागलें. स्टीमर झपाट्यानें चालली होती. हळुहळु इतर देखाव्यांनीं नारायणरावांचें खिन्न मनाला विरंगुळा पडूं लागला. सकाळसंध्याकाळचा रविउदय व रविअस्ताचे वेळचा रविकिरणांचा रक्तसागर नीलसागराशीं मिलाफ पावे, त्या वेळचा देखावा मोठा बहारीचा दिसे ! त्याचप्रमाणें रात्रीची दिसणारी शोभाहि मोठी चित्ताल्हादक असे. आकाशोदधीवर तारकांचा फेस उसळत आहे, चंद्रम्याची नौका झुगझुग करीत त्यावरून चालली आहे, शशांकाचें शीड तीवर उभारलें आहे, हें पाहून व द्यावापृथिवीवरील दृश्यांचें हें विलक्षण साम्य अवलोकून आमच्या कविहृदयाच्या नारायणरावांस मोठी मौज वाटे!त्याचप्रमाणें डेकवर असणारे हजारों उतारू व त्यांच्या विविध गोष्टी यांच्याही सूक्ष्म अवलोकनानें—मानवी स्वभावाच्या विविध चित्रांच्या दर्शनानेंहि—त्यांची बरीच करमणूक होत असे.

## प्रकरण १९ वें

# वसंतव्याख्यानमाला.

आमच्या कुसुमपूर गांवीं दर मे महिन्याच्या सुट्टींत एक व्याख्यानमाला चालत असे. तिला " वसंतव्याख्यानमाला " असें अन्वर्थक नांव असे. सायंकाळीं चार मंडळी जमून कोठेंतरी गप्पाटप्पा करीत बसण्यापेक्षां सर्वांनीं एकत्र जमून ज्ञानदान व ज्ञानपान करावें, अशा स्तुत्य

उद्देशानें ही " माला " तेथील कांहीं सुशिक्षित व मेहेनती अशा वकील, व्यापारी इ. मंडळींच्या उत्साहानें दरवर्षी मोठ्या थाटानें पार पडत असे. मालेचे सेक्रेटरी हे निरलस कार्यकर्ते असल्यामुळें त्यांच्या दीर्घ-परिश्रमानें ही " माला " दरवर्षी सुगंधसुमनांनीं सुवासित होई. असो. त्याप्रमाणें आज रोजीं सायंकाळीं " पुनर्विवाह " ह्या विषयावर व्याख्यान होणार होते. वक्ते आमच्या वाचकांच्या परिचयाचे श्रीपतराव होते. सभेला गर्दी बरीच जमली होती. तथापि, सभा प्रशस्त उघड्या जागेंत भरत असल्यामुळें, उकाड्याचा त्रास नसे हें बरें होतें. स्त्रियांच्या करतां वेगळी व्यवस्था केली होती. सायंकालीन शीत समीरण आपल्या आल्हा-ददायक स्पर्शानें सर्वांचीं मनें प्रसन्न करीत होता. भगवान् सवित्याची कोमल ताम्र किरणें वृक्षपल्लवांतून हळूच मार्ग काढीत भूतलावर चित्र-विचित्र विखुरलीं होतीं. अध्यक्षस्थानीं अच्युतरावांचे वडील मनोहरपंत यांची योजना झाली. त्यांनीं श्रीपतरावांचा मंडळीस थोडक्यांत परिचय करून दिलाः—

" आजचे वक्ते, माझे मित्र रा. श्रीपतराव,यांची मी आपणांस नव्यानें माहिती करून द्यावयास हवी,असें मला कांहीं वाटत नाहीं.ते येथील एक सुप्रसिद्ध वकील आहेत. त्यांचा स्वभाव मोठा बाणेदार आहे. ते नुसते ओष्ठसुधारक नाहींत. कृतींत व भाषणांत ज्यांचा सदैव मेळ असतो अशा ज्या कांहीं थोड्या व्यक्ती आहेत, त्यांपैकींच ते एक आहेत. त्याचप्रमाणें, स्वदेशहिताची त्यांची कळकळही वाखाणण्यासारखी आहे.येथें निघालेल्या 'अनाथविद्यार्थीगृहा'स त्यांनीं २५ हजार रु. दिलेले आपणांस ठाऊक आहेतच. त्याचप्रमाणें शिक्षणप्रसाराचे कामांतही ते शक्य तितका यत्न करीत असतात, हें त्यांनीं चालविलेल्या 'नाइटस्कूल्स्'वरून आपणांस दिसून येईल. तसेंच ते येथील स्थानिककमिटींतहि किती दीर्घ प्रयत्नानें ती सुधारण्याचा यत्न करतात व जेणेंकरून शह-राची योग्य सुधारणा होईल अशी त्यांची अहर्निश तळमळ व इच्छा कशी असते हेंहि आपण जाणतच आहां. त्यांचें वाचनही बरेंच दांडगें आहे. त्यांना वाङ्मयाची गोडी बरीच असून मनु, याज्ञवल्क्य इ. कांचे धर्म-ग्रंथांचेंहि त्यांनीं अवलोकन केलें आहे. तसेंच आंग्ल वाङ्मयांतील तत्त्व-

ज्ञानाचीहि त्यांना गोडी आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे असे सर्वांग-सुंदर वक्ते आज आपणांस लाभले आहेत. तरी आपण त्यांचें भाषण शांतपणानें ऐकून घ्यावें अशी प्रार्थना करून मी रा. श्रीपतरावांना आपलें भाषण सुरू करण्याची विनंति करतों. '' याप्रमाणें अध्यक्षांनीं थोडक्यांत परिचय करून दिल्यावर श्रीपतराव टाळ्यांच्या कडकडाटांत व्याख्यानास उभे राहिले. ते म्हणाले:—

" आतां जो अध्यक्षांनीं माझा गौरव केला आहे, त्यास मी यत्किंचितही पात्र नाहीं. तथापि "परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य नित्यं" अशी थोरामोठ्यांची नेहेमींची तऱ्हा असल्यामुळें, ह्यांत त्यांच्या हृदयाचा थोरपणाच अधिक व्यक्त झाला आहे. असो.

आजचा विषय " पुनर्विवाह '' हा आहे हें आपणांस ठाऊकच आहे. या विषयावर विचार करणारा मनुष्य निःपक्षपातीं व सहृदय असा पाहिजे. पुनर्विवाहाची आवश्यकता किती आहे याचा आपणच विचार करा. यासंबंधानें " प्रेमसंन्यास '' नाटकांतील दुसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांतील महात्मा जयंताचें भाषण वाचण्यास मी आपणांस आग्रहाची विनंति करतों. दुहेरी अन्यायांत गढून गेलेल्या आपल्या समाजाचे चित्र उत्कटतेनें रंगविलेलें तेथें आपणांस वाचावयास मिळेल. तसेंच ह्या कामाचा प्रभाव मी आपणांस नव्यानें सांगावा असें नाहीं. मोठमोठ्या मी मी म्हणणारांचेंहि याच्यापुढें कांहीं चाललें नाहीं. विश्वामित्रासारख्या तपस्व्याची मेनकेला पाहून दिशाभूल झाली, वसिष्ठासारखा ब्रह्मनिष्ठ—अरेरे, प्रत्यक्ष आपल्या स्नुषेविषयींहि अभिलाष धरण्यास कचरला नाहीं, दिवसाची रात्र करण्याचे—दिवसा-अंधकार पाडण्याचे—अलौकिक सामर्थ्याचा पुरुष पराशर—पण शेवटीं त्याची देखील एका कोळ्याच्या पोरीला पाहून गाळण उडाली; महाराज, विचार करा, ह्या गोष्टी नुसत्या ऐकून त्याकडे कानाडोळा करून पुन्हां आपली अन्यायाची दंडेली चालवूं नका. बारा वर्षे ब्रह्मचर्याचा विडा उचलणारा अर्जुन मणिपूरच्या राजाची कन्या, नागकन्या उलूपी, इत्यादिकांच्या गळ्यांत पडतो, भिल्लिणीच्या मोहक नृत्यानें शंकराची तपश्चर्या ढळते, याचा आपण विचार करा. जरा खोल जा आणि यांतील तत्त्व शोधून काढा. महाराज, अशा पौराणिक कथा मी आपणांस किती तरी सांगू ? या कथा आपणांस काय

शिकवतात बरें ! “ बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ” हेंच तत्त्व त्या आपणांस शिकवीत नाहींत काय ? “ तथापि त्रैलोक्यं जयति मदनो देहरहितः ” हेंच खरें नव्हे काय ? ज्यानें ब्रह्मदेवाचें मातेरें केलें, इंद्र कुत्रा होऊन गौतमपत्नीच्या मागें लागला, चंद्र गुरुपत्नीगमन करण्यास कचरला नाहीं,—सहृदय सज्जनहो, असा ज्या ‘अनंगा’चा प्रभाव आहे, मोठमोठे ब्रह्मनिष्ठ तपस्वीहि ज्याच्यापुढें नमले असा ज्याचा प्रभाव,त्याच्या प्रभावांतून अल्लड बालिका—मोहपूर्ण जगतांत राहणारी अल्लड बालिका—जर सुटली नाहीं, तर त्यांत तिचा यत्किंचित् तरी दोष आहे काय ? हें किती साहजिक आहे, किती अपरिहार्य आहे, किती नैसर्गिक आहे, याचा आपणच विचार करा. निसर्गाचा कायदा हा असा आहे. त्याला दाबण्याचा तुम्ही कितीही यत्न केलात, तरी तो ह्या नाहीं त्या मार्गानें आपलें सामर्थ्य प्रगट करणारच. यासाठीं त्याला अंधपणानें नांवें ठेवण्याच्या आधीं आपण असा क्षणभर तरी विचार केला आहे काय कीं, हें किती बरें साहजिक आहे ! पंढरपुरास दरवर्षी अनंत अनाथ लेकरांचा वाळवंटांत त्याग करणाऱ्या बायांना कोणी कितीही नांवें ठेवोत; परंतु मी तर म्हणेन कीं हा निसर्गाचा प्रभावच होय. शरीरांत होणाऱ्या व्याधीचा योग्य रितीनें, योग्य स्थळीं व योग्य काळीं उपशम न केल्यास ती दुसऱ्या स्थळीं, दुसऱ्या काळीं व अन्य मार्गानें बाहेर पडल्यशिवाय राहील काय ? ‘ कादंबरीं ’ तील महाश्वेतेस पाहून होणारी पुंडरीकाची तळमळ आणि मृत्यु व महाश्वेतेची परवशस्थिति ह्यांचें चित्र कितीहि रोमँटिक् असलें तरी त्यांतहि बाण आपणांस एका तत्त्वाचा विचार करावयास लावीत नाहीं काय ? यांत निसर्गाकडे काय दोष आहे ? नैसर्गिक नियमानें जर मानव चालला, तर—तर पृथ्वीचा खरोखर स्वर्ग बनेल, यांत शंका नाहीं. महात्मा कवी वर्डस्वर्थनें हेंच एका काव्यांत ध्वनित केलें आहे. तो म्हणतो:—

“ To her fair works did nature link
The human soul that through me ran;
And much it grieves my heart to think
What man has made of man.”

तेव्हां आपणच आपल्या कृतीनें आपणास दुःखी करीत असतों,

M 9297

आपणच आपल्या अन्याय्य व जुलमाच्या कायद्यानें निसर्गाच्या साम्राज्यांतील जीवांस शृंखलाबद्ध करण्याचा यत्न करतो; व निसर्गाच्या कायद्यांशीं विसंगत अशा त्या दृढबंधनांचे कर्कश पाश त्याहूनहि दृढतर, सर्वगामी व सर्वव्यापी अशा निसर्गनियमानें तटातट तोडल्यास आपण बिचाऱ्या त्या प्राण्यास दोष देतो ! याला तो काय करील ? यांत आपलाच दोष आहे. सामाजिक नीतिच्या कल्पनेनें पाहतांहि आपण पुनर्विवाहास परवानगी दिल्यास किती तरी अनीतिच्या आचरणास आळा पडेल. आपल्या दाबादाबीनें हे अन्याय थांबणार आहेत असें आपण समजणें,म्हणजे म्हातारीनें कोंबडी घरांत दडवून ठेवल्यानें सूर्य उगवण्याचा राहील, असें समजण्याइतकेंच वेडगळपणाचें आहे. तुम्ही सरळ मार्ग दिल्यास ठीकच आहे; नाहींतर निसर्ग आपला सूड घेतल्याशिवाय राहणार नाहीं. पाण्याच्या प्रचंड प्रवाहास सरळ मार्ग असेल तर ठीकच; नाहींतर अनंत पाषाणांचा भेद करीत,जिकडे वाट फुटेल तिकडे,मिळेल त्या मार्गानें तें जात असतें. यासाठीं खरें कारण काय आहे हें शोधून काढून त्यावर उपाय करा. वरवरच्या दाबादाबीनें कांहीं होणार नाहीं. बर्क नांवाचा एक मोठा तत्त्ववेत्ता इंग्लंडांत होऊन गेला; त्यानें राजकारणाच्या बाबतींत आपल्या " फ्रेंच रेव्होल्यूशन " नामक पुस्तकांत जें म्हटलें आहे, तें येथेंहि लागू पडतें. तो म्हणतो:—

"Wise men will always apply their remedies to the causes of evil which are permanent, not to the occasional organs by which they act & the transitory modes in which they appear. Otherwise you will be wise historically, a fool in practice. The very same vice assumes a new body. The spirit transmigrates; and far from losing its principle of life by the change of its appearance, it is renovated in its new organs with the fresh vigour of a juvenile activity. It walks abroad; it continues its ravages whilst you are gibbeting the carcass, or demolishing the tomb. You are terryfying yourselves with ghosts & apparitions whilst your house is the haunt of robbers."

यासाठीं मी आपणांस पुन्हां एकदां हात जोडून विनंति करतों कीं महाराज, आपण एकदां ह्या सर्व अनर्थांच्या कारणांचा विचार करा.

यावरून माझें असें म्हणणें नाहीं कीं, तुम्हीं सरसकट सर्व विधवांचीं लग्नें लावींत मुटा किंवा सर्व विधवांनीं लग्नें करावींच. ज्या महात्म्या भगिनी आजन्म पवित्र राहण्याच्या असिधाराव्रताचें पालन करीत असतील त्यांना माझे शतशः दंडवत असोत. त्या केव्हांही जगद्वंद्य अशा विभूतीच होत. परंतु महाराज, आपण क्षणभर विचार करा कीं जी गोष्ट विश्वामित्र, वसिष्ठ, पराशरादि ब्रह्मनिष्ठांनाहि साधली नाहीं ती एखाद्या अल्लड बालिकेला साधणें शक्य आहे काय ? " यततो ह्यपि कौंतेय पुरुषस्य विपश्चितः । इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः " ह्या श्लोकाचा विसर पडूं देऊं नका. महाराज, या प्रकृतीचा जोर किती दांडगा आहे याचा क्षणभर विचार करा. "प्रकृतिं यांति भूतानि निग्रहः किं करिष्यति" हें वचन लक्षांत घ्या. ह्या मनाचें चांचल्य वायुहूनहि अधिक आहे, ह्या मनाच्या ओढी दुर्निवार आहेत. " आकाशाची घालवेल घडी " इत्यादि अशक्य गोष्टीहि करतां येतील असें सांगून मुक्तेश्वर म्हणतातः—" परी मनाच्या ओढी अनिवार ! " महाराज, अशी स्थिति असतांना—आपणांस हें ढळढळीत दिसत असूनहि—एखाद्या बालविधवेला आपण जुलमानें बाळपणींच संन्यासदीक्षेची शिक्षा भोगावयास लावतां, आणि मग दुर्दैवानें तिचें पाऊल वांकडें पडल्यास शेवटीं तिलाच नांवें ठेवून तिचें धिंडवडे काढतां, हा जुलुमाचा अतिरेक नव्हे काय ? महाराज, माझ्या म्हणण्याचा आपण भलताच अर्थ समजूं नये. आत्म्याच्या उन्नतीचा मी आपणांस मार्ग सांगत नसून आत्म्याचा प्रथम अधःपात वांचवा, अशी माझी आपणापाशीं याचना आहे. आणि हें लक्षांत ठेवा कीं आत्म्याला प्रथम अधःपाताच्या खोल दरींतून वांचविल्याशिवाय त्यास तुम्हांस एकाएकी कधींच आत्मोन्नतीच्या मार्गास लावतां येणार नाहीं. सर्वसाधारण समाज आत्मोन्नतीच्या अत्युच्च शिखरावर जरी विराजमान झाला नाहीं तरी, त्यानें जर आपला अधःपाताच्या खोल दरीपासून बचाव केला तरी त्यानें तें एक मोठेंच कार्य केलें असें होणार नाहीं काय ? आत्मोन्नतीच्या शिखरावर सर्वांसच विराजमान होतां येईल असें नाहीं. इतकेंच नव्हे,तर ती कठिणांतील कठिण व अशक्यांतील अशक्य

गोष्ट आहे. " मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये । यततामपि सिद्धानां कश्चिन्मांवेत्ति तत्त्वतः " हें वचन आपण लक्षांत ठेवा. असे महात्मे आपणांत हाताच्या बोटावरच मोजावे लागतील.तथापि, आत्मोन्नतीच्या शिखरावर विराजमान होणें जरी सर्वांसच शक्य नसलें तरी, आत्मिक अधःपातापासून आपला बचाव करणें हें तरी आपल्या हातचें आहे ना ? आणि याच अधःपातापासून आपण आपल्या भगिनींना वांचवा, आपल्या भगिनी आत्मोन्नतीच्या मार्गास लागाव्या अशी आपली इच्छा असल्यास, आधीं त्यांना आत्मिक अधःपातापासून वांचवा, अशी माझी आपणांस सविनय प्रार्थना आहे.

महाराज, आत्मिक अधःपातापासूनचा बचाव प्रथम आणि मग आत्मोन्नतीच्या मार्गाचें अवलंबन हेंच उत्कृष्ट तत्त्व आपल्या वंद्य पूर्वज महात्म्या ऋषींना मान्य होतें, हें, त्यांनीं आश्रमांच्या ज्या चार पायऱ्या लावल्या आहेत, त्यावरून उघड दिसून येत नाहीं काय ? सर्वसाधारण मनुष्यानें पायरीपायरीनेंच गेलें पाहिजे; एकदम उडी मारण्याचा यत्न केल्यास तो विफल होईल, आणि कदाचित् तो तोंडघशीं पडून त्याचा अधःपात होण्याचाहि संभव आहे,हें तत्त्व पूर्ण लक्षांत घेऊन त्या पुण्यपाद महात्म्यांनीं चतुराश्रमांची योजना केली नाहीं काय ? महाराज, ही योजना किती सयुक्तिक व पूर्ण विचाराची होती हें आपण, अशा त्या योजनेस दूर भिरकावून देऊन, एकदम मोठी उडी घेण्याचा यत्न करून अधःपात पावलेल्या मोठमोठ्या ब्रह्मनिष्ठ पुरुषांच्या उदाहरणांवरून लक्षांत घ्या, व ती चूक—त्या ब्रह्मनिष्ठांनीं केलेलीच चूक—आपण पुन्हां करूं नका, अशी माझी आपणास विनंति आहे. " " Otherwise you will be wise historically, a fool in practicc" अशा तऱ्हेचे बर्केसारख्या तात्त्विकास उद्गार काढावे लागूं नयेत,म्हणून महाराज, आपणांस आपल्या पूर्वज महात्म्यांनीं आधींच उपनिषदांत सांगून ठेविलें आहे कीं, " यान्यस्माकं सुचरितानि तानि त्वयोपास्यानि । नो इतराणि । "— " आमच्या वंशजांनो, आम्ही कितीही मोठे झालों, तरी आम्ही शेवटीं माणसेंच आहोंत. आमच्या हातूनहि चुका झाल्या असतील. तेव्हां त्या चुका तुम्ही पुनरपि न करतां, ' पुढच्याच ठेंच, मागचा शहाणा ' ह्या इतिहासाच्या तत्त्वास न विसरतां, ज्या आम्ही चांगल्या गोष्टी केल्या

असतील त्याच तुम्ही पुढें करा; इतर करूं नका. " हाच त्यांच्या म्हणण्याचा विस्तृत अर्थ नव्हे काय ? तेव्हां अशा तऱ्हेच्या त्यांच्या उपदेशास विसरून, केवळ अंधश्रद्धेच्या निष्ठुर परंपरेचे दास बनणें, म्हणजे केवळ दुराग्रहानें त्यांच्या उपदेशास हरताळ फांसणें नव्हे काय ? " क्षारं जलं कापुरुषाः पिबंति " अशा तऱ्हेचे आपणावर आरोप येऊं नयेत, यासाठीं मोकळ्या मनानें त्यांनीं आपणांस देशकालपरिस्थित्यनुरूप योग्य तो फेरफार करा असा उपदेश सांगितला, याउप्पर त्यांनीं काय करावें ? महाराज, पण अशाच त्यांच्या उपदेशाचें खरें तत्त्व लक्षांत घेऊन, रोगाची खरी चिकित्सा करणारा, अत्यंत दयाळू, कारुण्यानें व वात्सल्यानें ज्याचें हृदय सर्वस्वी भरलें आहे, व साधारण मनुष्याची धमक किती, त्याचे अंगीं नैतिक असिधारांचें तीक्ष्ण पातें सहन करण्याची किती अल्प ताकद आहे याचा खऱ्या कळकळीनें विचार करून दयार्द्र अंतःकरणानें तें पातें जितकें कमी तीक्ष्ण होईल व भासेल तितकें कमी करण्याचा यत्न करणारा, महात्मा भिषग्वर पराशर मुनि निघाला व त्यानें—त्या खऱ्या सुज्ञानें—खरें कारण ओळखलें व " Wise men will always apply their remedies to the causes of evil" ह्या महात्मा बर्कच्या उक्तीप्रमाणें त्या खऱ्या कारणावर उपाय सांगितला कीं, बाबांनोः—

" नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ ।
पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥ "

त्याचप्रमाणें नारद, मनु इ. कांहीं स्मृतिकारांनींहि यास अप्रत्यक्ष संमति दिली आहे.

महाराज, आपल्या पूर्वज पुण्यपाद ऋषींनीं सर्वसाधारण समाजास काय शक्य आहे याचा पूर्ण विचार करूनच ह्या चतुराश्रमांची योजना केली आहे, हें मी आपणांस वर सांगितलेंच. आमचा धर्म कधींहि एकदम निवृत्तिमार्गाचा उपदेश करीत नाहीं; कारण तो मानवजातीचे व्यवहार जाणतो. तो खरा कारणज्ञाता आहे. त्यास परिणामांचें पूर्ण अवधान आहे. म्हणूनच ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ आणि संन्यास अशी त्याची मालिका आहे. प्रवृत्तिनंतर निवृत्ति, उपभोगानंतर त्याग, अशी त्याची रीत आहे. परंतु ह्या त्याच्या मार्गास आपण आपल्याच

दोषानें दूर सारतों व मग वाईट परिणाम झाल्यावर त्यास नांवें ठेवतों, याला काय म्हणावें ? महाराज, नुसत्या दाबादाबीनें कार्य होत नाहीं हें मी वर सांगितलेंच आहे. चेंडू जितका जोरानें दाबावा तितका तो जोरानें वर उसळतो, झाड तोडलें असतां तें दुप्पट जोरानें वाढतें, पाण्याच्या प्रचंड लोंढ्यास मज्जाव केला असतां तें मिळेल त्या मार्गानें अनंत पाषाणांचा भेद करीत वाहत जातें, हें आपण लक्षांत घ्या. तेव्हां जुलमाची दाबादाबी हा कांहीं खरा उपाय नव्हे, हें मी पुन्हां सांगावयास पाहिजे असें नाहीं.

तसेंच या कामीं दैवास आपण दोष देऊं नका. "तिचें कर्म" असें म्हणूं नका. कारण असें म्हणूं लागल्यास आंधळे, पांगळे यांवरही आपणास दया करतां येणार नाहीं. कारण तिला वैधव्य आलें हें तिच्या दैवामुळेंच आलें हें खरें, तसेंच एखादा मनुष्य आंधळा, लंगडा, पांगळा, थोटा असा झाला तर तोहि त्याच्या दैवानेंच झाला नाहीं काय? मग त्यावर तुम्ही दया कां दाखवतां ? नाहीं, महाराज, नाहीं; सहृदय सज्जनांचे असे विचार कधींच नसतात. "जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणवी जो आपुलें" असें त्यांचें व्रत असतें. दुःखितांचें दुःख निवारावें, अनाथाला साह्य करावें, आर्तांचें भय वारावें, असें त्यांचें ब्रीद असतें. त्याच दयेच्या दृष्टीनें आणि करुणेच्या कृपेनें ह्याही अनाथ विधवांची आपण कींव करणार नाहीं काय?

यावरून माझें असें म्हणणें आपण समजूं नका, कीं तुम्ही सर्व इंद्रियें मोकाट सोडा. कारण मला ठाऊक आहे कीं, " इंद्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते । तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवांभसि ॥ " त्याचप्रमाणें—" The senses—full of delight as they are—will, no doubt, if we yield to them, wreck us, like the sirens of old, on the rocks and whirlpools of life. " हेंही वचन याचेंच अनुवादक आहे. विषयवासनेस सैरावैरा मोकाट सोडलीं असतां ती आपणांस अधःपाताच्या खोल दरींत नेऊन सोडील, हें तत्त्व मलाही कबूल आहे. पण महाराज, आपण विसरूं नये कीं तिला अजिबात दाबण्याचा यत्न केला असतांही तीच स्थिति पुष्कळ वेळां होण्याचा संभव आहे, हेंही पण तितकेंच खरें आहे. पाण्याला अजिबात बांध नसल्यास तें जितकें सैरावैरा धांवेल, तितकेंच त्यास भयंकर विरोधाचा

बांध घातल्यासही तें तो बांध फोडून आपल्या प्रचंड वेगानें दाही दिशांस दुप्पट जोरानें धांवत असतें, हें आपण विसरूं नये. महाराज, दडपशाही हें जसें राजनीतिचें खरें तत्त्व नव्हे, तसेंच तें धर्मनीतिचेंहि खरें तत्त्व नव्हे. यासाठीं खरा मार्ग म्हणजे मोरोपंत जे म्हणतात कीं, "जल तुंबतां तडागीं फोडावा लागतो जसा पाट" हाच होय. कोणचाही अतिरेक हा नेहमींच अहितपरिणामी असतो, हें केव्हांहि सत्यच आहे. हर्षवायूनें मनुष्य जसा वेडा होतो तसाच तो दुःखावेगानेंहि होत असतो, हें आपण विसरूं नये, आणि म्हणूनच यांतून नेहेमी मधला मार्ग खरे तत्त्वज्ञ काढीत असतात. शास्त्र कांहीं वेडें नाहीं. अतिरेक हा अहितपरिणामीं आहे हें त्यास पूर्ण ठाऊक आहे. विषयातिरेकानें जसा मनुष्याचा अधःपात होतो तसाच ह्यानेहि होतो हें तें जाणतें. महाराज, विषयांच्या सैरावैरा भुलीस भुलूं नये हें जितकें विधवांच्या बाबतींत सत्य आहे, तितकेंच तें विधुरांच्या बाबतींतही सत्य नाहीं काय ? तेव्हां अशा तऱ्हेचा वेडेपणाचा जुलूम त्या दोघांसही जाचक व अनीतिवर्धकच आहे हें अल्पविचारी दुराग्रही लोक जाणत नाहींत. परंतु कार्यकारणांचा विचार करणारे ज्ञाते तें जाणतात. आणि म्हणूनच त्यांनीं पायरीपायरीनें मार्ग आक्रमिण्यास सर्वसाधारण समाजास सांगितलें आहे. अभ्यासानें हळुहळु ह्या विषयापासून मानवानें परावृत्त व्हावें हा परमात्म्याचा उपदेश सर्वांसच सारखा आहे.मन कितीही चंचल असलें तरी :अभ्यासानें हळुहळु त्यास योग्य मार्गावर आणतां येतें. त्याला उन्मादाच्या अतिरेकाचे वेळीं योग्य विश्रामस्थान मिळवून देऊन नंतर त्यास परमात्मप्राप्तीच्या चिंतनाच्या अवघड कड्यावर चढावयास लावल्यास तें हळुहळू तसें करील यांत शंका नाहीं. कारण अभ्यासाची थोरवीच तशी आहे. श्रीकृष्णपरमात्म्याच्या " अभ्यासयोगेन ततो मां इच्छ आप्तुं धनंजय " या श्लोकार्धावर व्याख्यान करतांना ज्ञानेश्वरांनीं हेंच सांगितलें आहे. ते म्हणतातः—

" अथवा हें चित्त । मनोबुद्धिसहित।माझ्या हातीं अचुंबित । न शकसी देवो ॥ तरी गा ऐसें करीं।यया आठ पहारा माझारीं। मोटकें निमिषभरी । देतु जाय ॥ मग जे जे जे कां निमिख । देखेल माझें सुख । तेतुलें अरोचक । विषयीं घेईल ॥" आणि मग याप्रमाणेः—

" तैसें भोगाआंतूनि निघतां। चित्त मजमाजी रिघतां । हळुहळु पांडुसुता। मीचि होईल ॥ "

महाराज, हा उपदेश किती सुखकर, सोपा आणि सुलभ आहे बरें! अहाहा ! धन्य त्या महात्म्यांची! खरे शहाणे व तत्त्वज्ञ असतात ते अशाच उपदेशाचा अंगिकार करीत असतात. " Extremes are the ways of extremists." पण सर्वसाधारण समाजास असाच उपदेश हवा. तेव्हां पायाखालीं पूर्ण आधार घेऊन मगच जशी उडी मारायची, तसेंच ह्याचेंहि आहे. एकदम कोणत्याहि स्थितींत तें करतां येणार नाहीं. इतकेंच नव्हें, तर पुष्कळ वेळां अडचणीच्या प्रसंगीं " to fall back upon" अशी सैन्याची व्यवस्था नसल्यास मोठमोठ्या शूर वीर मर्दांसहि नामोहरम होण्याची पाळी येते, तसेंच कोणत्याहि बाबतींत आहे, हें आपण लक्षांत ठेवावें. अशाच मधील मार्गाचा उपदेश—

" यस्त्विंद्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन ।
कर्मेंद्रियैः कर्मयोगं असक्तः स विशिष्यते ॥ "

ह्या श्रीकृष्णाच्या वचनांत आहे. यासाठीं असल्या मधल्या मार्गाचें अवलंबन करा व विधवांच्या पुनर्विवाहाविषयीं सानुकंप व्हा, अशी माझी आपणांस प्रार्थना आहे.

महाराज, " Action & reaction are equal & opposite" हें सायन्सचें-निसर्गाचें-त्रिकालाबाधित तत्त्व किती बरें सत्य आहे ! जगाच्या इतिहासाकडे आपण दृष्टिक्षेप करा, आपणांस ह्याच तत्त्वाचा अनुवाद सर्वत्र दिसून येईल. बाब कोणचीहि असो, त्यांत हेंच तत्त्व आपणांस दृग्गोचर होईल. कोणत्याहि जुलमाचा अतिरेक फार वेळ टिकाव धरून राहात नाहीं, हेंच आपणांस तेथें पहावयास सांपडेल. महाराज, राजकीय व धार्मिक जुलुमाच्या अतिरेकानें इंग्लंडच्या एका जुलमी राजाचें मस्तक धडापासून वेगळें झालें व एकाला पदच्युत होण्याची पाळी आली. पोपसाहेबांच्या अनियंत्रित, जुलमी व दुराचरणी अंधसत्तेला लवकरच पायाखालीं तुडवून Reformation नें आपली पूर्ण सत्याची उज्ज्वल ध्वजा फडकावली. कार्लाइलसारखा महात्माहि ह्या नैसर्गिक कायद्याचें—

त्या त्रिकालाबाधित सत्याचें–उज्ज्वल तेज जाणून "फ्रेंच रेव्हॉल्यूशन" संबंधानें आपलें काय तत्त्व देतो हें लक्षांत घ्या. तो म्हणतोः—

"It is a truth though clad in hell-fire;......testifying once more that nature is preter-natural; if not divine, then diabolic.......In short, it was a "struggle for the infinite divine nature of Right, of Freedom, of Country ........"

जशी क्रिया तशी प्रतिक्रिया हा निसर्गाचा कायदा आहे. इतकेंच नव्हे, तर इतिहासाच्या एका विवक्षित कालाकडे दृष्टिक्षेप करून तो जर दुराचरण, बदफैली, चंगीभंगीपणा, चैन अशा दुर्व्यसनांनीं लडबडलेला आपणांस दिसला, तर त्यास नाकें मुरडणाऱ्या अज्ञ जनांनीं ह्या निसर्गाच्या सर्वव्यापी कायद्याकडे लक्ष द्यावें व त्या कालापूर्वी कोणत्याहि साध्या सुखास देखील कोण परमावधीचा जुलूम होत होता, हें लक्षांत घ्यावें. "अत्यंत चिक्कू बापाचा पुत्र तितकाच उधळ्या निघतो" असा साधारण नियमच आहे व तो ह्याच तत्त्वाचा दर्शक आहे. अत्यंत साध्या सुखासही मज्जाव करून, अंधळ्या जुलमानें सौख्यलेशही न मिळूं देणारा 'क्रॉमवेल' कालीन 'प्युरिटॅनिझम्' आणि त्यानंतर तितक्याच जोरानें आंग्लजनांचें होणारें दुराचरणांतलें अधःपतन हें आपण लक्षांत घ्या, अठराव्या शतकाच्या पूर्वार्धाचें 'जॉन डेनिस्' नामक एका विख्यात लेखकानें आपल्या Age of Pope नामक ग्रंथाच्या प्रस्तावनेंत केलेलें अंधःकारमय काळेकुट्ट वर्णन वाचा, आणि क्षणभर विचार करा–कीं ह्याचें कारण काय ? जगाचा इतिहासही आपणांस हेंच सांगतो. निसर्गाचा नियमही असाच आहे. यासाठीं महाराज, आपण कोणत्याहि अतिरेकानें अंध होऊं नका, अशी माझी आपणांस प्रार्थना आहे. "सद्गुणाचा अतिरेक हा पुष्कळ वेळा दुर्गुण होतो" अशी एक म्हण आहे. दोन परस्परविरोधी उज्ज्वल तत्त्वांचा झगडा लागला असतां दोहोंचेंहि अंध विश्वासानें एकांगी अनुकरणानें त्यांच्यांतील आनुषंगिक भयंकर निष्ठुर दोषहि—आणि दोषांवाचून कोणची चांगली वस्तू नेहमी मोकळी आहे ?–त्याजबरोबर येतात आणि ते कहर गुजरतात हें न विसरतां, प्रत्येक तत्त्वांतील ग्राह्य भाग आपण घ्यावा, अशी माझी विनंति आहे.

दयेचा अतिरेक हा जसा अधःपातास कारण होतो, तितकाच न्यायाचा निष्ठुरपणाही कारणीभूत होतो, हें आपण विसरूं नये. यासाठीं न्यायाची तीक्ष्ण कस्यार आपण दयेच्या सौम्य पाण्यानें सिंचित करा. दयेचा आणि न्यायाचा मिलाफ हाच खरा न्याय होय. महाराज, महात्मा शेक्सपीयरही आपणांस हेंच सांगतो:—

" And earthly power doth then show likest God's
When mercy seasons justice. "

महाराज, यासाठीं आपण अशा मधील मार्गाचा स्वीकार करा कीं, जेणेंकरून जीवित सुखमय होऊन आत्म्याचा निदान अधःपात तरी होणार नाहीं. प्रस्तुत परिस्थितीचें खरें कारण शोधून काढा. जरा खोल जा. अंध विश्वासाचा अतिरेक हा केव्हांहि वाईटच. समतोल बुद्धीनें मानवी दुर्बलता व पावित्र्यकल्पना यांचा विचार करून त्यांची योग्य सांगड घाला. कौन्तूर नामक एक लेखक आपल्या "आयडिअल्स् फॉर दि एन्लाइटंड अमंग अस" नामक पुस्तकांत हेंच सांगत आहे. तो म्हणतो:—

" The principles of Humanity are as worthy of our attention as the principles of sexual purity. If the principles of sexual purity are too attractive to be trifled with, the principles of Humanity are too important to be overlooked. No doubt, we are bound to attain that moral perfection which all aspire to. Still we should allow something for human frailties. It is true that nature cannot bear too much of laxity in morals; but it is equally true that she cannot bear too much of strictness in morals. ......Surely I should envy a mind that hankers after alleviating human miseries irrespective of sex or creed. "

महाराज, पौर्वात्य आणि पाश्चिमात्य तत्त्वांचा मिलाफ, ह्याचें क्षणभर तरी आपल्या मनश्चक्षूपुढें चित्र रेखाटा ! अहाहा ! कोण तो बहारीचा संगम ! कोण तो उज्ज्वल देखावा ! पण तेंच एकाच एका गोष्टीस

आंधळ्यासारखें चिकटून राहण्याचा दुष्परिणाम कार्लाइलनें पुढीलप्रमाणें वर्णन केला आहे:—

" Undue cultivation of the inward or dynamical province leads to idle, visionary impracticable courses, and especially in rude eras to superstition and fanaticism, with their long train of baleful and well-known evils. Undue cultivation of the outward again, though less immediately prejudicial, and even for the time many palpable benefits, must, in the long run, by destroying moral force which is the parent of all our force, prove not less certainly ... ... pernicious."

महाराज, पाश्चिमात्य आणि पौर्वात्य समाजाच्या इतिहासांचें आपण लक्षपूर्वक अध्ययन कराल, तर आपणांस ह्या कार्लाइलच्या दिव्य उक्तींत रेखाटलेलें द्विविध चित्र त्यांत दिसून येईल. भूतदयेच्या कल्पनेचे फाजील लाड व पावित्र्याच्या कल्पनेचे फाजील चोज ह्या दोहोंनींहि एकच स्त्रीवर्ग कसा अधःपात पावतो, हें आपणांस त्यांत दिसून येईल. गोषांतील अंधारकोठडींत कोंडून घातल्यानें स्त्रिया निर्मळ राहतील ही समजूत कशी निव्वळ भूल आहे, हें " गोषांतील सुंदर स्त्रिया " आपणांस शिकवितात, तर घटकोघटकीं काडीमोड करण्यास परवानगी देण्यानें कसे कुंटणखाने माजतात व मनुष्य अधःपाताच्या पायरीवर किती घसरतो,याचें चित्र पाश्चिमात्य देशांतून व "लंडन येथील बड्या लोकांचीं गुप्त कारस्थानें " इ. पुस्तकांतून आपणांस पहावयास सांपडतें. यासाठीं हीं दोन्हींही टोकें टाळावयास हवींत; आणि म्हणूनच महात्मा कार्लाइल पुढें म्हणतो:—

" Only in the right co-ordination of the two and the vigorous forwarding of both, does our true line of action lie. " महाराज, हा मधील मार्गच सर्वसाधारण समाजास योग्य असून शहाणे लोक अशाच मार्गाचें अवलंबन करीत असतात, हें मी वर सांगितलेंच आहे.

महाराज, अशाच मार्गाच्या अवलंबनाचें दर्शक अशी आपली चतुराश्रमांची व्यवस्था आहेना ? मग त्या आश्रमाची जी दुसरी पायरी ती जर आकस्मिक कारणानें एकाएकी तुटली गेली, तर पुरुषाच्या बाबतींत मात्र आपण ती सांधता आणि तेंच स्त्रीच्या बाबतींत मात्र आपण दगडासारखे कठिणहृदय बनता तें कां ? महाराज, न्यायाचा काटा नेहेमीं समतोल असला तरच तो न्याय. जेथें निःपक्षपातानें न्याय मिळत नाहीं ती स्थिति म्हणजे केवळ " Fanaticism "ची नव्हे काय ? महाराज, पुरुषास जसे विकार असतात तसे ते स्त्रीसही असत नाहींत काय ? वीसबावीस वर्षांच्या तरुणाचा ज्याप्रमाणें मोहपूर्ण जगतांत दिशाभूल होण्याचा संभव आहे, तितकाच तो वीस वर्षांच्या तरुणीच्याहि बाबतींत नाहीं काय ? शेक्सपिअरच्या " मर्चंट् ऑफ् व्हेनिस् " नामक नाटकांत दयेचा टैंभा मिरविणाऱ्या ख्रिश्चन लोकांकडून अत्यंत निर्दयपणें वागविल्या जाणाऱ्या ज्यू लोकांप्रमाणेंच ह्यांची स्थिति नाहीं काय ? ज्यू लोकांच्या अत्यंत उग्रोज्ज्वल प्रतिनिधीची सर्व बाजूंनीं नागवण होऊन छाती फाटून जाण्याच्या प्रसंगीं तो म्हणतोः—

" Hath not a Jew eyes ? Hath not a Jew hands, organs, dimensions, senses, affections, passions ?-Fed with the same food, hurt with the same weapons, subject to the same diseases, healed by the same means, warmed and cooled by the same winter and summer as a Christian is ? If you prick us, do we not bleed ? If you tickle us, do we not laugh ? If you poison us, do we not die ? "

महाराज, ह्या शायलॉकच्या उक्तीचा विचार करा. ती किती सत्य आहे बरें ! विधवांचीहि अशीच स्थिति नाहीं काय ? अरेरे, पांचपांच दहादहा पोरांचें लेंढार घरांत वाढलें असतांहि दुसऱ्या, तिसऱ्या किंवा चौथ्याहि भार्येशीं रत होणाऱ्या अंधा, तुझ्याच घरांत तुझीच अल्पवयी बालिका—दुर्दैवानें आकस्मिक घाला घालून वैधव्यहोमांत होरपळणारी तुझी बालिका—एका कोपऱ्यांत बसून मूक रुदनाचा टाहो फोडते आहे,

तें तुला ऐकूं येत नाहीं काय ? कांहीं तरी दया धर, करुणेचा लवलेश तरी अंगीं येऊं दे, आणि आंधळ्यासारखा गतानुगतिकत्वाच्या निष्ठुर परंपरेचा दास बनूं नकोस. महाराज, यांत आपल्या अत्यंत प्राचीन पूर्वजांस नांवें ठेवणें एका अर्थी बरोबर होणार नाहीं. कारण निष्ठुर सत्याच्या न्यायाची वांटणी ते दोघांवरही सारखेच करीत असत. त्यांनीं निदान हा भेदभाव तरी दाखविला नाहीं. परंतु महाराज, शेवटीं ते मानवच होते ना ? शुद्धतेच्या आणि पावित्र्याच्या फाजील उज्ज्वल कल्पनेला बळी पडून ते दुसऱ्या अतिरेकाच्या टोंकास धावले व आपण घालतों हा नियम अत्यंत frail अशा सामान्य जनांस कितपत सहन होईल याचा विचार न करतां, त्यांनीं सरसकट पावित्र्याची तीक्ष्ण कट्यार सर्वांच्याच मानेवर धरली. जुलुमाचा संन्यास हा खरा संन्यास नव्हे,हें तत्त्व ते विसरले व त्यांची fanatical zeal इतक्या थरास पोंचली कीं, कार्लाइलनें Undue cultivation of the Dynamical चें वर्णन केल्याप्रमाणें, इच्छा असो वा नसो, ‘ धर विधवेला आणि घाल अग्नींत ’ असें करून, बाहेर पडण्यासाठीं धडपडणाऱ्या बिचाऱ्या त्या गरीब प्राण्यास बांबूंच्या काठ्यांनीं आंत लोटून, तिच्या आक्रंदनांनीं जणूं काय आपल्या पाषाण-हृदयास पाझर फुटेल म्हणून अनंत वाद्यांच्या घोषांत त्याला बुडवून टाकून, ते आपणांस कृतकृत्य व धन्य मानूं लागले. महाराज, त्या एकच मासल्याचा निष्ठुर, दयारहित न्याय देणारे ऋषी तरी एकपरी बरे म्हणतां येतील. परंतु त्यानंतर येणारे कायदेपंडित आपल्या जातीच्या लोकांवर म्हणजे पुरुषांवर मात्र दया दाखवून त्यास दुसरीं लग्नें करण्याची मुभा देऊं लागले आणि गरीब बिचाऱ्या दुसऱ्या sex मधील स्त्रियांना मात्र ते निर्दय-पणानें वागवूं लागले. दोघांसही द्वितीय विवाहाची परवानगी नव्हती त्यावेळीं अनंत अनाचार माजूं लागलेले पाहून, त्यांनीं पुरुषांना मात्र लग्नाची परवानगी दिली, परंतु स्त्रियांवर मात्र त्यांचा करडा जुलूम कायमच राहिला. कारण ते पडले पुरुष; त्यांना त्यांच्या दुःखाची काय कल्पना येणार ? ‘ परदुःख शीतल ’ म्हणतात तें खरेंच. परंतु स्वतांला शहाणे म्हणवून घेणाऱ्या ह्या पंडितांना तरी तें उमजावयास पाहिजे होतें. पण शेवटीं ते आपल्या जातीवर गेलेच. हीच सत्ता जर स्त्रियांच्या हातांत

असती तर बरोबर याच्या उलट प्रकार कदाचित् आपल्या दृष्टीस पडला असता, असें ' मेन् 'नें आपल्या " हिंदुलॉ " मध्यें म्हटलें आहे. परंतु वस्तुस्थिति उलट होती. पण शेवटीं त्याचा शेवट काय झाला ? अत्यंत पवित्रतेची पुतळी समजली जाणारी ती गरीब बिचारी बालिका आपला देह दुसऱ्यास विकूं लागली. निसर्गानें आपला सूड उगवला. आणि शेवटीं या सर्व अनर्थांचें मूळ लक्षांत येऊन महात्मा भिषग्वर पराशर निर्माण झाला, व सदा विजयी अशा नैसर्गिक नियमास पटापट बळी पडून समाजाकडून छळ पावणाऱ्या गरीब मुक्या प्राण्यांना त्यानें ग्वाही दिली कीं बालिकांनो, " नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ । पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥ " महाराज, असा हा इतिहास आहे. यापासून आपण योग्य तो बोध न घेतां केवळ अंधपरंपरेचे दास बनल्यास आपण " Wise historically, but a fool in practice " बनूं. यासाठीं आपण सदयहृदय व्हा, अशी माझी आपणांस विनंति आहे.

महाराज, " सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि । प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति " अथवा " इंद्रियस्येंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ " इ. गीतेंतील श्लोकांचा आपण विचार करा, म्हणजे हे नैसर्गिक नियम पूर्ण साहजिक आहेत, स्वभावसिद्ध आहेत, 'व्यवस्थित' आहेत हें तत्त्व गीतेसहि पूर्ण कबूल आहे हें आपणांस दिसून येईल. आणि याचसाठीं, " यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे । मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥" असें सांगून, निग्रह कितीही असला तरी इंद्रियांचे स्वभावसिद्ध व्यापार सुटत नाहींत हें जर उघड आहे, तर इंद्रियांच्या वृत्ति व त्याबरोबरच सर्व कर्में व सर्व इच्छा व असंतोष नष्ट करण्याच्या भरीस पडणें म्हणजे दुराग्रह आहे, असें श्रीकृष्ण सांगतात. व यासाठीं त्यांना दाबण्याचा व समूळ नष्ट करण्याचा यत्न न करितां त्यांना आपल्या पूर्ण कह्यांत ठेवा, तुम्ही त्यांच्या ताब्यांत जाऊं नका—" तयोर्न वशमागच्छेत् "—इतकाच त्यांचा उपदेश आहे. दुसऱ्या अध्यायांतील स्थितप्रज्ञाच्या वर्णनाचें साराहि हेंच आहे. खऱ्या दुःखाचें मूळ कामाचे ठायीं असणाऱ्या संगांत व आसक्तींत आहे;

यासाठीं त्या दुःखाचें निवारण करण्यास त्या संगाचा व आसक्तीचा त्याग करा, असें त्याचें सांगणें आहे. निष्काम व निस्संग बुद्धीनें जो विषयांचें सेवन करतो, तोच खरा स्थितप्रज्ञ होय. 'सर्व प्रकारची सुधारणा म्हटली म्हणजे या प्रबल मनोवृत्तीस योग्य आळा घालणें ही होय; समूळ नाश करणें ही नव्हे,' हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्याचप्रमाणें काल जसजसा बदलतो तसतसे व्यावहारिक धर्मांतहि फरक पडत जातात. सुधारणेच्या इतिहासाची वाढही अशीच आहे. नुकत्याच सांगितलेल्या इतिहासाची आपणांस आठवण असेलच. ती विवाहाबद्दल झाली. परंतु सध्यां आपण जसें विवाहाचे बाबतींत विशेषेंकरून फ्रान्स, अमेरिका वगैरे देशांत पूर्ण स्वातंत्र्य पाहतों, तसें आपल्याकडेहि एके काळीं होतें. पूर्वकाळीं स्त्रियांस विवाहाची मर्यादा नसून त्या या बाबतींत स्वतंत्र होत्या. परंतु पुढें या आचाराचे दुष्परिणाम नजरेस आल्यावर श्वेतकेतूनें विवाहाची मर्यादा घातली, असें महाभारत अ. १२२ यांत म्हटलें आहे. त्यापुढील इतिहास मी आपणांस वर सांगितलाच आहे. यासाठीं धार्मिक, नैतिक, इत्यादि समजुतींच्या वाढीप्रमाणें होणाऱ्या सुधारणेबरोबर आपणाहि सुधारलें पाहिजे. उत्कृष्ट तत्त्वांचा लोप न होऊं देतां देशकालपरिस्थित्यनुरूप योग्य तो बदल केला पाहिजे. केवळ एकाच एका गोष्टीस चिकटून राहून, भविष्यत्कालास भूतकालाच्या पायाखालीं बांधून घालण्याचा यत्न करणें, म्हणजे मानवी जातीचा निःपात करणें आहे. " Change or die is the watchword of Nature " हें वचन याचेंच दर्शक आहे. कार्लाइलहि आपणांस हेंच सांगतो:—

" How often in former ages by eternal creeds, eternal forms of Government and the like (religion etc.) has it been attempted, fiercely enough, and with destructive voilence, to chain the future under the past; and say to the Providence ... ... ... hitherto shalt thou come and no farther ! a wholly insane attempt; and for man himself, could it prosper, the frightfulest of all enchantments, a very life-in-death ... ... ... Could

you ever spell-bind man into a scholar merely, so that he had nothing to discover, to correct. ... ... ... ... man then were spiritually defunct, the species of man had ceased to exist. The task and destiny of man is to be in turns Apprentice and Workman or Scholar, teacher, discoverer; by nature he has the strength for knowing and imitating, but also a strength for acting, for knowing on his own account. Gods are kinder far to us. As Phloogiston is displaced by oxygen and the epicycles of Ptolemy by the ellipses of Kepler; so does paganism give place to catholicism, tyranny to monarchy, and feudalism to representative government.... ... ... ... .... The true past departs not, nothing that was worthy in the past departs but if the soul is immortal the body does and must out of necessity change... ... .... ... ...In change therefore there is nothing terrible, nothing supernatural; on the contrary it lies in the very essence of our lot and life here. Today is not yesterday, we ourselves change; how can our works and thoughts, to be the fittest, continue always the same ? Change is needful; and if the ancient captains can no longer yield guidance, new must be sought after; for, the difficulty lies not in nature but in artifice" etc.

सहृदय सज्जनहो, माझें व्याख्यान बरेंच लांबलें. तेव्हां आपण माझ्या सर्व मुद्यांचा शांत व निःपक्षपात बुद्धीनें विचार करा, एवढीच शेवटीं विनंति करून व आपण शांतपणें माझें भाषण ऐकून घेतलेंत याबद्दल आपले आभार मानून, मी आपली रजा घेतों.'' असें म्हणून टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटांत श्रीपतरावांनीं आपलें भाषण संपविलें व ते स्वस्थानापन्न झाले. नंतर एकदोन किरकोळ वक्त्यांचीं भाषणें होऊन

शेवटीं अध्यक्षांनीं व्याख्यानाची फार स्तुति केली व त्यांतील विषय-प्रतिपादनाची शैली व कळकळ व सांगोपांग विचार इत्यादिकांचें वर्णन केलें, व नंतर सभा बरखास्त झाली. जातांना सर्व विचारी लोक श्रीपत-रावांच्या विद्वत्तेची स्तुति करूं लागले.

## प्रकरण २० वें.

## कावेरी.

मागें एका प्रकरणांत विनायकराव जोशी व त्यांच्या पत्नी सरस्वतीबाई यांच्या कुटुंबावर निरनिराळ्या तऱ्हेचे प्रसंग येऊन त्यांच्या भयंकर आचीनें त्यांचीं मनें कशीं पोळलीं होतीं आणि शेवटीं तें जुनें अंध घराणें शेवटीं कसें बऱ्याच सुधारकी मताचें झालें होतें याचें आम्हीं वर्णन केलेंच आहे. कालाची गति खरोखरच धन्य आहे. ज्या विनायकरावांनीं ठिसुळ अशा ज्योतिषाच्या ठोकताळ्याला आणि द्रव्यराशीला भुलून आपल्या यमुनेस एका वृद्ध कपीच्या गळ्यांत बांधून तिला आजन्म वैधव्ययातनांत लोटलें, त्याच विनायकरावांनीं आतां विचारपूर्वक मनुस्मृत्यादि ग्रंथांचें अवलोकन करून त्यांतील एका दिव्य श्लोकांतला उपदेश आचरणांत आणण्याचा ठाम निश्चय केला. तो मनूचा उत्कृष्ट श्लोक म्हणजे " मुलगी योग्य वर पाहून अर्पण करावी, पण घाईनें अयोग्य वरास देऊं नये. त्यापेक्षां बेहत्तर आहे ती आजन्म कुमारिका राहिली तरी. " अशा तऱ्हेचा वाचनांत आल्यापासून तर "मी माझ्या कावेरीच्या लग्नाची आतां मूर्खपणाची घाई कधींच करणार नाहीं " अशी त्यांनीं शपथ घेतली. त्यांचा निश्चय हा सुनिश्चय होता. आणि अशा सुनिश्चयी मनुष्यास " सत्यसंकल्पाचा दाता भगवान " असा ईश्वरहि त्यांतले त्यांत प्रोत्साहनपर आनंदाचा वांटेकरी करीत असतोच. यमुना व कावेरी यंदा मॅट्रिक्युलेशन पास झाल्या, हा त्यांतले त्यांत विनायकराव व सरस्वतीबाईस आनंदच झाला. सरस्वतीबाईनें त्यांच्यावरून निंबलोण उतरून टाकलें. यमुनेच्या पाठच्या

कपाळाकडे पाहून सरस्वतीबाईच्या डोळ्यास खळकन् पाणी आलें ! पण त्यांनीं तें कोणास दिसूं नये म्हणून झटकन् पदरानें पुसून टाकलें.

असो. याप्रमाणें आनंदाच्या लहरीचे चार दिवस पार पडले. एके दिवशीं प्रातःकाळीं कावेरी आपल्या घराच्या मागचे बाजूस असलेल्या रम्य उद्यानांत एक आंग्ल कादंबरी वाचीत बसली होती. प्रातःकालचा तो समय होता. बालार्काचे कोमल ताम्र किरण उद्यानांतील हरिततृणाच्छादित भूप्रदेशावर, प्रातःकाळीं आनंदानें डोलणाऱ्या पुष्पराजींवर, लहान लहान अशा हिरव्या वृक्षपर्णांवर, दूरवर दिसणाऱ्या पुष्पावतीच्या क्षुद्र तरंगावर, आणि कावेरीच्या नवयौवनसंपन्न देहलतिकेवर पडून त्यांस रंजित करीत होते. प्रातःकालीन वायूच्या मंदशीतल लहरी लतिकांस डोलवीत होत्या, नवविकसित कुसुमांस हंसवीत होत्या, कोकिलप्रभृति पक्षिगणाच्या मंजुळ ईशस्तवनाशीं एकरूप होत होत्या, कावेरीच्या कृष्णकेशकलापाशीं क्रीडत होत्या. उषासुंदरीच्या प्रेमलाञ्छित कपोलांची लाली पूर्व दिग्प्रांतास अरुण रंगानें रंगवीत होती. हा आनंदाचा, बहारीचा देखावा त्या सुंदर उद्यानांत सर्वत्र भरला होता. ब्रह्मानंदीं मन तन्मय करण्याला अशा स्थलांची केवढी मदत होत असेल, अशा ठिकाणीं परमात्म्याच्या रम्य मूर्तीच्या ध्यानांत नयनांतून प्रेमाश्रुजलांचा किती वर्षाव होत असेल, ते त्या भाविक जनांसच ठाऊक; राधेनें अशाच रम्य ठिकाणीं लावण्यसुंदर कृष्णमूर्तीचें ध्यान धरून त्यास आळविलें असेल, मिराबाई अशाच दिव्य ठिकाणीं 'कृष्ण कृष्ण जय ' नामाचा घोष करून तन्मय झाली असेल, प्रेमळपणाची कारुण्यमूर्ती कान्हुपात्रा अशाच आनंदधामीं टाळछंदाच्या साक्षात्कारांत दंग झाली असेल ! अहाहा ! धन्य धन्य त्या प्रेमळ स्त्रिया कीं, परमात्म्याच्या रम्य भजनांत ज्यांचें देहभान विसरून तन्मय होत्सात्या त्या प्रेमाश्रुजलानें न्हाल्या ! पण हें काय ? आमच्या कावेरीच्या नयनांतून कसल्या बरे प्रेमाश्रुधारा वाहात आहेत ? ती पहा ती कशी त्या पुस्तकाच्या वाचनांत अगदीं तन्मय झाली आहे. तिच्या सध्यांच्या परिस्थितीशीं अगदीं तंतोतंत जुळणारा देखावा ती वाचीत असतां तन्मयपणाच्या भरांत " धन्य धन्य " असे उद्गार तिच्या तोंडून बाहेर

पडले. पण इतक्यांत ती देहभानावर येऊन तिनें आपले प्रेमाश्रु पदरानें पुसले. तिची विचारमालिका पुन्हां सुरू झाली:—

" अहाहा ! परमेश्वरा ! अशा तऱ्हेचें स्वर्गीय सौख्य माझ्या ललाटीं असेल का ? किती ह्या नायकाचे हे थोर उद्गार ! काय त्याचें तें दिव्य प्रेम ! ऐहिक गोष्टींतच गुरफटून वधूवरांच्या खऱ्या प्रेमाच्या हृदय-मीलनाचा विचारहि न करतां, केवळ आपल्या थोर घराण्याच्या माना-साठीं विसंगत जोडप्यांच्या विवाहग्रंथी बांधणाऱ्या मोठमोठ्या श्रीमंतांस त्यांनीं खरोखर खालीं पहावयास लाविलें आहे ! प्रेमाचा थोरपणा हाच सर्वांत श्रेष्ठ नव्हे काय ? दिव्य स्वर्गीय प्रेमास अमुकच ठिकाणीं तूं रहा असें कसें सांगतां येईल ? सर्व जगांत भरून उरणाऱ्या चिच्छक्तीला अमुकच ठिकाणीं कसें कोंडून घालतां येईल ? जेथें हृदयाची उत्कटता दृग्गोचर होईल तेथें ही शक्ति आपल्या दिव्य प्रकाशानें प्रकट होते. ' वरील झळाळ ' पाहून भुलणारी ही देवता नव्हे. अंतःकरणाची तळ-मळ आणि खऱ्या भक्तीचा पूर जेथें अखंड वाहतो, " नेत्रीं जळ वाहो सदा । आनंदाचे रोमांच " अशी जेथें तन्मयवृत्ति असते, तेथेंच ह्या दिव्य तत्त्वाचा वास असतो. तें जात पहात नाहीं, वर्ण पहात नाहीं, त्याला दुसरें कांहीं नको असतें. त्यानेंच महारांस आलिंगन दिलें व भिल्लिणीचीं बोरें खाल्लीं. याची भाषा हृदयाची आहे. हृदय हृदयाशीं बोलतें, " मनाच्या मनाला चिंतन " लागतें; परंतु अशा त्या प्रेमळ हृदयाच्या दिव्य सारंगीस बोलावयास लावणारा या प्रेमळ प्रणयकथेंतील नायकासारखा नायक क्वचितच दृष्टीस पडतो. परमेश्वरा, आमच्या समाजांत याची जाणीव कधींरे उत्पन्न होईल ? केवळ बाह्य शरीरावरील वस्त्रांची गांठ मारल्यानेंच जर हृदयाचीहि तशीच ग्रंथी जडली असती, नाना तऱ्हेच्या वाद्यांच्या जयघो-षानेंच जर हृदयांतही आनंदाचा जयघोष होता, केवळ बाह्यालंकारानेंच जर हृदयें अलंकृत होतीं, तर मग उत्तम सौगंधिक पुष्पांची रास देवावर रचल्यानें, नानातऱ्हेच्या अलंकारानीं त्यास सजविल्यानें, आणि नाना वाद्यांचा गजर केल्यानें परमात्मा सर्व पुजाऱ्यांस भाळला असता ! परंतु देवाचें प्रेम जसें अशा बाह्य उपाधीनें विकत

घेतां येत नाहीं, तसेंच प्रेमदेवाचें प्रेमही अशा बाह्य भपकाऱ्यानें विकत घेतां येत नाहीं ! "म्हणोनि भाक्तिगा एथ सरे । जाति अप्रमाण" हें वचन दोहींकडेहि—अथवा एकाच चित्तत्वाच्या दोन्ही स्वरूपाचे ठायीं—सारखेंच लागू नाहीं का ?" विचार करतां करतां कावेरी अगदीं तन्मय झाली, आपण कोठें आहोंत याचा क्षणभर तिला विसर पडला, आणि "अशा दिव्य प्रेमाचे झणत्कार माझ्या हृदयवीणेंतून काढणारा दिव्य गायक, देवा ! मला लाभेल का ?" असे उद्गार तिच्या नकळत तिच्या-तोंडून बाहेर पडले. पण इतक्यांत ती पुन्हा सावध होऊन तिनें इकडेतिकडे पाहिलें आणि कोणी जवळ नाहीं असें दिसल्यावर तिला जरा बरें वाटलें. प्रेमांत रंगलेल्या जीवाची गोष्ट कांहीं अजब असते. त्यांत त्याच्या पहिल्या बहारांत तर सर्व वृत्ति अगदीं तन्मय होऊन प्रेमअमृताचें सारखें पान करीत असतात. तिनें आपल्या पोलक्यांतून एक सुंदर फोटो काढला व त्याकडे कांहीं वेळ तन्मयवृत्तीनें पाहून ती आपणांशींच बोलूं लागली:—

"काय बाई मेलें मन वेडें तरी! त्या दिवशीं सुमतीबाईच्या इथें सहज गेलें होतें तों त्यांनीं मला हा फोटो दिला आणि, "का कावेरी ? आवडतो का तुला आमचा अच्युत ?" असें त्यांनीं मला विचारलें. इश्श ! काय बाई तरी असें विचारणें ! परंतु वेड्या मना, पहिल्या पासूनच असलेल्या तुझ्या प्रेमलतिकेला सुमतीबाईच्या वाक्जलानें टवटवीत केली खरी; पण वेड्या, तूं ह्या ऐहिक लोकांतला आहेस. तूं गरीबाच्या कुळांतला आहेस ! तुझ्या दिव्य गायनाच्या प्रेमकल्पना या सर्व स्वर्गांतल्या. तुझा भिकाऱ्याचा कोण अंगीकार करणार ! देवा, मज गरीबाला तिकडून पदरांत घेणें होईल का ? पण वेड्या मना, तूं उगीच कां बरें अशी भलतीच आशा करतोस ? शेवटीं निराशेच्या दारुण यातनांत अखंड तळमळत पडण्यासाठीं कां उगीच धडपडतोस ?" नवयौवनाच्या प्रेमाचा जोर कांहीं जबरदस्त असतो. त्या विचारमालिकेंत शेवटीं शेवटीं निराशेचीं अभ्रपटलें येऊन त्यांनीं तिच्या वदनचंद्रास झांकून टाकलें. "हाय !" अशा तऱ्हेचा दुःखाचा तीव्र सुस्कारा टाकून कावेरी क्षणभर बेशुद्ध झाली. इतक्यांत तिच्या मागें येऊन प्रणयानंदाची वाट पहाण्याच्या आनंदांत उभा असणाऱ्या अच्युतरावांनीं घाबऱ्या

घाबऱ्या तिला आपल्या मांडीवर घेतलें. तिचे विखुरलेले केंस साफ केले, आणि वारा घालून ते तिला सावध करूं लागले. थोड्याच वेळानें कावेरी सावध झाली तों प्राणनाथांची मंगलमूर्ति समोर उभी !

" प्रिये, तुझी इतकी कां निराशा झाली ? हा चरणाचा दास अंकित असतां तूं असें वेड्यासारखे निराश कां बरें व्हावेंस ? " अच्युतराव प्रेमभरानें म्हणाले, " तूं गरिबाची झालीस म्हणून काय झालें ? तूं सुंदर व गुणवती आहेस ना ? मग अशा रत्नाचा कोण बरें त्याग करील ? लाडके, तें तूं काय वाचीत होतीस ? "

" ती एक आंग्ल कादंबरी आहे." कावेरी म्हणाली, "नाथ, तिच्यामध्यें माझ्या स्थितीस जुळेल असेंच हुबेहुब वर्णन आहे. परंतु तिच्यांतील धीरोदात्त कथानायकाप्रमाणें आपणही माझा स्वीकार कराल कीं नाहीं कोण जाणे, असें वाटून त्या निराशेच्या भरांत मला चक्कर आल्यासारखें झालें. प्राणनाथ, ह्या अभागिनीसाठीं आपणांस त्रास झाला याबद्दल ह्या दासीला क्षमा करावी. "

" छे छे, त्यांत क्षमा कशाची ? असा त्रास आम्हांस रोज झाला तरी हवाच आहे ! " असें हंसत हंसत म्हणून त्यांनीं तिला आपल्या जवळ ओढून तिचें प्रेमभरानें चुंबन घेतलें. प्रेमांत प्रेम मिसळून गेलें ! त्या वेळीं आसपासचा सर्व देखावाहि प्रेमजलानें रक्तवर्ण दिसत होता ! पुष्पलतिका प्रेमातिशयानें डोलत होत्या, पक्षिगण प्रेमगाणीं गात होता ! भगवान् सविताहि आरक्तवर्ण दिसत होता ! अच्युतरावाच्या बाहुपाशांत बद्ध झालेली प्रेमबाला म्हणाली:—

" देवा, ह्या आलिंगनसौख्यांत चिरकाल रहावें असें वाटतें. पण ह्या अभागिनीच्या नाशिबीं तें असेल काय ? " अच्युतराव पुन्हां तिचें चुंबन घेत म्हणाले:—

" कां ? नसायला काय झालें ? सुंदरी, तुझ्या अधरामृताचें मी सतत पान करावें अशीच तुझ्या बाबांची व आईची पण इच्छा आहे. त्यांना ज्या वेळीं माझ्या आईकडून बाबांची इच्छा कळली, त्या वेळीं कृतज्ञतेनें हृदय भरून येऊन " आपले आम्हां गरीबांवर अनंत उपकार आहेत. सुमतीबाई, आमच्या कातडांचे जोडे करून जरी आपल्या

पायांत घातले, तरी हे उपकार फिटणार नाहींत ” असें ती म्हणाली. वास्तविक तसें म्हणायचें कारण नाहीं. कारण, आम्हा सुशिक्षित श्रीमंतांचें तें कर्तव्यच आहे. असो. आज संध्याकाळीं सहज इकडे तुमच्या घरचा समाचार घ्यावा म्हणून फिरत फिरत आलों होतों. नंतर तुझा शोध करतां तूं इकडे आहेस असें कळलें.” गरीब बिचारी कावेरी! अच्युतरावांचे शब्द—एकाएकी सौख्य देणारे शब्द—ऐकून ती सौख्य-सागरांत पोहूं लागली! आपण ऐकतों हें स्वप्नांत तर ऐकत नाहीं ना? असें तिला क्षणभर वाटलें.म्हणून तिनें आजूबाजूस पाहिलें तों सवित्याच्या आरक्तकिरणवस्त्रांनीं नटलेली सृष्टि तिच्याकडे पाहून सकौतुक हंसतांना तिला दिसली! आपला पिता आतां पूर्वीचा राहिला नाहीं, हें तिला खरेंहि वाटेना. यमुनेसारखीच आपली स्थिति होणार व आपलीं सर्व सुखस्वप्नें लयास जाणार, असें तिला वारंवार वाटे. परंतु वस्तुस्थिति तिला कळल्यावर तीस जो आनंद झाला, त्याचें कोठवर वर्णन करावें? अच्युतराव व कावेरी दोघेहि बरोबरच घरांत गेल्यावर या प्रेमीयुगुलाचें त्यांनीं—विनायकरावांनीं—हृदयभरानें सुस्वागतम् केलें व अच्युतरावांनीं हंसत हंसत तिची करुणास्थिति सांगितल्यावर ते कावेरीला म्हणालेः—

“ कावेरी, तूं किती वेडी आहेस. तुझा पिता आता पूर्वीचा विनायकराव राहिला नाहीं बरें. पोरी, तुझ्या पित्यावर आलेल्या दुर्धर प्रसंगानें त्याच्या हृदयाची झालेली कालवाकालव तुला काय ठाऊक असणार? मुली, माझ्या लाडके कावेरी, तुझ्यासारख्या फुलाला केवळ गरिबीसाठीं निर्घृण समाजानें नाकारलें तर अशा समाजाशीं कसें वागावें हें मनूनें एका दिव्य श्लोकांत ग्रथित केलें आहे, तो म्हणतोः—“ काममामरणात्तिष्ठेद्गृहे कन्यर्तुमत्यपि। न चैवैनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित्॥ ” कावेरी, अशा तऱ्हेची दिव्य शास्त्राज्ञा असतांना, ह्या कपाळकरंट्याला माझी लाडकी यमुना एका थेरड्याच्या गळ्यांत बांधायचा कसा मोह पडला कुणास ठाऊक? हाय! हाय! यमुने, तुझ्या वैधव्यदुःखाला सर्वस्वी कारणीभूत झालेल्या ह्या विनायकरावास तो दीनदयाळ परमात्मा क्षमा करील काय? ” बोलतां बोलतां हृदयशोकानें विनायकरावांच्या

डोळ्यांत अश्रु आले. कांहीं वेळानें आपले अश्रु पुसून ते म्हणाले, "कावेरी, असें असतां तोच अक्षम्य अपराध पुन्हा माझ्या हातून घडल्यास मग ह्या विनायकरावास काळीजच नाहीं, असें म्हणावें लागेल. मी पूर्ण निश्चय केला होता कीं,बेहेत्तर आहे तूं आजन्म माझ्या इथें कुंवार राहिलीस तरी; मला जोंवर भाकरीचा एक तुकडा मिळत आहे तोंवर त्यांतील अर्धा तुला देऊन तुझें रक्षण करीन! परंतु कावेरी, अशा समाजांतहि अच्युतरावांसारख्या कांहीं स्वर्गीय महात्म्यांचा वास असतो. त्यांच्या घराण्याचे आपणावर किती उपकार आहेत, हें तुला तरी मी सांगावयास नकोच." यावर "कसचें कसचें विनायकराव, आज तुम्ही अगदीं आमचे भाटच झालांत. पण यांत आम्ही आपलें केवळ कर्तव्य करीत आहोंत." असें म्हणून अच्युतरावांनीं सर्वांचा निरोप घेतला.

## प्रकरण २१ वें.

## वादविवाद.

श्रीपतरावांचें "विधवाविवाह" या विषयावरील भाषण ऐकून बरेच दिवस अपरिचित आणि म्हणूनच सकृद्दर्शनीं दिसण्याला नवीन अशा या विषयासंबंधीं गांवांत बरीच खळबळ उडाली. शांत आणि विचारी लोकांस त्यांचें भाषण पटून ते त्यांची स्तुति करूं लागले. कांहीं तडफदार पण अंध लोकांना ही कोठची आंग्ल सुधारणा आमच्यांत घुसून आम्हांला रसातळाला न्यायला आली आहे असें वाटलें व कांहीं मध्यम तऱ्हेचेहि लोक होते. तेव्हां दुसऱ्या तऱ्हेच्या लोकांपैकीं कांहीं त्यांतलेत्यांत सुशिक्षित असून समजुतदार व तिसऱ्या तऱ्हेच्या लोकांपैकींही बरेच असे श्रीपतरावांच्या येथें आज संभाषणासाठीं जमले होते. श्रीपतरावांनीं सर्वांचें सुस्वागत करून सर्वांच्या आक्षेपांचें थोडक्यांत उत्तर दिलें. ते म्हणाले:—

"महाराज, विधवेनें दुसरा तिसरा नवरा करावयाचा म्हणजे काय?

मग रांडांत आणि कुलीन स्त्रियांत अंतर काय ? बाजारबसव्यांचा धंदा करणाराहून ह्यांची योग्यता काय जास्त आहे ? अशा तऱ्हेचा आक्षेप मोठ्या रसभरित वाणीनें आपण माझ्याविरुद्ध आणलांत. ठीक आहे. पण महाराज, सुरवातीला मी आपणांस एवढेंच सांगतों कीं, माझें परवाचें समग्र भाषण आपण शांत चित्तानें ऐकून घेतलें असतेंत, तर आपणांस येथवर येण्याची तसदी पडली नसती. असो. तथापि, आपण थोडेसें निःपक्षपातपणानें विचार करा. एक नवरा मेल्यावर दुसरा केला म्हणजे तिच्या पतिप्रेमाचें आपण धिंडवडे उडवतां, पण एक बायको मेल्यावर दुसरी, तिच्यानंतर तिसरी, अशा अनेक बायका करणारांचे मात्र आपण गोडवे गातां ! केवढें त्याचें पत्नीप्रेम कीं तिच्या बाराव्या तेराव्या दिवशींच लग्नमंडपांतील बोहोल्यावर तें दुसऱ्या पोरीच्या तोंडाभोंवतीं ओंवाळलें जातें! " धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि " अशा तऱ्हेची अग्निब्राह्मणांसमक्ष त्रिवार शपथ घेऊन निर्लज्जपणानें पुन्हां पहिल्या पत्नीशीं तिच्या तेराव्या दिवशींच बेमान होणाऱ्या अंधरूढीच्या आराध्यांना अशा तऱ्हेचे निरर्गल प्रलाप काढण्याचा देखील अधिकार नाहीं ! शंकित सज्जनहो, पक्क्या दारुबाजानें वारुणीची बाटली घशाखालीं ओतीत मद्यपाननिषेधावर व्याख्यानें द्यावींत, नीच कुलटा जारिणीनें सतीधर्माचा उपदेश करावा, गोमांसभक्षकानें गोरक्षणासाठीं बोंब ठोकावी, महाराज, ह्याला आपण कितपत किंमत द्याल ? आपली स्वतःची स्थिति याहून कितपत वेगळी आहे बरें ? स्त्रियांच्या पातिव्रत्याचे गोडवे गाणारांना पुरुषांच्या पत्नीव्रताचीं किती बरें उदाहरणें सांपडतील ? राजा रामचंद्राच्या वेळचा काळ आपण सोडून द्या. कारण तो एकपरी केव्हांही स्तुत्य काल होता हें मी आपल्या व्याख्यानांतच सांगितलें आहे. पण त्यानंतर ? राजा रामचंद्रांनीं—त्या दिव्य अलौकिक महात्म्यांनीं—अत्यंत उज्ज्वलतेनें आचरिलेल्या एकपत्नीव्रताच्या खडतर असिधाराव्रताला आपल्या नीच वर्तनानें काळें फासणारे दिवटे जन्मास आले ! माझा आपणास असा सवाल आहे कीं, सरड्याच्या रंगाप्रमाणें तीन तीन चार चार बायकांवर भाळून " मी तुझ्या चरणांचा दास आहे " असें म्हणणाऱ्या अधम मानवाला पुनर्विवाहित विधवेला नांवें ठेवावयास काय तोंड

आहे ? महाराज, कोणच्या तत्त्वावर हे पहिल्या भार्येशीं बेमान होतात ? याचा ज्यांनीं त्यांनीं आपल्या मनाशीं विचार करावा आणि तेंच कारण स्त्रियांनाही कां लागू नसावें हें पहावें. त्यांना काय विकार नाहीं कां इंद्रियें नाहींत ? तेव्हां ही निव्वळ अन्यायाची दंडेली नव्हे काय ?

महाराज, विधवाविवाह म्हणजे एक शतकृत्य आहे अशी मी त्याची कधींच थोरवी गाइली नाहीं. तथापि तो म्हणजे मानवीजातीला कलंकभूत आहे, अशा तऱ्हेनें त्याला वाळींत टाकण्यासही मी तयार नाहीं. सज्जनहो, आपण सर्वजण वैकुंठीं जाण्यासाठींच येथें आलों आहोंत, ही गोष्ट कोण नाकबूल करील ? महाराज, पावित्र्याची योग्यता जितकी आपणांस तितकीच मलाही कळते आहे. आणि या दृष्टीनें पाहतां अजिबात लग्न न करणें हाच मार्ग श्रेयस्कर आहे. कारण, "सर्वथा न करावा स्त्रीसंग । हेंचि वेदांचें अंतरंग" असें तुकोबा सांगतात. परंतु ध्येय जरी अत्यंत उच्च, उज्वल, असें डोळ्यापुढें ठेविलें, तरी प्रत्यक्ष आचरणांत जितकें शक्य तितकेंच आणावें लागते. एकाच गोष्टीच्या भरीस भरून कसे अनर्थ होतात, याचें कार्लाईलनें वर्णन केलेलें मीं आपल्या भाषणांत सांगितलेंच आहे. आणि "Too much cultivation of the inward" चा काय परिणाम होतो अथवा एकाच तत्त्वाच्या भरीस भरल्यानें मनुष्याचा कसा अधःपात होतो याचें पराशर, वशिष्ठ, विश्वामित्र इत्यादि व्यक्ती जशा उदाहरण आहेत, तसेंच विवाहनिर्बंध हा जेव्हां आपल्या समाजांत अवश्य असा नव्हता त्या वेळची समाजस्थितीहि याचेंच उदाहरण आहे, हें पण मी आपल्या भाषणांत सांगितलेंच आहे. तें तत्त्व म्हणजे सर्व जगत्रयाला अत्यंत लीलेनें जिंकणाऱ्या मदनपंचाननाशीं झुंज खेळण्याचें होय. महाराज, या ठिकाणीं जातां जातां उत्कृष्ट रितीनें लागूं पडणारी एक उपमा मी दिल्यास अस्थानीं होणार नाहीं. ती कोणची ? तर बालकाची. समाज हा त्यावेळीं बाल्यावस्थेंत होता. सूक्ष्म रितीनें विचार केल्यास केवळ याच बाबतींत नव्हे, तर इतरही बालकांच्या ज्या वृत्ती, भावना, विचार इत्यादि असतात, त्याही या वेळच्या समाजाच्या तशाच बालवृत्तींशीं जुळतात असें आपणांस दिसून येईल. त्यांतच लग्न न करण्याचा—अजिबात न करण्याचा—हट्ट हाहि आपणांस बालकांत पहावयास सांपडतो. एखाद्या लहान मुलास

"काय रे, तुझें लग्न करावयाचें ना रे?" असें विचारावें म्हणजे तो म्हणतो, "छे, मला मुळींच लग्न करावयाचें नाहीं. मी आजन्म ब्रह्मचारी राहणार!" अहाहा, किती हे सुंदर विचार! सज्जनहो, या बालकाच्या या दिव्य विचारास वाईट म्हणणारा हतभागी प्राणी इथें कुणी असेल का? परंतु अरेरे, गरीब बिचारा पोर! त्याला काय कल्पना कीं, परिस्थितीचे जों जों एक एक चटके बसत जातात, तों तों बालपणीं पूर्ण व्यवहार्य वाटणारें ध्येय आपणास शेवटीं नुसतें ध्येय या सदराखालींच ठेवून परिस्थितीच्या तडाख्यापुढें मान वांकवावी लागणार! 'स्पेन्सर'नें 'फेअरी क्वीन'च्या पहिल्या बुकांत असेंच Prince Arthur चें चित्र रंगवलें आहे. असो. त्या बिचाऱ्या "ओठाच्या वरचाहि जार अजुनी नाहीं तुझ्या वाळला" अशा तऱ्हेच्या कोंवळ्या लुसलुशीत पोराचे ते दिव्य पण अव्यवहार्य उद्गार ऐकून जवळचीं म्हातारीं माणसें 'ओ हो!' करून हंसतात झालें! मम याच हट्टाचा आपल्या समाजांत अत्यंत निष्ठुर असा राहिलेला अवशेष पाहून आपणही—सध्यांच्या प्रौढ समाजांतील विद्वज्जनांनीं याला नुसतें हंसून भागणार नाहीं—कारण या जुलमांत आतां दिव्य समबुद्धीचा अंश कांहींच उरला नाहीं—तर याचा पूर्ण धिःकार करावयास नको काय? कारण महाराज, त्या 'प्रिन्स आर्थर'ची गोष्ट आपण जरूर वाचा, अशी माझी आपणांस फार फार शिफारस आहे. त्रैलोक्यांतील अखिल जीवांस आपल्या अजब कांडीनें झुलविणाऱ्या मदनप्रभावाच्या अप्रतिहत नियमास मान तुकवून विवाहरज्जूनें बद्ध होणाऱ्या आणि आपणांभोवतीं विहरणाऱ्या युवयुवतींच्या जोडप्यास हंसून त्यांची टर उडविणारा हा पोरच, ज्या वेळीं परिस्थितीचे चटके एक एक बसूं लागले त्या वेळीं, एखाद्या मांत्रिकानें भारलेल्या पिशाच्चासारखा आपल्या आराध्यदेवतेसाठीं वणवण रानोमाळ भटकूं लागला. त्यांनींच दिलेला कबुलीजबाब वाचा. मग, एका हातानें कबुलीजबाबावर सही करणारा प्राणी जर दुसऱ्या हातानें निव्वळ अन्यायाची कट्यार आपल्याचसारख्या चालत्या बोलत्या आपल्या भगिनीवर्गावर धरूं लागला, तर त्याला आपण स्वार्थलोलुप आणि 'परदुःखशीतळ' असा अधम ठरविणार नाहीं काय? महाराज, माझ्या परवाच्या भाषणाचें पूर्ण मनन करा

एवढीच मी आपणांस पुन्हां विनंति करतों. '' श्रीपतरावांच्या या तोडीस तोड उत्तरानें मंडळी निरुत्तरच झाली. तेव्हां '' शेवटीं, '' श्रीपतराव म्हणाले, '' सर्व सज्जनांना साष्टांग नमस्कार करून,माझ्या भाषणांत वेडा-वांकडा एखादा शब्द गेला असल्यास त्यांची मी क्षमा मागतों. आणि त्यांनीं माझ्या शब्दाकडे लक्ष न देतां माझ्या मुद्यांचा विचार करावा, अशी मी त्यांस विनंति करतों. '' श्रीपतरावांच्या ह्या लीनतेनें तर मंडळी फारच खूप झाली व त्यांची स्तुति करीत आपल्या घरीं चालती झाली.

## प्रकरण २२ वें.

## इंग्लंडांत.

आमचे नारायणराव विलायतला गेल्यापासून आमच्या वाचकांस त्यांचें कांहींच वृत्त कळलें नाहीं. यासाठीं आतां तिकडेच वळूं. त्यांचा अभ्यास व्यवस्थित व उत्कृष्ट रीतीनें चालला होता. जात्याच हुषार असणाऱ्या त्या पोरानें आपल्या गरीब बापाचें कुल खरोखर धन्य केलें होतें. अजून वर्षसहा महिन्यांनी त्यांची शेवटची परीक्षा होऊन ते आय. सी. एस. होऊन हिंदुस्थानांत येणार होते. ते ज्या सद्गृहस्थांचे येथें रहात असत त्यांची एक मेरी नांवाची १६-१७ वर्षांची नवयौवनसंपन्न बाला अविवाहित होती. त्या दयाळू आंग्ल सद्गृहस्थाचा ओढा एकंदर वाङ्मयांतील उच्च तत्त्वांचें ग्रहण करावें असा असल्यामुळें, त्यांनीं आपल्या मुलाबाळांसहि संस्कृतादि विषयांचेंहि ज्ञान संपादण्यास पूर्ण मुभा दिली होती. मेरी सुंदरीस संस्कृत वाङ्मयाची गोडी थोडथोडी लागत चालली होती. नारायणराव आणि मेरी पुष्कळ वेळां सायंकाळीं फिरावयास एखाद्या दूरच्या अशा शांत,रम्य उद्यानांत घटका दोन घटका जात असत. त्या वेळीं संस्कृत वाङ्मयांतील निरनिराळ्या कथा, गोष्टी इत्यादिकांसंबंधीं नाना तऱ्हेचे प्रश्न विचारून ती नारायणरावांचे मनास कौतुक व आनंद देई व नारायणरावही यथाशक्ति त्यांचीं उत्तरें देऊन मेरीचें समाधान करीत असत.नारायणरावांची भाषणशैली,त्यांचा आपल्याकडील ग्रंथासंबंधीं

देखील असणारा निःपक्षपातीपणा, त्यांच्या विषयप्रतिपादनाची माधुरी यांचा दररोज रसास्वाद घेणाऱ्या त्या सुंदरीच्या हृदयांत नारायणरावा-संबंधीं प्रेमभाव जागृत झाला होता. त्यांचे प्रतिदिवशीचे सहलांनी त्या प्रेमबीजास सिंचन होऊन त्यास अंकुर फुटूं पहात होते.

" काय हो नारायणराव " अशाच एका सहलीच्या प्रसंगी मेरी म्हणाली, " त्या तुमच्या द्रौपदीला पांच नवरे कां होते यासंबंधीं असणारी " पतिं देहि " ची गोष्ट खरोखरच ridiculous आहे नाहीं ? शंकरासारख्या देवाला तिला एकच नवरा पाहिजे आहे, पांच वेळां तेच शब्द उच्चारले म्हणून त्याचा अर्थ पांच नवरे नकोत, एवढी साधी गोष्ट कळत नव्हती असें समजणें हें केवढें मूर्खपण ! " नारायणराव सकौतुक हंसले व म्हणाले:—

" खरोखरच अशा कांहीं कांहीं मूर्खपणाच्या गोष्टी आमच्या ग्रंथांतून आहेत खऱ्या. परंतु याचा दोष मूळ ग्रंथकाराकडे कदाचित् न जातां त्यास वाटेल तसें tamper with करणाराकडे जातो. बाकी अशा गोष्टी सगळीकडेच आहेत. " बोलत बोलत आज नारायणराव व मेरी, त्यांच्या नेहमींच्या परिचयाच्या एका शांत, रमणीय उद्यानांत सायंकाळीं येऊन एका बाकावर बसली होतीं. सायंकाळची वेळ असल्यामुळें आणि आज आकाश पश्चिमेकडे निरभ्र असल्यामुळें सवित्याचे आरक्त किरण तेथील हरितवृक्षराजीवर, हरिततृणाच्छादित भूप्रदेशावर, आनंदानें हंसणाऱ्या पुष्पराजीवर पडले होते. मेरीच्या गुलाबी गालास ते अधिकच रंजवीत होते. मेरीच्या गुलाबी वस्त्रांशीं ते एकजीव झाले होते. जणूं ही प्रेम-देवताच मूर्तिमंत स्वर्गातून खालीं आली आहे कीं काय, असा भास होत होता. सौंदर्यखानि मेरीचा कुरल केशकलाप मुक्त असा तिच्या धवल स्कंध-प्रदेशीं व पाठीवर रुळत होता. सायंवायूच्या मंदशीतल लहरी त्याच्याशीं क्रीडत होत्या. पुष्पांचा सुगंध हृदयास आल्हाद देत होता. उद्यानांतील निरानिराळी वृक्षराजी, लताकुंज व पुष्परचना आणि हरिततृणवीथिका मोठ्या व्यवस्थित, प्रमाणबद्ध व टापटिपीच्या असून एकमेकांचें सौंदर्य-वर्धन करीत होत्या. पश्चिम दिग्वधूशीं प्रेमालाप करणाऱ्या सवित्याच्या आरक्तगोलाकडे दृष्टिक्षेप करून नारायणराव म्हणाले:—

" प्रिय मेरी, सवित्याचा प्रकाश म्हणजे तुम्हांला अगदीं पुत्रजन्माचा

आनंद. नाहीं ? कारण हें पहा, बाकीचें बहुतेक आकाश साधारण अभ्राच्छादितच आहे." मेरी यावर कांहीं बोलली नाहीं. विविध विषयांवर आलाप करून नारायणरावांचें हृदय प्रमुदित करणारी मेरी आपल्याच विचारतंद्रीत मग्न होती. पण तें क्षणैकच. लगेच पुन्हां शुद्धीवर येऊन ती म्हणतेः—

"हो तर, आनंदाचे म्हणून काय विचारावें ? तुम्हांला या दोन-अडीच वर्षांत प्रत्यक्ष अनुभव आलाच असेल. पण नारायणराव, पुरे आतां ही शुष्क बडबड. मला तुमच्या संस्कृत वाङ्मयांतील उच्च ग्रंथांची व ग्रंथकारांची थोडी माहिती सांगाना ?" नारायणराव हर्षभरितचित्तानें म्हणालेः—

"हो हो जरूर, माझ्या प्रिय भगिनीला मी काय बरें सांगणार नाहीं! प्रिय मेरी, आमच्या संस्कृत वाङ्मयाच्या उच्च वातावरणांत विहरणाऱ्या ग्रंथकारांपैकीं बाण, कालिदास, भवभूति, भास इत्यादि कवि फारच अप्रतिम तेजानें झळकतात. कविताकामिनीच्या विविध अलंकारांचें रसभरित वर्णनांत भास कवीस या कामिनीच्या रमणीय हासाची उपमा दिली असून, कालिदास म्हणजे प्रत्यक्ष ह्या सुंदरीचा विलास, असें म्हटलें आहे, आणि बाण तर तिच्या हृदयांतील पंचबाण होय, असें वर्णिलें आहे! खरोखरच या उपमा किती अन्वर्थक आहेत! भासकवींचीं काव्यें म्हणजे खरोखरच सुंदरीचें नितांतरमणीय हास्य होय, कालिदासाची प्रतिभा म्हणजे खरोखरच युवतीचा विलास होय, आणि बाणाची कादंबरी म्हणजे खरोखरच मदनशरांचें मोहन होय! मेरी, परंतु ज्याप्रमाणें तुमच्या Reynold च्या कादंबऱ्या मनाच्या आणि शरीराच्या परिपक्व दशेंत वाचल्या तरच सारासार निवडून योग्य रसाची बहार चाखतां येते, त्याचप्रमाणें बाणासारख्या कांहीं कांहीं लेखकांचें आमच्याकडेहि आहे. त्यापेक्षां महाभारत आणि रामायण हे दोन सुंदर ग्रंथ जगाच्या अत्यंत पावन ग्रंथांपैकीं दोन होत. यांत योग्य नीतीचे कितीतरी धडे शिकविले आहेत. हृदयाच्या बाल्यावस्थेंत यांचाच संस्कार वाचनश्रवणादिकांनीं मनावर व्हावा हेंच उचित होय. परंतु खरी बहार काव्यानंदांतच आहे. कारण तो सुंदरीचा उपदेश आहे. तो केव्हांहि शास्त्रीबोवांच्या आज्ञापेक्षां—अथवा मित्रांच्याहि उपदेशापेक्षां—अधिक चित्ताकर्षक, हृदयंगम आणि

म्हणूनच परिणामकारी असूनहि कळून न येण्यासारखा असतो. काव्याच्या झगझगीत सौंदर्यानें मोहित झालेल्या मानवी जीवाच्या-ही काव्य-सुंदरी आपणांस मोहनास्त्राखालीं उपदेशगुटिकाहि देत आहे, हें लक्षांतही येत नाहीं. पुष्कळ वेळां इतरांकडून जें काम होत नाहीं तेंच काम युवती आपल्या लीला विलासानें सहज करूं शकते. काव्याची योग्यता यासाठीं सर्वांत श्रेष्ठच होय. मेरी, तूं त्या ब्रह्मानंदाचा उपभोग जरूर घेच. '' नारायणराव म्हणाले. मेरी त्यांचें भाषण एकाग्र चित्तानें ऐकत होती. नंतर तिच्या मनांत असणारा प्रेमभाव व्यक्त करण्याचें धाडस करीत ती म्हणाली:—

" नारायणराव, मला आपल्या चरणांची दासी कराल का ? आपल्या चरणीं जडलेल्या माझ्या प्रेमास आपण झिडकारणार तर नाहीं ना ? ह्या हृदयसारंगीतून दिव्य संगीताचे आलाप काढणाऱ्या देवा, ह्या दासीला पदरांत घेऊन धन्य कराल का ? '' प्रेमवेड्या मेरीनें प्रेमभरांत नारायणरावास दृढालिंगन दिलें.अत्यंत पवित्र हृदयाच्या नारायणरावांनीं क्षणभरानीं तिला किंचित् दूर करून म्हटलें:—

" मेरी, मी हिंदुस्थानांत असतांना एका दिव्यरमणीनें या हृदय-सिंहासनाचा केव्हांच ताबा घेतला आहे. त्या सिंहासनावर आतां दुसरी मूर्ति कशी बरें अधिष्ठित होईल ? प्रिय मेरी, याची तूं आधींच चौकशी करावयास पाहिजे होती. तथापि मला तुझ्या प्रेमी हृदयाचा कळवळा पूर्ण जाणवतो. आणि म्हणूनच माझें तुझ्यावर प्रेमही पण आहे. खरोखर तुझ्यासारख्या स्वर्गीय बालेवर प्रेम न करणारा प्राणी म्हणजे एक मुक्त किंवा पशुच म्हटला पाहिजे. तथापि, त्या आत्यंतिक दिव्य प्रेमाला कशाच्याहि मोबदल्याची इच्छा नसते.केवळ प्रेमाकरतां जें प्रेम केलें जातें त्यासच 'प्रेम' या दिव्य नांवानें संबोधितां येईल ! त्या प्रेमांत स्वार्थाचा लवलेशहि नसतो.त्यांत इंद्रियसुखलालसेचा गंधहि असत नाहीं. मेरी, सर्वसाधारण समजल्या जाणाऱ्या विषयसुखजन्य लालसेला 'प्रेम' या नांवानें संबोधणें म्हणजे त्या शब्दाची विटंबना होय. उच्च प्रेमाचे दरबारीं क्रयविक्रयाचें वारेंहि नसतें.तें प्रेम स्वार्थरहित उदयाला येते.''प्रीतीचें लक्षण ऐसें।अंतरीं उठे अनायासें। पाणी पाणवटें जैसें। आपैसें धावें! ॥'' अशी त्याची व्याख्या आहे. दिव्य प्रेमाचा व ऐहिक गोष्टींचा मिलाफ फारच

हृदयंगम होईल यांत शंका नाहीं. तथापि, दिव्य प्रेमच चिरकाल टिकणारें असतें. त्या प्रेमाला बाह्योपाधींची जरूर नसते. समान तत्त्वाच्या हृदयवीणा जवळ जवळ आल्या कीं त्यांतून न सांगतां दिव्य आलाप निघूं लागतात ! तें प्रेम म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचें प्रतिरूप होय. " उंच नीच कांहीं नेणे भगवंत " हें त्यासहि पूर्ण लागूं आहे. हृदयाच्या उत्कटतेनें तें नाचूं लागतें. हृदयाच्या भाषेनें तें बोलत असतें ! मेरी, प्रिय मेरी, त्या निःस्वार्थ प्रेमाचें दान मी तुला अर्पण करतों. तुझ्यावर माझें सख्या बहिणीप्रमाणें प्रेम आहे. ये मेरी, मला एकदा पुन्हा बंधुप्रेमानें भेट ! " असें म्हणून नारायणरावांनीं मेरीस जवळ घेतलें व विखुरलेले तिचे कुरळ केश आपल्या हातानें साफ करीत ते म्हणालेः——

" मेरी, तूं आपणांस असहाय्य समजूं नकोस. माझ्याच बरोबर आय्. सी. एस. ची परीक्षा पास होणारा आंग्ल युवक जॉन् तुझ्या परिचयाचा आहेच. त्याचें तुझ्यावर किती निस्सीम प्रेम आहे बरें ? आज तो कित्येक दिवस तुजजवळ प्रेमयाचना करतो आहे. परंतु अजूनपर्यंत तुझ्याकडून आशेचीं विशेष चिन्हें दृग्गोचर होत नसल्याकारणानें बिचारा नेहमीं खिन्न असतो. तो फार सज्जन आणि खुल्या दिलाचा प्राणी आहे. तुझ्याकडून एकच नकारार्थी शब्द गेल्यास त्याची कोण शोचनीय स्थिति होईल बरें ? यासाठीं तुझ्या अनुग्रहाच्या प्रेमामृताची वाट पहाणाऱ्या त्या चातकाची तृषा शांत कर. स्वर्गीयसुंदरी, त्याच्या वीणाझंकारास तुझ्या हृदयसारंगीच्या प्रेमालापाचें प्रत्युत्तर दे, असें माझें तुला आग्रहाचें सांगणें आहे; आणि मजवर जर तुझें मजप्रमाणें दिव्य प्रेम असेल, तर मजबरोबर आपल्या पतीसह हिंदुस्थानांत येऊन माझ्या देशाच्या भाग्योदयासाठीं होणाऱ्या माझ्या यत्नांत मला सहाय्यभूत हो. मेरी, माझा उपदेश तुला पटतो ना ? " नारायणरावांच्या ह्या उज्ज्वल वर्तनानें थक्क झालेली मेरी खालीं मान घालून म्हणालीः—

" परमप्रिय बंधुराया, मला तुझी आज्ञा शिरसामान्य आहे. नारायणराव, पण माझ्या हातून वेडाच्या भरांत क्षणैक होणाऱ्या प्रमादांची तुम्ही क्षमा कराल ना ? "

" मेरी, " नारायणराव म्हणाले, " मी तुला मनापासून क्षमा केली आहे. तूं त्याबद्दल यत्किंचितहि मनास वाईट वाटून घेऊं नकोस. तारु-

ण्याच्या भरांत मनुष्याच्या हातून अशा चुका होण्याचा संभव असतो. पण आपल्या मनास सद्सद्विवेकबुद्धीचा लगाम असला म्हणजे मनुष्याच्या हातून गैरवर्तन होत नाहीं. ''

त्या दिवशीं नारायणरावांनीं अत्यंत सहर्षचित्तानें सुशीलेस पत्र लिहिलें. पर्वताच्या कड्यावर आपण उभे असतां केवळ सुशीलेच्या ठायीं असणाऱ्या आपल्या दिव्य प्रेमानें आपणांस त्यांतून कसें निभावून नेलें, याचें त्यांनीं फारच रसभरित वर्णन केलें. तें पत्र वाचून सुशीलेस किती परमानंद झाला असेल, याची कल्पना सुशीलेसारख्या बालांनाच करतां येणार आहे !

## प्रकरण २३ वें.

# फौजदारसाहेब.

आज वाचकांना कुसुमपूरगांवच्या फौजदारसाहेबांचे घरीं नेण्याचा आमचा विचार आहे. सायंकाळीं सातआठ वाजण्याची वेळ होती. विठ्ठलमंदिरांतील साधुबोवांचे न्यायासनासमोर बामाडे काढणाऱ्या फौजदारसाहेबांनीं चंद्रीच्या काकुळतीच्या विनंतीवरून मॅजिस्ट्रेटच्या परवानगीनें तिला आपल्या घरीं आणून ठेविलें होतें. फौजदारसाहेब आपल्या धंद्यांत चोख असून पुन्हां दयाळू होते. खऱ्या साधूंच्या हृदयाप्रमाणें जसा प्रसंग पडेल तसें त्यांचें हृदय, " वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि " असें बनें. त्यांतून पुन्हां नारायणराव, श्रीपतराव, अच्युतराव, वगैरे मंडळींच्या नित्य सहवासाची त्यांत भर पडल्यामुळें ते बरेंच सुसंस्कृत आणि उदार बनलें होतें. एके दिवशीं घरीं आल्यावर आपल्या दिवाणखान्यांत एका इझिचेअरवर पडून त्यांनीं आपल्या गड्यास चंद्राबाईस घाडून द्यावयास सांगितलें. फौजदारसाहेब सध्यां एकटेच होते. त्यांस मूलबाळ कोणी नव्हतें. त्यांची बायको एकदोन महिन्यांपूर्वी कांहीं रोगाच्या विकारानें वारली. त्यामुळें तर त्यांचें मन फारच हळवें

व " परदुःखेन दुःखित " असें बनलें होतें. चंद्राबाई माडीवर आल्यावर अत्यंत प्रेमळ आवाजांत ते म्हणालेः—

" हं. चंद्राबाई, आपण त्या दिवशीं आपला वृत्तांत मला सांगेन म्हणाला होतात ना ? मग सांगा पाहूं आपला वृत्तांत. " चंद्राबाई म्हणालीः—

" फौजदारसाहेब, आपल्यासारखे उदारहृदयी फौजदार फारच विरळा असतील. आपल्या उपकाराबद्दल मी आपली फार ऋणी आहे. या अभागिनीचा जन्म एका गरीब कुळांत झाला. माझ्या आईबापांची मी एकुलती एक लेक. त्यांनीं माझें फारच उत्कृष्टरीतीनें लालनपालन केलें. आमच्या गांवीं एक मुलींची शाळा असल्यामुळें त्यांनीं मला शाळेंत घातलें व प्रौढपणीं माझा विवाह करावा असा त्यांचा उद्देश असल्यामुळें मी चौदापंधरा वर्षांपर्यंत अविवाहित होतें. आमच्या घराशेजारींच एक गरीब वृद्ध मनुष्य राहात असे. तो गरीब असून एकटाच रहात असे. त्याच्या दुःखी हृदयाला मीच एक तेवढा आनंद होतें. तो चांगला गवयी होता व माझा आवाज लहानपणापासून बारीक, मंजुळ व गोड असल्यामुळें मला तो रोज नियमानें गाणें शिकवी. परंतु फौजदारसाहेब, माझ्या पंधराव्या वर्षी माझ्यावर आकाशाची कुऱ्हाड कोसळली. माझे आईबाप चारदोन महिन्यांच्या अंतरानें इहलोक सोडून गेले. आमच्या गांवीं कॉलऱ्याची सांथ आली होती, त्यांत तो गरीब गवयीहि बिचारा बळी पडला. मजवर आकाशच फाटलें. मी रडूनरडून आकांत केला. पण माझ्या गरीब घरांत माझें कोण समाधान करणार ? शेवटीं माझे दुःखाचा भर ओसरल्यावर, माझें मीच कसें तरी समाधान केलें. कांहीं दिवसांनंतर घरांत जें कांहीं किडुकमिडुक उरलें होतें तें घेऊन मी मुंबईस कोठें धंदा मिळाला तर पहावा, या उद्देशानें गेलें. एके दिवशीं रात्रीं अशी सहज भटकत हिंडत असतां मी शुभ्रगल्लींत शिरलें. या वेळीं मला १६ वें वर्ष होतें. त्या गल्लींत हिंडत असतां मी एका माडीसमोर क्षणैक विसावा घेण्यासाठीं उभी राहिलें. या वेळीं रात्रीं ११-१२ चा सुमार होता. आंतील भपक्यानें माझे डोळे दिपून गेले. झगझगीत दीपप्रकाशांत माडींतील रुपयांचा छनछन आवाज माझ्या कर्णरंध्रांत शिरला.

अप्रतिम सौंदर्याची लयलूट करणाऱ्या त्या वारांगनेसमोर एका सरदारानें द्रव्याची थैली रिकामी करीत "मेरा जान, या तुझ्या अधरामृताचें पान करण्यासाठीं हा देहहि मी तुजवरून ओंवाळून टाकीन; मग या पांचशें रुपड्यांची काय किंमत ?" असें म्हणून त्यानें त्या परीला जवळ ओढलें. तिनेंहि त्याला चंचल नयनकटाक्षानें विद्ध करीत आपल्या बाहूंच्या विळख्यांत घेतलें. "पण गडे, मला चंद्रहार कधीं देणार ? नेहेमीं या कोरड्या पैशांतच काय आहे ?" आपलें अंग हलकेंच काढून घेऊन ती मदालसनेत्रांच्या दृष्टिपातानें आपल्या सावजास अधिकच गुंगवीत म्हणाली. हा सर्व देखावा मला खिडकींतून दिसत होता. माडीच्या खिडक्या बरीच रात्र झाली असल्यामुळें उघड्याच होत्या.

"देईन बरें, माझ्या सुंदरीकरतां—या अस्मानच्या परीकरतां—मी वाटेल तें देईन. पण लाडके, आतां एक गोडशी चीज होऊं दे ना ?" तो सरदार म्हणाला. नंतर मदिरेचा बराचसा डोस आग्रहाआग्रहानें त्यास पाजून ती सुंदरी गाऊं लागली. तो बिचारा "ओ हो, वाहवा, खाशी" करीत अगदीं बेहोष होऊन गेला. नंतर लवकरच त्या माडीच्या खिडक्या लागल्या. माझ्या मनावर कांचनाच्या अजब मोहिनीनें जादू टाकली. फौजदारसाहेब, या अभागिनीचें लौकिकदृष्ट्या अधःपतनास येथून प्रारंभ झाला. लवकरच एक खोली भाड्यानें घेऊन हा देह क्रय-विक्रयाकरतां भर रस्त्यावर मांडला गेला. पण यांतूनही मी सुखरूप पार पडणार होतें. कारण दुकान उघडल्याच्या दुसऱ्याच दिवशीं एक अत्यंत थोर महात्मा माझ्याकडे आला व त्यांनीं मला सदुपदेश करून माझ्या डोळ्यावरची धुंदी उतरविलीन. "कोणच्याहि स्थितींत रहा, पण आपल्या शीलास धक्का देऊं नकोस" हा त्याचा उपदेश माझ्या मनावर पूर्ण बिंबला. *नंतर या सर्वांतूनही शुद्ध राहण्याची मी एक अजब युक्ति योजिली.* दारूच्या निशेंत विषयी किड्याला लोळवावा व आपण अंतःशुद्ध रहावें हाच तो उपाय होय. त्यानंतर दुसऱ्याच दिवशीं आमचे गणपतराव साधुजींचें कूळ मला लाभलें. तो वेष व मार्ग तर माझ्या उपायाला छानच वाटला. फौजदारसाहेब, त्यानंतर आम्ही कुसुमपुरासच आलों. तेव्हांपासून मी वरील उपायानेंच आपली शुद्धि राखिली आहे. याला साक्ष एका परमात्म्याखेरीज कोणीच नाहीं." आकाशाकडे पहात ती

म्हणाली. तिची ती करुणाजनक हकीकत ऐकून फौजदारसाहेबांचें चित्त कळवळलें व ते म्हणाले:—

" चंद्राबाई,तुमची हकीगत म्हणजे खरोखरच एक करुण–कहाणी आहे. आणि त्यांत जरी केवळ परिस्थितीसाठीं आपण एकदां मोहाच्या जाळ्यांत अडकून पडला होता, तरी त्यापुढें आपण राखलेली आपली शुद्धि खरोखरच पावन व वर्णनीय आहे. मोह या जगांत कोणाला पडत नाहीं ? पण अंजनाच्या केवळ पहिल्याच वळशाला शुद्धीवर येणारे भाग्यवान प्राणी तरी असे किती सांपडतील ? ज्यांची आणि मोहाची कधीं गांठच पडली नाहीं, यांना या म्हणण्यांतील खरा अर्थ कळणें शक्य नाहीं.असो. तर जगाच्या दृष्टीनें जरी तुम्ही थोड्याशा सदोष दिसला,तरी सर्व चराचर व्यापून उरणाऱ्या त्या परमात्म्याचे घरीं तुम्ही पूर्ण निर्दोषच आहांत. आणि " अगा नांवें घेतां वोखटी । जे आघवेया अधमांचिये शेवटीं " अशा पापयोनीहि जर पूर्ण पश्चात्तापानें ईश्वराच्या भजनीं लागल्या, तर त्यांनाहि जर परमात्मा साधुकोटींत लेखितो, तर कर्मठांनीं अशांचा कितीहि त्याग केला, तरी सहृदयाच्या हातून ही गोष्ट कालत्रयींहि होणार नाहीं ! यासाठीं चंद्राबाई, आपला मानस असेल, तर मी आपल्याशीं विवाह करावयास तयार आहे ! " बिचारी चंद्राबाई या अकल्पित औदार्यानें थक्कच झाली ! आंधळ्याला डोळे यावे किंवा निर्धनास चिंतामणीचा लाभ व्हावा, तशी तिची स्थिति झाली ! लज्जा, आदर व कृतज्ञता यांनीं तिचें मुख अधोवदन झालें. व तिच्या गुलाबी कपोलावर रक्तिमा खेळूं लागला ! समोरच्या कोनाड्यांत असणाऱ्या बजरंगबलीच्या रम्य मूर्तीस वाहिलेला नवविकासित हार वाऱ्याच्या झुळकेनें किंचित् आंदोलित झाला ! जणूं मारुतीरायानें फौजदारसाहेबांच्या त्या उदार दातृत्वाच्या कृतीस आपली संमतीच दर्शित केली ! कृतज्ञतेनें गहिंवरून आलेल्या चंद्रीच्या कंठांतून, "ही अभागिनी आपल्या पायांची सदा कृतज्ञ राहील ! " एवढेंच कसे बसे उद्गार आले. फौजदारसाहेबांनीं चंद्राबाईस आपल्या बाहुपाशांत घेऊन तिच्या आरक्त कपोलांचें चुंबन घेतलें. त्या वेळीं चंद्रेनें कृतज्ञतेच्या अश्रूंनीं त्यांचे करुणायुक्त वक्षस्थळास जणो स्नानच घातलें ! फौजदारसाहेब नंतर म्हणाले:—

" प्रिय चंद्रा, या आनंदाचे प्रसंगीं आपण या बजरंगासमोर अशी इच्छा करूं या कीं, या कुसुमपुर गांवीं समाजसेवेसाठीं चाललेल्या कांहीं हीतकरू मंडळींच्या प्रयत्नास आपण होईल इतकी मदत करूं !"

## प्रकरण २४ वें.

## नदीकांठीं.

ती पौर्णिमेची रात्र होती. सुमारें १२ वाजायचा सुमार होता. सुधांशु प्रियकर नीलवर्ण आकाशसरोवरामध्यें तारारमणींशीं प्रेमळ विहारांत दंग झाला होता. त्याची धवल प्रभा सर्वत्र पसरली होती. आकाश-सरोवरांत इतस्ततः क्रीडणाऱ्या तारारमणी लज्जेनें चमकत होत्या. या वेळीं पुष्पावती नदीच्या कांठीं एका घराच्या पायऱ्या उतरून एक युवती आपलें कोमल पदपल्लव नदीजलांत बुडवून त्याशीं खेळत होती. वायूची मंद लहर तिच्या विस्कळित केशगुच्छांशीं व तिच्या वसनाशीं प्रेमळपणें क्रीडत होती. रजनीनाथाशीं आनंद खेळणाऱ्या तारा त्या अनाथ पोरीला जणूं हंसत होत्या. पण तिचें तिकडे लक्ष्यच नव्हतें. यमुनेच्या समोरच श्रीपतराव अत्यंत मर्यादेनें अधिष्ठित झाले होते. ते म्हणाले:—

" यमुनाबाई, तुमची तारुण्यांत होणारी दुर्दशा पाहून मला तुमची कींव येते. तसेंच यमुनाबाई, आपणास राग येणार नसेल तर, हृदयांतील गोष्ट सांगावयाची म्हणजे, माझें तुमच्यावर गाढ प्रेमही आहे. या प्रेमाचा मोबदला मला मिळेल काय ? हें विचारण्यासाठींच मी आज आपणांला येथें बोलावलें होतें. आपणास त्याचा राग तर नाहींना आला ?" यमुनेची दृष्टि नदीवर उठणाऱ्या लाटांवर स्थिर होती. क्षणभर थांबून ती म्हणाली:—

" छे, छे, श्रीपतराव, त्यांत राग कशाचा ? उलट, आपल्या गाढ प्रेमाबद्दल मी आपली अत्यंत उतराई आहे. तसेंच माझ्या-सारख्या गरीब विधवेच्या, आपण त्या नरराक्षसाचे हातून केलेल्या

मुटकेबद्दल तर, मी आपली कृतज्ञता व्यक्त करणें शब्दाच्या पलीकडची गोष्ट आहे; आणि माझ्याहि हृदयांत आपल्या विषयीं प्रेम नाहीं असें म्हणणें,म्हणजे मला हृदयच नाहीं, असें म्हणण्यासारखें होईल. आपण माझे हृदयेश्वर आहांत. आपलें 'विधवाविवाहा' वरील अत्यंत कळकळीचें व्याख्यान ज्याला संमत होणार नाहीं, तो खरोखर सहृदय खास नव्हे. तथापि देवा, सर्वसामान्य जनसमूहास जो कायदा लागू तो प्रत्येक व्यक्तीवर लादता येणें कधींच शक्य नाही.संसार श्रेष्ठ कीं संन्यास ? असा प्रश्न केल्यास 'संन्यास श्रेष्ठ' असें तर कोणीहि उत्तर देईलच;पण ज्या प्रश्नाचा खल गीतारहस्यग्रंथांत अत्यंत मार्मिकपणें केला आहे त्याचा विचार करतां, बहुजनसमाजाच्या दृष्टीनें पाहतां, 'प्रपंच साधून परमार्थ ( जगाचा संसार) ज्यानें केला,तो नर भला भलारे भला' हें ठीक आहे.तथापि,व्यक्ति-विषयक-दृष्ट्या,स्वार्थ(संसार)जाळून ज्यानें परमार्थ(जगाचा संसार)केला,तो मनुष्य जास्त धन्य नव्हे काय ? तसें नसतें तर वरील वचनाचे लेखक प्रत्यक्ष रामदासस्वामी लग्नमंडपांतून पळालेच नसते. मी केवळ व्यक्तीपुरतेंच बोलतें आहे, आणि आपण याच्याविरुद्ध कधींच बोलला नाहींत,इतकेंच नव्हे, तर माझ्या भाषणांतील मथितार्थ आपणांस पूर्वीच मान्य आहे— अत्यंत मनापासून मान्य आहे- हेंहि मी जाणून आहे.असो.''तारुण्याच्या ऐन भरांत, आयुष्याच्या ऐन उमेदींत आणि वैभवाच्या ऐन रंगांत धारण केलेला संन्यास हा खरा संन्यास होय. विश्वसेवा करण्यासाठीं धनावर लाथ मारून घेतलेला संन्यास हा खरा संन्यास. '' 'अंगं गलितं पलितं मुंडं ' अशी स्थिति झाल्यावर ' वृद्धा नारी पतिव्रते ' सारखा विषयवासनेचा शेवटचा थेंबहि घशाखालीं उतरल्यावर घेतलेला संन्यास, म्हणजे संन्यासाचें ढोंग होय. त्याला संन्यास हा शब्द लावणें म्हणजे त्या शब्दाची हेटाळणी करणें आहे. सुदैवानें सांपडलेला मोकळेपणा मी प्रथम अत्यंत खडतर तपश्चर्येमध्यें घालवीन आणि प्रथम या षड्रिपूंला माझ्या पायाखालीं थै थै तुडवीन. कार्य अत्यंत कठिण आहे ही गोष्ट खरी; परंतु सर्व भगवद्गीतेचें सार जर कक्षांत असेल तर, ''उद्धरेदात्मनात्मानं'' या श्लोकांत व तदर्थक श्लोकार्धादिकांत आहे. श्रीपतराव, क्षणभर विचार करा, परमात्म्यानें केवढी ही जगड्व्याळ शक्ति या मानवाच्या देहांत ठेवली आहे ! अहाहा, त्रिभुवनालाहि पादाक्रांत करणाऱ्या प्रत्यक्ष मदन-

पंचाननाच्या नाकांतही खेचून वेसण घालणाऱ्या त्या चिच्छक्तीच्या जोरावरच भगवान् सांगतात, अर्जुना, "जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदं." मग एवढी प्रचंड शक्ति आपल्या हृदयांत वसत असतां, आणि सुदैवानें त्या शक्तीचा आपणास उपयोग करून घेण्याची सुसंधि आली असतां, ती दवडणारा मनुष्य हतभागीच नव्हे काय ? श्रीपतराव, आणि एकदां त्या उच्च स्थितीला ही यमुना पोहोंचली, त्या उज्ज्वलतेनें काया एकदा सुप्रकाशित झाली, म्हणजे मग सर्व हिंदुस्थानभर फिरून देशकार्यासाठीं देहाचा अंत होईपर्यंत जागृति करीत राहून, हा देह देशकार्यांतच मी विसर्जन करीन; आपल्या समाजाची जेणेंकरून उन्नति होईल, यासाठीं माझी अहर्निश तळमळ राहील ! श्रीपतराव, देशकार्यासाठीं मिळतील तितक्या उत्साही तरुणांची आणि तरुणींची सध्या जरूर आहे. मर्यादित क्षेत्रांत कार्य करीत राहणाऱ्या इतर मंडळींबरोबरच सुदैवानें सुटका झालेल्या मंडळींनीं न राहतां मिळालेल्या संधीचा त्यांनीं योग्य फायदा घ्यावयास नको काय ? ऐहिक दृष्ट्या सध्यांच्या देशाच्या स्थितीकडे लक्ष देतां तरी निदान, ही वेळ विषयसुखांत लोळण्याची नव्हे, असेंच कोणीही विचारी मनुष्य म्हणेल ! ज्याला शक्य त्यानें तें आवरून पारतंत्र्यशृंखलेंत अश्रुमोचन करणाऱ्या आपल्या मायदेशाच्या मुक्ततेसाठीं झटपट कार्याला लागावयास हवें ! या यज्ञांत सर्वच यशस्वी होतील असें नाहीं. कित्येकांस परत संसारबद्ध व्हावें लागेल. परंतु कांहींजण तरी असे निघतीलच अशी माझी बालंबाल खात्री आहे ! उच्च ध्येयासाठीं यत्न करतांना परत संसारांत यावें लागणारांना स्वार्थी विषयसुखांत लोळणाऱ्या इतरांनीं हंसण्याचा अधिकार काडीइतका देखील नाहीं. उदात्त कार्यासाठीं केलेल्या अटोकाट यत्नाची त्या परमात्म्यापाशीं पूर्ण हजिरी पोंचून, तो अशा जीवांना क्षमाच करील ! यासाठीं संसारांतून दैववशात् झालेल्या सुटकेनंतर पुनर्विवाहासाठीं विधुरानें विधवा अथवा विधवेनें विधुर पाहण्याच्या तयारीस लागण्यापूर्वी ' देशसेवा ' या उदात्त कार्याचा विचार करावा ! " कार्य अत्यंत विस्तृत आहे, कामकऱ्यांचाच तुटवडा आहे!" हे ना. गोखल्यांचे शब्द अक्षरशः खरे आहेत. देवा, आपल्याप्रमाणेंच मीही पुरुषांच्या काय, किंवा सध्यांच्या चालीप्रमाणें स्त्रीच्या काय, पुनर्विवाहाला कधींच मानवी जातीला कलंकभूत कृत्य मानणार नाहीं.

पण त्याचबरोबर आपल्याचप्रमाणें मी त्याचा कधींच ढोल बडवणार नाहीं किंवा अशा वधूवर किंवा वरावर सोन्याच्या अक्षता वाहणार नाहीं! असो. याप्रमाणें या गरीब मुलीचे विचार आहेत. ते आपणांस पूर्ण पसंत असलेच पाहिजेत, हें मी आपल्या विधवाविवाहाच्या पुरस्कारासाठीं दिलेल्या अत्यंत तळमळणाऱ्या उद्गारांतूनही खात्रीनें म्हणूं शकतें. ''
श्रीपतराव या यमुनेच्या उदात्त स्वार्थहोमानें खरोखरच जरासे थक्क झाले होते. यमुनेचें भाषण चालूं असतां मधूनमधून तिच्या तोंडावर चमकणाऱ्या अद्वितीय तेजानें ते नुसते दिपून जाऊन खालीं पहात असत. तथापि, आपण आपल्या भाषणांत समाजाच्या दृष्टीनें यत्किंचितही वावगें असें कांहीं सांगितलें नाहीं, याबद्दल प्रत्यक्ष:आपल्यासमोर अधिष्ठित झालेल्या पावित्र्याच्या पुतळीची देखील खात्री आहे हें पाहून त्यांना मनापासून संतोष वाटला. ते म्हणाले:—

'' यमुनाबाई, आपल्या या उदात्त विचाराच्या यत्किंचित्‌ही उलट विचार प्रदर्शित करणें, म्हणजे मला माझ्याशीं बेइमान व्हावें लागेल. आणि ती गोष्ट कालत्रयीहि या श्रीपतीकडून होणार नाहीं. माझ्या आपणावरील गाढ प्रेमाची जरी देशकार्याच्या स्थंडिलावर होळी झाली, तरी मी त्या होळीच्या प्रकाशांत शेकत बसेन आणि अहर्निश आपल्यासारख्या दिव्य संन्यासिनीचें चिंतन करून ह्या देहाला कृतार्थ करीन! '' यावेळीं सर्व विश्व शांत दिसत होतें. सुधांशु वसुंधरेला अमृतस्नान घालीत होता! नदीच्या शांत प्रशांत लाटांवर तारांगनांच्या मुग्ध गानाच्या तालावर चंद्रकिरण नाचत होते! या आनंददायी देखाव्याकडे दृष्टि देऊन बसलेली यमुना म्हणाली:—

'' श्रीपतराव, या तुमच्या दिव्य आत्मयज्ञाबद्दल मी आपली फार आभारी आहे. खरोखर देवा, आपणा मानवाचें ध्येय परमात्ममय होणें हें आहे आणि खरी कर्तबगारीही पण त्यातच आहे. देवा, खरी कर्तबगारी,—आयुष्यांतील खरी चमक, स्वार्थाचा होम करून परार्थासाठीं झटण्यांत आहे. पोराबाळांचें लेंढार वाढवून त्यांतच गढून जाणें ही केवळ पशुवृत्ति आहे. श्रीपतराव, तुम्हीही साधल्यास माझ्याच सारखा यत्न करावा, या विषयाला पायाखालीं तुडवावें, आणि दिव्य संन्यासी बनून जगदुद्धारासाठीं बाहेर पडावें, असें माझें तुम्हाला आग्रहाचें सांगणें

आहे. आपण वैषयिक वासनेस पार धुडकावून देऊन निर्हेतुक निष्काम अशा प्रेमानें रंगूं. कोणच्याहि काळीं झालें म्हणून काय झालें, जीवात्म्यानें आपला उद्धार करून घ्यावा, आणि या विषयकर्दमांत लोळत पडणें शक्य तितक्या लवकर आवरावें, याचसाठीं आपणास हा नरदेह परमात्म्यानें दिला आहेना ? इतर योनींत सहज असणाऱ्या ह्या मदन–एडक्याच्या टकरांची धडक सहन करून, त्यास जेरीस आणण्याची दिव्य शक्ति परमात्म्यानें आपणांस दिली आहेना ? श्रीपतराव, हें माझें भाषण सर्वांसच सारखें लागूं आहे आणि तें आपल्या विचारांच्या व उद्गारांच्या विरुद्ध नाहीं, हें मी पूर्ण जाणून आहे, हें मी पुन्हा आपणांस सांगते. तथापि, आपल्याच विचारांचा अनुवाद आपण ऐकावा अशी माझी प्रार्थना आहे. सध्यांची माजलेली अन्यायाची दंडेली, देवा, आपणांप्रमाणेंच मीही एक क्षणभरही सहन करणार नाहीं. माझेंतर असेंच म्हणणें आहे कीं, पुरुषांना व स्त्रियांना पुनर्विवाहाची पूर्ण मुभा पाहिजे. ज्या बिचाऱ्या दुर्बल जीवांस या 'एडक्या'ची टक्कर सहन होत नाहीं, त्यांनीं अनीतिकर्दमांत रुतण्यापेक्षां उघड पुनर्विवाह केलेला शतपट बरा. पण स्त्रियांनीं काय किंवा पुरुषांनीं काय, हें पूर्ण लक्षांत ठेवावें कीं, आपला जन्म विषयसुखांत डुबण्यासाठीं नसून, त्यापासून शक्य असल्यास पूर्ण, किंवा निदान होईल तितकें, अलिप्त राहण्यासाठीं आहे. मग ते प्रथमविवाहित असोत किंवा पुनर्विवाहित असोत. देवा, माझ्या मनश्चक्षूंपुढें ज्या दिव्य संन्यासीसंन्यासिनींचा तांडा देशकार्यासाठीं उज्ज्वल तेजानें वावरतांना दिसतो आहे, तसा तांडा प्रत्यक्ष दृष्टीस पडणें फार कठीण आहे. कारण मदनाला मारून विजयी होणें ही गोष्ट सोपी नव्हे. तथापि, ती अशक्य नाहीं. आणि म्हणूनच या दृष्टीनें प्रत्येक व्यक्तीच्या हातून यत्न झाला पाहिजे. आत्मोद्धाराच्या व देशहिताच्या दृष्टींनीं या विषयकर्दमांत लोळणाऱ्या स्वार्थी देशबांधवांची अथवा देशभगिनींची–अशा स्वार्थाचा होम ज्यांनीं केला, त्याची रक्षा ज्यांनीं सर्वांगास लाविली, अशा त्यांच्या हितचिंतक बंधुभगिनींनीं–योग्य कानउघाडणी केली पाहिजे. त्या आपल्या एका दिव्य कर्तव्यांत चुकल्या अशी जाणीव त्यांला वाटावयास लाविली पाहिजे. आणि पश्चात्तापाची व स्वार्थत्यागाची होळी त्यांच्या हृदयांत पेटेल असा उपदेशाचा आगडोंब

उठविला पाहिजे. अर्थात् अशा कामीं, एका कावळ्यानें दुसऱ्या कावळ्यास काळें म्हणणें, हें अत्यंत नचिपणाचें कर्म आहे. राजहंसांनींच हें काम करावयास हवें. श्रीपतराव, असे राजहंस आत्मोद्धाराच्या दृष्टीनें तर नेहमींच जितके निघतील तितका परमात्मा आनंदानें वेडा होऊन नाचेलच, तथापि, देशोद्धारासाठीं कां होईना, पण स्वार्थाची होळी पेटविणारे राजहंस जरी आपल्या समाजांत प्रस्तुत निर्माण झाले, तरी त्यांची आज आपणांस किती आवश्यकता आहे,हें देवा, मी सांगावयासच पाहिजे असें नाहीं ! '' असें म्हणून यमुनाबाई चंद्राच्या सुधाधवल बिंबाकडे व धवलवस्त्रानें विनटलेल्या सृष्टीकडे सकौतुक पाहूं लागली ! श्रीपतरावांनाहि तिच्या उद्गारांनीं फार संतोष वाटला व ते म्हणालेः—

" यमुनाबाई, आपल्यासारख्या दिव्य संन्यासिनी जोंवर आमच्या देशांत उत्पन्न होत आहेत, तोंपर्यंत तरी निदान देशाच्या उत्कर्षाच्या आशेला जागा आहे, असें म्हणावयास कांहींच प्रत्यवाय नाहीं. यासाठीं आपण या धवलचंद्रास साक्ष ठेवून आजन्म ब्रह्मचर्यानें राहण्याची या नदीतीरीं शपथ घेऊं या !'' दोघेही तेथून उठली, चंद्रास अनन्य भावानें त्यांनीं नमस्कार केला, आणि आपण केलेली शपथ तडीस नेण्यासाठीं त्याची करुणा भाकिली ! चंद्रानेंही आपला धवल कर दोघांच्याही मस्तकीं ठेवला ! व दोघांसही धवल प्रभेनें स्नान घातलें ! जणों तो त्यांची हृदयें निर्मळच करीत होता ! तारारमणी हा देखावा पाहून सकौतुक आनंदानें स्मित करीत होत्या ! त्यांच्या दंतपंक्तींचें शुभ्र चांदणें चंद्राच्या चांदण्यांत मिसळून गेलें !

## प्रकरण २५ वें.

## दिव्य संन्यासिनी.

प्रातःकालीं ५ वाजण्याचा समय ! यावेळीं यवतेश्वराचे डोंगरावर सर्वत्र सामसूम होतें. पौर्णिमेचा चंद्र पश्चिमक्षितिजाकडे वळला होता ! त्याचे सुधा—धवल किरणांनीं यवतेश्वर सुस्नात होत होता ! हरित तृण-

राजीवर व हरिततृणाच्छादित भूप्रदेशावर पडलेल्या दंवबिंदूंनीं वसुंधरा मंगलस्नान करीत होती ! अशा वेळीं त्या पर्वतावरील एका पर्णकुटिकेंतून एक युवती बाहेर पडली. तिनें धवलवस्त्र परिधान केलें होतें. तिच्या आत्म्याचें वस्त्र—देहहि—धवलगौर होतें. तिच्या भोंवतींहि चंद्राची धवल ज्योत्स्ना पसरली होती ! धवलतेचा कोण हा हृदयंगम मिलाफ ! हळुहळू बाला गिरिनदीच्या कांठीं आली. तिजबरोबर तिचें एक पाळीव हरिणबालकही होतें. तिनें आपला वीणा व बरोबर आणलेलें धवलवस्त्र आणि फुलांची परडी नदीतीरीं ठेविली आणि, " किशोर बैस हं इथें. मी आत्तां स्नान करून येतें." असें म्हणून ती पाण्याकडे वळली. "किशोर" आपल्या प्रिय मातेच्या वस्त्राजवळ बसला. युवती नदीतीरीं उभी राहून तिनें परमात्म्यास—श्रीशंकरास—यवतेश्वरास—नमस्कार केला. प्रातर्वायूच्या लहरी तिच्या पाठीवर आणि स्कंधावर रुळणाऱ्या मुक्त केशकलापाशीं क्रीडूं लागल्या. युवती पाण्यांत शिरली व " जय गंगे, काशीविश्वेश्वर," असें म्हणत तिनें स्नान केलें. ' किशोर ' मुग्ध बालकाप्रमाणें हा देखावा पहात होता. युवतीनें शुचिर्भूत धवलवस्त्र परिधान केलें व केशकलाप पुसून तो पाठीवर मोकळा सोडला. आणि अष्टदिशांस प्रणिपात करून, " चल किशोर, " असें म्हणून तिनें आपला वीणा उचलला, परडी हातांत घेतली आणि शंकराचें स्तोत्र म्हणत ती शंकराचे देवालयापाशीं आली. घंटानादानें शंकरास जागृत करून तिनें शंकराची अनन्यभावानें पूजा केली व त्यास बेल वगैरे वाहून भक्तिपुरस्सर त्यास वंदन केलें. आणि नंतर ती नदीकांठीं असणाऱ्या एका शिलाखंडावर येऊन बसली. " किशोरा "स तिनें ममतेनें कुरवाळलें आणि " किशोर, आतां आपण देवाचीं पदें म्हणूं हं. " असें म्हणून युवतीनें आपली वीणा मांडीवर घेतली. आणि ती गाऊं लागली:—

" आवड तुला बेलाची । शंकरा, आवड तुला बेलाची ॥—"

युवतीचा कंठ अत्यंत मधुर होता. वीणाझंकारांत युवतीच्या कंठांतून निघणारें दिव्य संगीत मिसळूं लागलें. युवती गौरवर्ण होती. चंद्राच्या ताम्रधवल प्रकाशांत तिचा गुलाबी वर्ण मिसळून गेला. ' किशोर ' गानमुग्ध होऊन सुंदरीच्या पायाशीं बसला होता. सुंदरीचा चेहरा शांत, गंभीर पण आनंदी दिसत होता. तिच्या मुखावर दिव्यतेची झांक मारीत

होती. या वेळचा देखावा मोठा बहारीचा होता! प्रातर्वायूच्या शांत-प्रशांत लहरी नदीच्या पात्रावर अनंत तरंग कंपित करीत होत्या! चंद्र-किरण त्यावर नाचत होते! जणूं काय ते सुंदरीच्या गानास तालच धरीत होते! वृक्षराजीहि किंचित् आंदोलित होऊन डोलत होती! जणूं काय सुंदरीच्या गानानें ती मोहित होत होती! त्या गानानें आनंदित होऊन निर्मळ प्रेमराशी सुधांशु आरक्त दिसत होता! भक्तिभावानें तन्मय झालेली सुंदरी पुनःपुन्हा चरण घोळून म्हणत होतीः—

" अर्धांगीं पार्वती, मस्तकीं गंगा। भाळीं कोर चंद्राची। शंकरा०॥—" हळु हळु तिचें गाणें संपलें. तिनें " जय शंकर, जय शंभो " असें म्हणून शंकरास नमस्कार केला. तिनें आपल्या किशोरास पुन्हा एकदा कुरवाळलें, त्याचें चुंबन घेतलें व यमुना—ती यमुनाच होती हें वाचकांनीं जाणलेंच असेल—आत्मगत बोलूं लागलीः—

" अहाहा! किती हें रम्य स्थान! बाबांना आणि आईला विचारून इथें अभयानंद बाबांच्या आश्रयास आल्याला मला पांचसहा वर्षें झालीं. निघतांना त्यांना किती वाईट वाटलें? तथापि, दिव्यकर्तव्यासाठीं मी आईची समजूत घातली आणि मग दोघांनींहि मला आनंदानें परवानगी दिली. येथील वृक्षांचीं मधुर फळें खावीं, नदीचें निर्मल जळ प्राशन करावें, तृणशय्येवर शयन करावें, अभयानंद बाबांची सेवा करावी आणि ईश्वराच्या भजनपूजनांत दंग असावें, हाच माझा येथील नित्यक्रम आहे. परमात्म्याच्या ध्यानाचा आनंद आणि गोडी किती मधुर आहे! अहाहा! त्यापुढें सर्व सुखें खरोखर तुच्छ आहेत! या माझ्या लाडक्या 'किशोरा'ची संगत दिखील किती मजेदार आहे. सृष्टिसुंदरीचें हें प्रेमळ बालक माझें चित्त किती रंजवितें! किशोर, तुझ्या सारखी प्रेमळ आणि सरलमनस्क मानवजात होईल, तर पृथ्वीचा खरोखर स्वर्ग बनेल! अभयानंद बाबांचा सहवास तरी किती सात्त्विक आणि प्रेमळ? त्यांची मजवर किती तरी माया आहे. तशीच ही सृष्टिसुंदरीची शोभाही किती अवर्णनीय आहे? पिकसारिकादि पक्ष्यांचें मधुर कूजन, हरित वृक्षराजींचें प्रेमळ डोलन, नदीचें शांत निर्मळ जल आणि त्यावरील अमित तरंगराशी, उषःकालचा व सायंकाळचा तो सुरम्य देखावा, त्या वेळच्या सवित्याच्या ताम्रपीत किरणांशीं

मिलाफ पावून प्रमुदित हृदयानें हंसणारी पुष्पराजी, इत्यादि अनंत देखाव्यांनीं मन कसें वेडें होऊन जातें ! अशीं स्थळें खरोखर परमेश्वरचिंतनाला किती उपयोगीं आहेत ? अशाच ठिकाणीं प्रेमळ कान्होपात्रा व मिराबाई टाळछंदाच्या साक्षात्कारांत ईश्वरी भजनांत रंगल्या असतील ! असो. चल, किशोर, आतां आपण पर्णकुटीकडे जाऊं आणि या पवित्र प्रातःकाळीं समर्थांच्या—" प्रभाते मनीं राम चिंतीत जावा " ह्या उपदेशाप्रमाणें ईशाचिंतनाची गोडी घेऊं, चल ! " असें म्हणून सुंदरी यमुना उठली आणि शंकराचें भजन करीत आपल्या पर्णकुटीकडे गेली. तिनें पर्णकुटीचा दरवाजा उघडला आणि "बाबा!" "बाबा" अशी प्रेमळ हांक मारली. या वेळीं चंद्राचें बिंब आरक्त होत्सातें पश्चिम क्षितिजावर टेकलें होतें. रात्रभर शुभ्र प्रकाशाच्या दानाचें कार्य निरलसपणें बजावून दमल्या भागलेल्या चंद्रम्याच्या वदनावर शांततेचा आरक्तवर्ण आला होता ! इतक्यांत पूर्वदिशा अरुणरंगानें रंजित झाली ! उषासुंदरीच्या कपोलावर लज्जेचें आवरण चढलें ! अभयानंद बाबा निद्रेंतून जागे झाले, " काय बाळे ? " असें त्यांनीं विचारलें.

" बाबा उठायचें ना ? हा पहा पंच पंच उषःकाल झाला !" यमुना वीणाविनिंदित स्वरांत म्हणाली.

" उठतों बरें बाळ !" असें म्हणून त्यांनीं शय्येचा त्याग केला आणि करदर्शन व भूमिवंदन करून ते शंकराचें नामस्मरण करीत बाहेर आले. या वेळीं रविबिंब नुकतेंच उदयाचलीं येत होतें ! तें पाहून त्यांनीं हांक मारली:—

" बाळ, ही पहा येथें किती अपूर्व शोभा आहे ! " यमुनेनें बाहेर येऊन अभयानंदास प्रेमळपणें मिठी मारली व त्यांच्या वक्षःस्थलावर लडिवाळपणें आपलें मस्तक ठेवून ती सृष्टीची शोभा अवलोकन करूं लागली.

" बाबा " ती म्हणाली, " किती हा बहारीचा संगम ! मला या ठिकाणीं कालिदासाच्या " तेजोद्वयस्य युगपद्व्यसनोदयाभ्यां " या श्लोकाची आठवण होते. बाबा, हे बंधुद्वय आपलें कर्तव्य किती निरलसपणें करतात हो. सृष्टींतील यच्चयावत् पदार्थ कसे आपापल्या कर्मांत चूर आहेत. आणि इतकें असून बिचारे सर्व प्राणी आनंदी. बाबा, कर्तव्यकर्म आणि आनंद यांचें किती हें दिव्यमीलन आहे ! ही गिरिनदी

आनंदानें नाचतबागडत असते, पुष्पें आनंदानें हंसत–खेळत–डोलत असतात, तारामंडळाचा नृत्याचा फेरही उल्लसित असतो. बाबा, कर्तव्य आणि आनंद यांची मधुर सांगड जर मानवी प्राणी घालील, तर किती बहार होईल ! पण हाय ! कर्तव्यकर्मास चुकून मानवानें आपल्याच हातानें आपल्या सुखांत माती कालविली आहे. नाहीं बाबा ?'' अभयानंद प्रेमानें तिच्या कुरल केसाला कुरवाळीत होते आणि एकीकडे आपल्या बालेचे मधुर बोल ऐकत होते. बिचाऱ्या अभयानंदांचें हृदय म्हणजे करुणामय होतें. निर्घृण काळानें त्यांच्या उत्कृष्ट संसाराची धूळधाण केली होती. बायकापोरें, मुलेंबाळें,सर्वांच्या चितेवर अग्नि ठेवण्याचा अत्यंत हृदयविदारक प्रसंग त्यांच्यावर आला होता. संसाराच्या होळीनें तप्त झालेलें त्यांचें हृदय अत्यंत वत्सल झालें होतें. हाय ! त्या वेळीं त्यांनीं अनंत शोक केला व शेष आयुष्य भगवच्चिंतनांत घालवावें म्हणून आपल्याचप्रमाणें संसाराची राख अंगास फांसणाऱ्या यवतेश्वराचा त्यांनीं आश्रय केला. ह्या बालिकेच्या ठायीं त्या वृद्धाचें पित्याप्रमाणें प्रेम जडलें होतें. सुंदरीच्या प्रेमळ सहवासानें त्यांच्या तप्त हृदयाला विसांवा मिळाला होता. हृदयाची गोष्टच अशी आहे कीं,त्याला कोठेंतरी आसरा–आपल्या हृदयसर्वस्वाचें दान करावयास आसरा–लागतो. मग तो पति, पुत्र, भार्या, बंधु, पिता, मित्र कोणच्या का रूपानें असेना, पण तो लागतो. असो, यमुनेच्या मधुर भाषणानें आनंदित होऊन ते म्हणाले:—

" बाळे, तूं किती मधुर आणि दिव्य बोल बोलतेस ? माझी बाळ आहेच तशा गुणांची !'' असें म्हणून म्हाताऱ्याच्या नयनांतून प्रेमाश्रुधारा सुंदरीच्या मस्तकावर स्रवूं लागल्या ! यमुनेनें कमरेचा विळखा न सोडतां अभयानंदाच्या मुखाकडे पहात ती लडिवाळपणानें म्हणाली:—

" बाबा, तुमचें माझ्यावर किती हो प्रेम आहे ! '' अभयानंदांनीं तिचें मुख कुरवाळीत म्हटलें:—

" या माझ्या स्वर्गीय बालेवर कोण बरें प्रेम करणार नाहीं ? '' असें म्हणून वात्सल्यभरानें त्यांनीं तिचें चुंबन घेतलें. बाबांच्या नेत्रांतून अश्रुपात होत होता. त्यांची वृत्ति गहिंवरली होती !

" बाबा, '' यमुना म्हणाली, " तुम्हीं असे वारंवार कष्टी कां बरें होता ? मला तुम्ही 'बाळे' म्हणून प्रेमानें कुरवाळता. माझ्यापासून

तुम्हांला सुख होतें ना ! " बाबांनीं आपले अश्रु चटकन् पुसले आणि ते म्हणाले:—

" कांहीं नाहीं बाळ, ईश्वरेच्छेपुढें कोणाचा इलाज नाहीं. माझी करुण कहाणी तुला ठाऊकच आहे. बाळे, पूर्वस्मृति हृदयास असा गहिंवर आणते, आणि नेत्रांतून प्रेमाश्रु काढते. गतकालाच्या आठवणींतही एक प्रकारचें सौख्य भरलें आहे. बाळे, त्या सौख्याचेच हे अश्रु बरें ! बाळ, तुझ्यापासून मला कितीतरी सुख होत आहे! आतां माझ्या जीवनाचा आधार तूंच आहेस ! " याप्रमाणें त्या दिव्य विभूतींचें प्रेमळ भाषण चाललें असतां सवित्याला आनंद होत होता ! सहास्यवदनानें तो हें स्वर्गीय दृश्य पहात होता ! अभयानंदांची यष्टि उंच होती. चेहरा भव्य होता. आणि त्यावर जरी शोकाच्या छटा उठल्या होत्या, तरी त्यावर एक प्रकारचें ईश्वरनिष्ठेचें आणि पुत्रवात्सल्याचें स्वर्गीय तेज झळकत होतें ! यमुनाहि एक स्वर्गीय तेजाची बालिका होती ! सवित्यानें त्या दोघांसही आपल्या ताम्रपीत करांत लपेटून घेऊन त्यांचें तेज द्विगुणित केलें व तो त्यांच्याकडे कौतुकानें पाहूं लागला ! 'किशोर'हि बाहेर येऊन लडिवाळपणें सुंदरीच्या वसनाशीं खेळूं लागला ! पुष्पें आनंदानें नाचूं लागलीं ! वायुलहरी त्याशीं खेळूं लागल्या ! नंतर सवित्यास प्रणाम करून वृद्ध स्नानास नदीतीरावर गेला व यमुना ' किशोरा'स घेऊन ईश्वराचें पवित्र नामस्मरण करीत पर्णकुटिकेंत शिरली.

—∞✻∞—

## प्रकरण २६ वें.

# संन्यासी.

ती सायंकाळची वेळ होती. भगवान् भानुराज श्रांत होत्साते पश्चिम क्षितिजावर स्थित झाले होते. श्रमाची लाली त्यांच्या मुखमंडलावर व आसमंतात् पसरली होती ! पतिदैवताच्या सुखदुःखाशीं एकरूप असलेल्या साध्वी पश्चिमेचेंहि मुखमंडल आरक्त दिसत होतें ! अशा वेळीं एकतीस-बत्तीस वर्षें वयाचा तरुण एका निर्झरणीकांठीं प्रशस्त शिलाखंडावर

बसून सभोंवतालच्या सृष्टिशोभेचें कौतुक पहात होता. सायंवायुच्या शीतल लहरी चित्तास आल्हाद देत होत्या, तरंगिणिवरील लाटा कंपित करीत होत्या, वृक्षराजसि डोलवीत होत्या, पुष्पांस हंसवीत होत्या ! जवळच सह्याद्रीची नीच मालिका विराजत होती. नदीचा कलकलरव चालू होता. सवित्याची ताम्रपीत कोमल किरणें हरितवृक्षराजीवर, हरिततृणाच्छादित भूप्रदेशावर, निर्झरणीच्या चंचल पात्रावर, नवरागरंजित पुष्पावर, नीलवर्ण गिरिराजीवर पडलीं होतीं ! तो देखावा फारच बहारीचा दिसत होता ! त्याच किरणांच्या मनोहर जलांत सुस्नात होणारा आमचा तेजस्वी तरुण, इतर सृष्टप्रमाणें कोमल सौख्यानें डुलत होता व "ईश्वरा, कोण ही तुझी अपरंपार सौख्याची लयलूट ! " असें म्हणून आपलें मस्तक वारंवार विनम्र करीत होता. तरुणाच्या मस्तकावर निर्मल जटाभार विराजत होता. वदनावर व कायेवर दिव्य, सात्विक, यौगिक तेज विलसत होतें. तरुणाच्या भगव्या कफनीचें सवित्याच्या भगव्या किरणांशीं होणारें मीलन अपूर्व होतें ! हळूहळू अंधकार पडूं लागला. सवित्यानें पूर्ण विश्रांति घेऊन तो ' दिग्वदनें स्वच्छ करीत ' दुसऱ्या खंडावर प्रकाशाचें कार्य करण्यास निघून गेला. त्याची श्रमाची मुखमंडलावरील लाली पश्चिमासाध्वीच्या ' मृदुशीतांकीं ' शयन केल्यानें नाहींशी होऊन ऐन तारुण्यांतील प्रभातकालीन उत्साहाच्या आरक्ततेंत विलीन झाली ! ( कारण ज्या सवित्याच्या ज्या स्थितीवर एका खंडांतील कविकल्पना त्याच्या अस्त समयींच्या असतात, त्याच सवित्याच्या त्याच स्थितीवर दुसऱ्या खंडांतील कविकल्पना उषःकालीन होत असतात.)आमचा तपस्वी युवक हळूहळू उठला व जवळच नदीकांठीं असणाऱ्या पर्णकुटिकेंत जाऊन बरोबर आणलेलीं कंदमुळें त्यांनीं एका कटोऱ्यांत ठेविलीं, व कुटिकेच्या बाहेर येऊन त्यांनीं आपली धुनी पेटाविली. आज पौर्णिमेचा दिवस असल्यामुळ सुधांशूंचा आरक्त गोल त्या वेळीं पूर्व दिग्भागीं विराजत होता ! दूर गांवांतील कोलाहल ऐकूं येत होता. सुधांशुचे ताम्रकिरणांनीं सकल वसुंधरा विनटली होती ! वायूच्या शीतल लहरींनीं कंपित होणारें नदीपात्रावरील तरंग चंद्रकिरणाशीं नृत्य करीत होते ! निर्झरणी आपल्या कलकलरवाची अमृतनिस्यंदिनी बांसरी वाजवून अमृतनिर्घोस आळवीत होती ! सुधांशूचे ताम्रकिरण धुमीच्या

ताम्र ज्वालांशीं मिलाफ पावत होते ! ह्या दिव्य सृष्टीच्या अपूर्व शोभेचें आनंदभरानें क्षणैक अवलोकन करून आमचा तपस्वी—श्रीपतराव—ते श्रीपतरावच होते हें चतुर वाचकांनीं जाणलेंच असेल—बोलूं लागला:—

अहाहा ! कोण दिव्य सुखाचा ठेवा या सृष्टींत मानवाच्या आधीन परमेश्वरानें करून ठेवला आहे ! परंतु दुर्दैवी मानव त्याचा दुरुपयोगच करीत आहे. नरजन्माचें खरें सार्थक म्हणजे या षड्रिपूंचें निर्दालन करून ब्रह्मानंदाच्या अपूर्व रंगाची लयलूट करावी व परमात्म्याचा आदेश ग्रहण करून सर्व प्राणिमात्राच्या कल्याणासाठीं अहर्निश झटावें, यांत आहे. स्वार्थीपणानें आपणच केवळ अनंत सुखांत लोळत न राहतां आपल्याप्रमाणेंच इतर आपले बांधवही सुखी करण्यासाठीं मानवानें झटलें पाहिजे. अहाहा ! यमुने, स्वर्गीयसुंदरी, तो दिवस मी कसा विसरेन ? त्या दिवशीं तूं आपल्या दिव्य स्वर्गीय उपदेशानें मला दिव्य मार्ग दाखविलास ! यमुने, उच्चप्रतीच्या आनंदाचें मला वेड लावणाऱ्या ललने, तूं मला गुरूच भेटलीस ! त्यानंतर मी आपल्या संसारावर तिलांजळी दिली. कारण ईश्वरकृपेनें मी त्या वेळीं संसारांत बद्ध नव्हतों ! संसारांत बद्ध असतां,बायकापोरांना उपाशी मारून,परमार्थ करण्यासाठीं अरण्यांत धांव घेणारा प्राणी अधमच म्हटला पाहिजे ! पण सुदैवानें माझी तशी स्थिति नव्हती. मी संसारपाशांतून मोकळा झालों होतों. यमुनेशीं—त्या अनाथ बालेशीं—विवाह करून तिचें व आपलें दोघांचेंहि जीवित सुखमय करावें, असा मला मोह पडला होता. परंतु यमुना म्हणजे इहलोकची बाला नव्हे, यमनियमादिकांचा अलौकिक अभ्यास करणारी एखादी स्वर्गीय ब्रह्मवादिनी आहे, असें माझ्या प्रत्ययास आलें ! अरेरे, गरीब बिचारी ! अनाथ स्थितींत तिजवर अनेक संकटें आलीं, पण भक्तवत्सल परमात्म्यानें तीं निवारण केलीं ! ती ब्रह्मवादिनी तपःसिद्धीसाठीं निघून गेली. सध्यां ती कुठें असेल कोणास ठाऊक ? कोठेंही असली तरी ती सुखांत असो, असें,ईश्वरा, माझें तुझ्यापाशीं अहर्निश मागणें आहे! तिचा उपदेश—तिचा प्रत्येक शब्द—कसा अजून माझ्या कानांत घुमत आहे ! तो समय मी कसा विसरेन ? आज इतके दिवस परिश्रम करून प्राप्त झालेली तपःसिद्धी केवळ तिच्या चिंतनावरच मला मिळाली ! प्रत्यक्ष परमपदापर्यंत नेऊन सोडण्याचें देखील सामर्थ्य दिव्य सुंदरींत वास

करीत असतें, याचा मला प्रत्यय आला ! आईचा आशीर्वाद घेऊन निघतांना माझ्या पुत्रवत्सल मातेला किती गहिंवर आला ? परंतु ती सुशिक्षित व सुजाण असल्यामुळें विवेक करून तिनें मला अनुज्ञा दिली. स्वतःचा संसार करून त्यांतच रममाण होणाऱ्यांच्या कोटीहून वरचढ कोटींत चमकावयाचें असेल, त्यानें ‘ भगवंताचें अधिष्ठान ’ आधीं प्राप्त करून घ्यावयास हवें ! आशातृष्णांचा त्याग करावयास हवा. हृदयांत स्वकार्याची ज्योत प्रखर जळावयास हवी. यासाठीं स्वतःच्या संसाराचा होम करून मी ‘ प्रेमसंन्यास ’ घेतला. त्याचें निरंतर निदर्शक अशी ही धुमी जवळ केली व भगवी कफनी अंगावर चढविली ! उत्तर हिंदुस्थानांतील अनेक तीर्थक्षेत्रें व अनंत उदात्त सृष्टीचे देखावे अवलोकन करीत तीर्थयात्रा केली. हिमालयावरील एका दिव्य योग्याचे चरण धरून त्याची अहर्निश सेवा केली व योगाभ्यासानें ब्रह्मानंदाचा अनुभव घेण्यास शिकलों ! त्या माझ्या दिव्य गुरूचें नांव ब्रह्मानंद योगी असें होतें ! त्या महात्म्याचे मजवर जे अनंत उपकार झाले, त्याची फेड जन्मजन्मांतरींहि होणें कठीण ! गुरुराज, आपणाला माझे शतशः प्रणाम असोत ! असो. त्यांचा आशीर्वाद घेऊन निघालों, तों सध्यां ह्या प्रदेशीं येऊन राहिलों आहे. लवकरच मातुःश्रीस वचन दिल्याप्रमाणें तिला भेटावयास गेलें पाहिजे !” असें म्हणून तपस्वी थांबला व त्यानें धुमींतील अग्नि मंद झाला होता तो पुन्हा प्रज्वलित केला ! लवकरच त्यानें समाधी लावली व त्या सुखांत तो डोलूं लागला ! तेव्हां त्याच्या सौख्यांत मदत करण्यासाठीं अखिलसृष्टीहि झटूं लागली ! सुधांशूनें आपल्या कोमल करांचें वस्त्र त्यासभोंवतीं पसरलें ! वायूच्या लहरी मंदमंदपणें त्याच्या शरीरास स्पर्शूं लागल्या !

## प्रकरण शेवटचें.

## उपसंहार

वाचक! आतां या गोष्टींचा उपसंहार करावा हें बरें.

आमचे नारायणराव इंग्लंडहून परत आले. त्यांच्या बरोबर प्रेमल-हृदया मेरी––त्यांची आंग्ल भागिनी–व तिचा पति जॉन हेहि आले. लवकरच नारायणराव व सुशीला आणि अच्युतराव व कावेरी, यांचें एकाच सुमुहूर्तावर मंगलकार्य उरकलें! त्या वेळीं विनायकराव व सरस्वतीबाई यांस कृतज्ञतेनें गहिंवरून किती आनंद झाला असेल, याची कल्पनाच केली पाहिजे! मनोहरपंत व सुमतीबाई यांसही आपण एक 'सुशिक्षितांचें खरें कर्तव्य' बजावलें या विचारानें किती सात्त्विक आनंद वाटला असेल, याची, तशीं कर्तव्यें करणाऱ्या महात्म्यांनाच कल्पना करतां येणार आहे! प्रत्यक्ष विवाहबद्ध होणाऱ्या तरुण युगुलांच्या स्वर्गीय आनंदाचें वर्णन करणें लेखकाच्या शक्तिबाहेरचें काम आहे! असो. या मंगलप्रसंगीं होणाऱ्या आनंदांत आमचे फौजदारसाहेब व चंद्रा हीं भागीदार होतीं हें निराळें सांगावयास नकोच. मेरी व जॉन हें आंग्ल-युगुलहि त्या प्रसंगीं कौतुकानें हजर होतें! या वेळीं फक्त यमुना व श्रीपतराव यांचाच काय तो अभाव आमच्या मंडळींच्या वदना-वर किंचित खिन्नता पसरवीत असे! पण इतक्या आनंदास एखादें तरी गालबोट हवेंच.

* * *

कुसुमपूर सोडल्यापासून १२ वर्षांनीं यमुनेची––आमच्या दिव्य संन्यासिनीची––तपश्चर्या पुरी झाली! एके दिवशीं अभयानंदबाबांचें देहावसान झाल्यावर तिनें त्यांची उत्तरक्रिया केली. प्रेमळ अभयानंदाच्या ठिकाणीं तिचें पित्याप्रमाणें प्रेम असे. आणि म्हाताऱ्यानेंहि मरतां मरतां देखील आमच्या यमुनेकडे––त्याच्या लाडक्या बालेकडे––प्रेमळ दृष्टि-पात करून मग देहत्याग केला होता! असो. आतां यमुना पुढें आपला देह परोपकारांत झिजविण्यासाठीं बाहेर पडली. कुसुमपुरास आल्यावर मातापित्यांच्या आग्रहास्तव ती आपल्या पहिल्याच घरीं राहिली. पण जवळच नदीकांठीं एक लहानशी पर्णकुटिका करून तिथें कांहीं वेळ शांत-

पणें जाऊन ती ईश्वरी ध्यानांत मग्न होई. श्रीपतरावहि आपली तपश्चर्या पुरी करून आले. या दोघां संन्यासीसंन्यासिनींस पाहून अच्युतराव व नारायणराव यांच्या घरीं किती आनंद झाला असेल, याची कल्पनाच केली पाहिजे.

बरोबर १२ वर्षांनीं एके दिवशीं रात्रीं त्याच नदीकांठीं त्याच वेळीं श्रीपतराव व यमुना दिव्य आनंदाच्या गोष्टी करीत बसली होतीं ! बारा वर्षांपूर्वीचें चित्र व आतांचें चित्र यांतील फरकाचा त्यांच्याप्रमाणें वाचकांनींही विचार केल्यास क्षणभर त्याच्या बुद्धीला थक्क झाल्यासारखें वाटेल !

* * *

जेणेंकरून विधवांचें पावित्र्य वाढेल, पण त्याजबरोबर जेणेंकरून त्या सुशिक्षित होऊन त्यांचा समाजाला उपयोग होईल, यासाठीं एक 'अनाथबालिकाश्रम' कुसुमपूर गांवीं यमुनेनें चालू केला आहे. श्रीपतरावांनीं आपली राहिलेली सर्व इस्टेट त्यासाठीं यमुनेच्या स्वाधीन केली.

* * *

त्याचप्रमाणें आईबाप असूनही पुष्कळ गरीब मुलांची शिकण्याची नड होते, यासाठीं फी न घेतां व पुस्तकें फुकट देऊन, इंग्रजी सात यत्तेपर्यंत मुलांची व मुलींची शाळा चालवण्याचा मंडळींचा विचार आहे. वरील सर्व संस्थांस व 'गृहा 'स सुमतीबाई, कावेरी, यमुना, सुशीला, सरस्वतीबाई, मेरी, चंद्रा तसेंच मनोहरपंत, अच्युतराव, श्रीपतराव, नारायणराव, विनायकराव, फौजदारसाहेब, जॉन इत्यादि मंडळी झटून मदत करून त्या ऊर्जितावस्थेंत राहण्यासाठीं अंतःकरणपूर्वक झटत आहेत.

समाप्त.

—मालेचें पुढील पुष्प—

# " नवशिवोदय ! "

ही उच्चविचारप्रवर्तक कादंबरी
लवकरच प्रसिद्ध होईल.

॥ श्रीगोपालकृष्णाय नमः ॥

# ॥ महाराष्ट्र--साहित्य--सेवक ग्रंथमाला ॥

## स्थापना

सन १९२२ सालीं प्रस्तुत ' माले ' ची स्थापना झाली.

## उद्देश

" पौराणिक, ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक, पारमार्थिक, चरित्रात्मक वगैरे विषयांवर ललित ( काव्य, कादंबरी व नाटक ), तसेंच निबंधात्मक उच्च व चटकदार वाङ्मय निर्माण करणें, " हा या 'माले'चा उद्देश आहे.

## नियम

( १ ) एक रुपया प्रवेशफी भरून कोणासहि मालेचे कायम वर्गणीदार होतां येतें.

( २ ) कायम वर्गणीदारास सर्व पुस्तकें ३/४ किंमतीस मिळतात. ट. ख. नि.

## विनंति

वरील उद्देशानुसार स्वार्थत्यागपूर्वक चालविलेल्या प्रस्तुत ' माले ' स सर्वांनीं साहाय्य करावें अशी विनंति आहे. कारण,

" रसज्ञ हो काय तुम्हाविना मी । करूं जगीं घेऊन काव्य नामीं ॥"

असें कविवर्य टिळक यांनीं म्हटलेंच आहे.

सर्वांचा नम्र,

**गं. रा. साने.**

---

# ॥ महाराष्ट्र-साहित्यसेवक ग्रंथमाला ॥

**नियमः**—( १ ) एक रुपया प्रवेशफी भरून कोणासही मालेचे कायम वर्गणीदार होतां येतें. ( २ ) कायम वर्गणीदारांस सर्व पुस्तकें ३/४ किं. स. मिळतात. ट. ख. नि.

**मालेचीं शिल्लक पुस्तकें !**

( १ ) कमला ! ( स्वतंत्र सामाजिक कादंबरी ) ८।१०
( २ ) अलौकिक आत्मयज्ञ ! ( २ री आवृत्ति ) ८४
( ३ ) भारतीय संग्राम ! ( सचित्र २ री आवृत्ति ) १८४
( ४ ) सायुज्यसोपान ! ( चटकदार पारमार्थिक ग्रंथ ) २
( ५ ) मुरारि ! ( शिवकालीन ऐति. कादंबरी ) २
( ६ ) भारतवर्षाचा धार्मिक इतिहास !
पूर्वार्ध-( सचित्र ) २
( ७ ) प्रपितामहाच्या पदावर !
( शिवकालीन ऐति. कादंबरी ) २८८
( ८ ) भारतवर्षाचा धार्मिक इतिहास !
उत्तरार्ध-( सचित्र ) २
( ९ ) भारतवर्षाचा धार्मिक इतिहास ! ( सचित्र एकत्र ) ४
(१०) ( १ ) अल्प रामायण ! ( सचित्र ) ( २ ) ललितवाङ्मय !
( ३ ) पावित्र्यप्रभाव ! ( ४ ) शिवशाही ते पेशवाई !
( सचित्र काव्यमय इतिहास ) भाग १ ते ८
( ५ ) गतिचें वैशिष्ट्य ! प्रत्येकी किं. ८४

**नवीन प्रकाशन !**

(११) (१) यमुना ! ( स्वतंत्र सामाजिक कादंबरी ) ८१२
(२) मानवी हृदय ! ( स्वतंत्र सामाजिक कादंबरी ) ८१२

यांशिवाय-' मुलांचा मार्गदर्शक,' ८१० ' बालवीर अथवा धाडसी यशवंत ' ८४; ' बायकांचीं नवीं गाणीं ' ( सचित्र ) भाग १, २ व ३ प्रत्येकी ८८; व ' तरुणांचा तांडेल ' किं. ८८ हीं पुस्तकेंहि आमचेकडे मिळतील. नं. २,३,४,६,८, यांस व 'मुलांचा मार्गदर्शक ' यास बक्षिसें मिळालीं आहेत व सर्वच पुस्तकांवर विद्वानांचे व वृत्तपत्रांचे उत्तम अभिप्राय मिळाले आहेत. तरी आजच मागवा व उच्च वाङ्मयाचें सेवन करा !

**पत्ता—गं. रा. साने,** बी. ए., बी. टी., पेंडशांची चाळ, खो. नं. १७, आनंद छापखान्याजवळ, सदाशिव, पुणें नं. २.

श्री. गं रा. साने, बी. ए., बी. टी. यांचीं
मुलांमुलींसाठीं मुद्दाम लिहिलेलीं
## वाचनीय व संग्राह्य पुस्तकें.

(१) भारतीय संग्राम! (सचित्र २ री आवृत्ति) किं. १८४
(२) मुलांचा मार्गदर्शक! (चटकदार उपदेश) ८१०
(३) बालवीर अथवा धाडसी यशवंत! (मुलांसाठीं नाटक) ८४
(४) अल्प रामायण! (सचित्र रामकथा) ८४
(५) ललितवाङ्मय! (चटकदार निबंध) ८४
(६) पावित्र्यप्रभाव! (मुलांमुलींसाठीं नाटक) ८४
(७) शिवशाही ते पेशवाई (सचित्र)
(भाग १ ला-शिवाजी) ८४
(८) शिवशाही ते पेशवाई! (सचित्र)
(भाग २ रा-संभाजी, राजाराम, शाहू) ८४
(९) शिवशाही ते पेशवाई! (सचित्र)
(भाग ३ रा—बाजीराव व बाळाजी बाजीराव) ८४
(१०) शिवशाही ते पेशवाई! (सचित्र)
(भाग ४ था-माधवराव, नारायणराव,
सवाई माधवराव व रावबाजी) ८४
(११) गीतेचें वैशिष्ट्य! (चटकदार निबंध) ८४
(१२) तरुणांचा तांडेल! (स्फूर्तिदायक उपदेश) ८८
(१३) बायकांचीं नवीं गाणीं! (सचित्र) (भाग १ ला) ८८
(१४) बायकांचीं नवीं गाणीं! (सचित्र) (भाग २ रा) ८८
(१५) बायकांचीं नवीं गाणीं! (सचित्र) (भाग ३ रा) ८८
(१६) अलौकिक आत्मयज्ञ! (मुलांसाठीं नाटक; २ री आवृत्ति) ८४

पत्ता—गं. रा. साने, बी. ए., बी. टी., पेंडशाची चाळ,
खो. नं. १७, आनंद छापखान्याजवळ, सदाशिव पुणें २.

'माले 'च्या शिल्लक पुस्तकांवरील

# कांहीं निवडक अभिप्राय

[ टीपः—' माले ' च्या पुस्तकांना मिळालेल्या अनेक सुंदर अभिप्रायांपैकीं, स्थलसंकोचास्तव, प्रायः एक एकच अभिप्राय पुढें थोडक्यांत दिला आहे.:

—गं. रा. साने. ]

## कमला !

" ही एक स्वतंत्र सामाजिक कादंबरी असून समाजहितदृष्टया या कादंबरीचा उपयोग विशेष होण्यासारखा आहे. "

—" स्वराज्य "

## अलौकिक आत्मयज्ञ !

" श्री. गं. रा. साने हे अनुभवी शिक्षक व रसिक लेखक असल्यामुळें प्रस्तुत नाटिका फार सुंदर वठली आहे हें सांगणें नकोच. "

—" केसरी "

## भारतीय संग्राम !

" प्रस्तुत पुस्तक सरस, रमणीय, चित्ताकर्षक, प्रबोधक, अतएव संग्राह्य आहे. "

—कै. प्रो. ल. ग. लेलेशास्त्री.

## सायुज्यसोपान !

" या ग्रंथाची रचना नवीन पद्धतीच्या चटकदार भाषेंत केली असल्यामुळें ती आधुनिक वाचकांस फार प्रिय होईल. "

—ह. भ. प. विनायकबुवा साखरे.

## मुरारि !

" मुरारि हा नायक फार सुंदर, अतिशय शूर, प्रामाणिक आणि कितीहि संकटें आलीं तरी ध्येयास न सोडणारा असा दाखविला आहे. "

—" केसरी "

## भारतवर्षाचा धार्मिक इतिहास ! ( पूर्वार्ध )

" भगवद्गीतेवरील तत्त्वज्ञान व संतांची शिकवण यांचा कड घेऊन लिहितांना रा. साने यांच्या भाषेला चढणारा आवेश मोठा मनोज्ञ वाटतो. "

—प्रो. श्री. म. माटे.

**प्रपितामहाच्या पदावर !**

" कथाविषय उज्ज्वल असून कादंबरी चटकदार व वाचनीय आहे त्यांत शंका नाहीं. "

—" **आनंद** "

**भारतवर्षाचा धार्मिक इतिहास !** ( उत्तरार्ध )

" प्रस्तुत पुस्तकांत समर्थांच्या शिकवणींचें विस्तृत विवेचन व विद्यमान स्थितीचें पर्यालोचन केलें आहे. पुस्तक वाचनीय आहे. "

—" **ज्ञानप्रकाश.** "

" विषयप्रतिपादन मार्मिक असून भाषा परिणामकारक व आकर्षक आहे. पूर्वार्धाप्रमाणेंच हें पुस्तक सुरेख व संग्राह्य आहे. "

—" **भारतमित्र.** "

**अल्परामायण !**

" श्रीरामचंद्राच्या यशोगंधानें दरवळणारें हें पुष्प मुलांना आवडेल व बोधप्रद होईल असेंच आहे. "

—" **चैतन्य.** "

**ललितवाङ्मय !**

" काव्य, कादंबरी व नाटक या विषयावरील हा एक सुंदर निबंध असून तो प्रौढ विद्यार्थ्यांना उपयुक्त आहे. "

—" **शालापत्रक** "

**पावित्र्यप्रभाव !**

" नाटकाची भाषा साधी, सरळ व सोपी असून बालवाचकांच्या हातीं उत्तम बक्षीस म्हणून देण्यास हें पुस्तक उपयुक्त ठरेल. "

—" **मन्वंतर.** "

**शिवशाही ते पेशवाई !** ( भाग १ ते ४ )

" शाहिरी थाटांत व चटकदार भाषेंत महाराष्ट्राचा इतिहास या चार पुस्तकांत दिला असून मुलें तो हंसतखेळत शिकतील. प्रत्येक घरीं व शाळांच्या बालवाचनालयांतून हीं पुस्तकें अवश्य घेतलीं जावीं. "

—" **बालसन्मित्र.** "

## गीतेचें वैशिष्ट्य !

" गीतारहस्याचें जणूं काय हृदयाविष्करण करणारा हा निबंध होतकरू अभ्यासकास व शाळाकॉलेजांतील विद्यार्थ्यांस मार्गदर्शक आहे यांत शंका नाहीं."

**—मु. ग. मिरजकर.**

" हा लेख सरस भाषेने, स्वतंत्र बुद्धीनें, व अभ्यासपूर्वक लिहिला आहे."

**—सदाशिवशास्त्री भिडे.**

## तरुणांचा तांडेल !

" १५ ते २४ वर्षांमधील तरुणांना सन्मार्गाला लावण्यासाठीं लेखकानें अंत:करण पिळवटून या पुस्तकांतील प्रकरणें लिहिलीं आहेत."

**—" त्रिकाळ "**

## यमुना !

" प्रस्तुत पुस्तकाचा माझ्या मतें विशेष अभिनंदनीय गुण म्हणजे सध्यांच्या सामाजिक प्रश्नासंबंधींचे विचार, रा. साने यांनी, संविधानकाच्या अनुषंगानें, रम्य अवतरणांची मार्मिक जोड देऊन, व्यक्त केले आहेत हा होय, व तो सहृदय वाचकांस विशेष आवडेल असे मला वाटतें."

**—श्री. नी. चापेकर.**

## मानवी हृदय !

" ही कादंबरी मी समग्र वाचली आणि मला ती फार आवडली ! कारण त्यांत हृदयाचा प्रामाणिकपणा फार आहे ! विचार सांगणें—विचार देणें हें या कादंबरीचें वैशिष्ट्य आहे."

**—य. गो. जोशी.**